म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८८८
१८५८

वा. रा. कोठारी
संपादक प्रभात पुणें

REFBK-0010304

# शिव चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८१८८ वि: चरित्र
क्रमांक ८९८ नों: दि: १६।८।८८

लेखक :

कोठारी

REFBK-0010304

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
90308
ग्रं. क्र.

मूल्य दीड रुपया

# अनुक्रम

| | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | | | ३–४ |
| **भाग पहिला** | | | |
| बाळपण व आरंभीचे पराक्रम | ... | ... | १–६ |
| अफझुलखानाचा वध | ... | ... | ६–१५ |
| जयसिंहाची स्वारी ते आग्र्याहून सुटका | ... | ... | १५–२२ |
| मराठी राष्ट्राची निर्मिति | ... | ... | २२–२७ |
| राज्याभिषेक, दक्षिणादिग्विजय | ... | ... | २७–३२ |
| **भाग दुसरा** | | | |
| प्रतिकूल परिस्थिति | ... | ... | ३३–४५ |
| महाराजांचे अलौकिकत्व आणि विभूतिमत्त्व | ... | ... | ४६–५६ |
| महाराजांनी राष्ट्र निर्माण केले म्हणजे काय केले ? | ... | ... | ५७–७३ |
| महाराजांच्या विविध गुणांचे दर्शन | ... | ... | ७४–७८ |
| महाराजांची जगांतील थोर पुरुषांशी तुलना | ... | ... | ७९–८२ |
| महाराजांची सांस्कृतिक व नैतिक श्रेष्ठता | ... | ... | ८३–९१ |

प्रकाशक
**सी. एच्. गांधी,**
३५८ नारायण पेठ, पुणें २.

मुद्रक
**सौ. उषा ज. नागपूरकर**
**श्री मुद्रण मंदिर, ५८० व**
**३४१ सदाशिव पेठ, पुणें २**

# प्रस्तावना

श्री शिवाजीमहाराजांचीं इतकीं चरित्रें उपलब्ध असतांना, त्यांच्या जीवितकार्यावर इतकें निबंधात्मक लिखाण झालेलें असतांना आणि त्यांच्या या किंवा त्या कृत्याची अनुकूल-प्रतिकूल चर्चाहि मुबलक झालेली असतांना त्याच विषयावर पुनः लिहिण्याचें साहस प्रस्तुत लेखकानें का केलें असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. त्याचें उत्तर देणें अवश्य आहे.

पहिली गोष्ट ही कीं, शिवाजीमहाराजांच्या कार्याचें मूल्यमापन, कांहीं बावतींत, योग्य प्रकारें झालेलें नाहीं असें प्रस्तुत लेखकाला वाटतें. या अभिप्रायाची यथार्थता, पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत जें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकाला पटेल.

दुसरेंहि एक कारण आहे. थोर पुरुषांचें, आणि त्यांतहि शिवछत्रपतीं-सारख्या अलौकिक विभूतींचें वैशिष्ट्य हें असतें कीं, राष्ट्राच्या प्रत्येक अवस्थेंत अशा महात्म्याच्या चरित्राच्या अभ्यासापासून वेगवेगळा प्रकाश मिळतो. आणि महाराष्ट्र आज अशा कांहीं आपत्तींत सापडला आहे कीं, या प्रसंगीं शिवाजीमहाराजांच्या चरित्राचा जर आपण लक्षपूर्वक व योग्य प्रकारें अभ्यास केला तर त्यापासून कांहीं विशेष मार्गदर्शन आपणां महा-राष्ट्रीयांना लाभेल व सध्यांच्या आपत्तींतून बाहेर पडण्यास अवश्य असलेलें कांहीं मानसिक सामर्थ्यहि प्राप्त होईल.

आज महाराष्ट्रावर चोहोंकडून वेगवेगळ्या आपत्ति कोसळत आहेत. दारिद्र्य, जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई, इत्यादि, इतर प्रांतांतल्या लोकांना जाणवणाऱ्या सर्वसामान्य आपत्ति आहेतच. पण त्याशिवाय कांहीं खास

# अनुक्रम


पृष्ठे

प्रस्तावना ३–४

**भाग पहिला**

बाळपण व आरंभींचे पराक्रम ... ... १–६
अफझुलखानाचा वध ... ... ६–१५
जयसिंहाची स्वारी ते आग्र्याहून सुटका ... ... १५–२२
मराठी राष्ट्राची निर्मिति ... ... २२–२७
राज्याभिषेक, दक्षिणादिग्विजय ... ... २७–३२

**भाग दुसरा**

प्रतिकूल परिस्थिति ... ... ३३–४५
महाराजांचे अलौकिकत्व आणि विभूतिमत्त्व ... ... ४६–५६
महाराजांनी राष्ट्र निर्माण केले म्हणजे काय केले? ... ... ५७–७३
महाराजांच्या विविध गुणांचे दर्शन ... ... ७४–७८
महाराजांची जगांतील थोर पुरुषांशी तुलना ... ... ७९–८२
महाराजांची सांस्कृतिक व नैतिक श्रेष्ठता ... ... ८३–९१



प्रकाशक
सी. एच्. गांधी,
३५८ नारायण पेठ, पुणें २.

मुद्रक
सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर, ५८० व
३४१ सदाशिव पेठ, पुणें २

# प्र स्ता व ना

श्री शिवाजीमहाराजांचीं इतकीं चरित्रें उपलब्ध असतांना, त्यांच्या जीवितकार्यावर इतकें निबंधात्मक लिखाण झालेलें असतांना आणि त्यांच्या या किंवा त्या कृत्याची अनुकूल-प्रतिकूल चर्चाहि मुबलक झालेली असतांना त्याच विषयावर पुनः लिहिण्याचें साहस प्रस्तुत लेखकानें का केलें असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. त्याचें उत्तर देणें अवश्य आहे.

पहिली गोष्ट ही कीं, शिवाजीमहाराजांच्या कार्याचें मूल्यमापन, कांहीं बाबतींत, योग्य प्रकारें झालेलें नाहीं असें प्रस्तुत लेखकाला वाटतें. या अभिप्रायाची यथार्थता, पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत जें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकाला पटेल.

दुसरेंहि एक कारण आहे. थोर पुरुषांचें, आणि त्यांतहि शिवछत्रपतीं-सारख्या अलौकिक विभूतींचें वैशिष्ट्य हें असतें कीं, राष्ट्राच्या प्रत्येक अवस्थेंत अशा महात्म्याच्या चरित्राच्या अभ्यासापासून वेगवेगळा प्रकाश मिळतो. आणि महाराष्ट्र आज अशा कांहीं आपत्तींत सापडला आहे कीं, या प्रसंगीं शिवाजीमहाराजांच्या चरित्राचा जर आपण लक्षपूर्वक व योग्य प्रकारें अभ्यास केला तर त्यापासून कांहीं विशेष मार्गदर्शन आपणां महा-राष्ट्रीयांना लाभेल व सध्यांच्या आपत्तींतून बाहेर पडण्यास अवश्य असलेलें कांहीं मानसिक सामर्थ्यहि प्राप्त होईल.

आज महाराष्ट्रावर चोहोंकडून वेगवेगळ्या आपत्ति कोसळत आहेत. दारिद्र्य, जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई, इत्यादि, इतर प्रांतांतल्या लोकांना जाणवणाऱ्या सर्वसामान्य आपत्ति आहेतच. पण त्याशिवाय कांहीं खास

संकटें आहेत. भारताचे राज्यकर्ते महाराष्ट्रावर नाराज आहेत; महाराष्ट्राला न्याय देणें दूर राहिलें, उलट त्यावर अन्याय करण्यास टपलेले आहेत. खालून आपले कन्नडिग बांधव, वरिष्ठांच्या सहानुभूतीनें, आक्रमक पवित्रा घेऊन बसले आहेत; आणि त्यामुळें लक्षावधि मराठी लोकांचें जीवन असह्य झालें आहे. मुंबईच्या धनिकांची व तत्समांची वक्र दृष्टि महाराष्ट्रीयांवर पूर्वीपासूनच आहे. खुद्द महाराष्ट्रांतील विद्वान् व विचारवंत प्रतिकूल तरी आहेत किंवा उदासीन आहेत. ज्यांनीं मराठी जनतेचें नेतृत्व करावयास पाहिजे त्यांची मनोवृत्ति द्विधा झाली आहे. कांहीं विरोधकांना सामील झाले आहेत आणि बाकीचे परस्परांविषयींच्या अविश्वासानें व मत्सरानें क्षीणबल बनले आहेत. यामुळें अन्यायाचें निराकरण करण्यास अवश्य असलेलें सामर्थ्य गोळा करणें मुष्किलीचें होत आहे.

ज्या वेळीं महाराष्ट्र याहूनहि गंभीर आपत्तींत सापडला होता त्या वेळीं शिवाजीमहाराजांनीं, कोणाहि जबरदस्ताचें साह्य नसतांना, किंबहुना स्वकीय व परकीय अशीं सर्व मोठालीं सामर्थ्यें प्रतिकूल असतांना महाराष्ट्र तर स्वतंत्र केलाच; पण अखिल भारतांतल्या हिंदूंमध्येंहि स्वाभिमानाची व स्वातंत्र्याची ज्योत पेटविली. अशा थोर पुरुषाच्या चरित्राचें, महाराष्ट्राच्या प्रचलित अवस्थेच्या पार्श्वभूमीवरून मनन व्हावें या हेतूने पुढील विवेचन केलें आहे. हें विवेचन पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत सापडेल. या छोट्याशा पुस्तकाची व्याप्ति त्या विवेचनापुरतीच मर्यादित ठेवण्याचा प्रथम संकल्प होता; परंतु, कित्येक वाचकांना शिवाजीमहाराजांच्या एकंदर कार्याची संगतवार माहितीहि उपयुक्त वाटेल म्हणून पहिल्या भागांतला मजकूर मागाहून तयार करण्यांत आला व तो पुस्तकाच्या आरंभीं देण्यांत आला.

पुणें, १ मार्च १९५९ —वा. रा. कोठारी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २५१२९ वि: चरित्र
क्रमांक ८८८ नों: दि: १६।६।

# शिव चरित्र

## भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०३०४


### श्री शिवाजीमहाराजांचें बाळपण व त्यांचे आरंभींचे पराक्रम

श्री शिवाजीमहाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर वैशाख शु. २ शके १५४९, गुरुवार, ता. ६ एप्रिल १६२७ रोजीं मध्यरात्रीं झाला.

या वेळीं हिंदुस्थानवरचें मुसलमानांचें आक्रमण पराकोटीला पोंचलें होतें. अकराव्या शतकाच्या आरंभापासून उत्तर हिंदुस्थानवर विशेष तीव्रतेनें सुरू झालेलें मुसलमानांचें आक्रमण त्या भागांत पूर्ण झालें होतें. सारा उत्तर हिंदुस्थान मोंगलांनीं पादाक्रांत केला होता; आणि आतां जहांगीर बादशहाच्या फौजा दक्षिण देशहि जिंकण्याच्या उद्योगांत गुंतल्या होत्या. शिवाय दक्षिणेंत विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतबशाही व मोंगलांनीं अर्धीमुर्धी गिळलेली मूळची अहमदनगरची निजामशाही हीं तीन मुस्लिम राज्यें अस्तित्वांत होतीं. शिवाजीचे वडील शहाजीराजे हे मुख्यतः निजामशाहीच्या रक्षणांत गुंतले होते. कधीं विजापूरचे ताबेदार म्हणून, पण मुख्यतः निजामशाहीचे सरदार म्हणून ते मोंगलांचा प्रतिकार करीत होते. शिवाजीच्या जन्माच्या सुमारास शहाजी अडचणींत आलेला असल्यानें

त्यानें आपल्या पत्नीला शिवनेरीवर पाठवून दिलें आणि तो स्वतः लष्करी हालचाली करीत राहिला. शिवाजी सुमारें तेरा वर्षांचा होईपर्यंत पिता-पुत्रांची अथवा जिजाबाईची व शहाजीची भेट होऊं शकली नाहीं. दरम्यान विजापूर दरबारच्या नोकरींत असलेल्या शहाजीनें, संभाजी मोहित्याची बहीण तुकाबाई इच्याशीं लग्न केलें. स्वाभाविकपणेंच शिवाजी व जिजाबाई यांच्याकडे त्याचें दुर्लक्षच होत राहिलें.

शिवाजीला एक वडील भाऊ (सख्खा) संभाजी म्हणून होता; तो शहाजीच्या हाताखालींच विजापूर दरबारच्या नोकरींत राहिला व १६५४ मध्यें दक्षिणेंत कनकगिरीवरच्या हल्ल्यांत मरण पावला.

तुकाबाईपासून १६३० सालीं झालेला व्यंकोजी हा एक सावत्र भाऊ शिवाजीला होता. तोहि शहाजीच्या धोरणांत व त्याच्या आज्ञेंतच राहिला. त्याला पुढें शहाजीच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं तंजावरचें राज्य मिळालें. त्याचा संबंध पुढें शिवाजीच्या चरित्रांत येईल.

निजामशाहिचा संरक्षक शहाजी व निजामशाहीचा ग्रास करण्यास टपलेले मोंगल यांचें युद्ध चालूंच होतें. १६३३ सालीं, शिवाजी ६ वर्षांचा असतांना, मोंगलांनीं जिजाबाईला शिवनेरी किल्ल्यावरून पकडून नेलें. पण या संकटाची चाहूल जिजाबाईला आधीं लागली असल्यानें तिनें बाल-शिवाजीला विश्वासू नोकरांबरोबर शिवनेरी किल्ल्यावरून पाठवून दिलें. तो १६३६ पर्यंत अज्ञातवासांतच होता. ह्या सुमारास शहाजीचा मोंगलांशीं तह झाला. शहाजी विजापुरास गेला व जिजाबाई शिवाजीला घेऊन दादोजी कोंडदेवाबरोबर पुण्यास आली. तेव्हांपासून सुमारें दहा वर्षें शिवाजीचा व जिजाबाईचा मुक्काम पुण्यासच राहिला. फक्त १६४०-१६४३ च्या दरम्यानचा कांहीं काळ शहाजीजवळ बंगलोर येथें व विजापूर येथें जिजाबाईसमवेत शिवाजीनें काढला.

हा जो काळ जिजाबाईनें संकटांत घालविला त्याचा परिणाम तिच्या मानी, निश्चयी व धर्मनिष्ठ स्वभावावर फार झाला. ती अधिक निश्चयी, करारी व धर्मनिष्ठ बनली. तिच्या उपदेशाचें व प्रोत्साहनाचें, शिवाजीची अंतःस्फूर्ति अधिक तेजस्वी व पक्की बनण्यास, बहुमोल साह्य झालें. नवऱ्यानें

उपेक्षिलेल्या जिजाबाईचाहि शिवाजी हाच आधार व प्राणविसांवा बनला. त्याच्याच भावी कर्तृत्वाचीं, पराक्रमाचीं व विजिगीषुपणाचीं सुखस्वप्नें रंगविण्यांत आपला अपमान व दुःख ती साध्वी विसरली.

शिवाजीहि जसा मोठा होत गेला तशी मातेची त्यागवृत्ति त्याच्या मनावर बिंबत गेली व त्याची मातृनिष्ठा बलवत्तर बनली.

रामायण व महाभारत यांतील कथा लहान मुलांना ऐकविण्याचा प्रघात त्या काळीं सुसंस्कृत हिंदु कुटुंबांत होता. शिवाजी त्या कथा मोठ्या आवडीनें ऐकत असे. कथा-कीर्तनें ऐकण्याचाहि त्याला फार नाद होता. त्यासाठीं तो कित्येक कोस जाई व अडचणींना न जुमानतां श्रवणाचा लाभ घेई.

शिवाजीच्या अंगीं काटकपणा आणण्यास व त्याचें शरीर व मन आपत्तिक्षम बनविण्यास सभोंवतालची परिस्थितीहि कारणीभूत होती. जंगली प्रदेशांत वावरणाऱ्या मावळे लोकांशीं त्याचा संबंध आला. ते त्याचे सोबती, स्नेही, अनुयायी व भक्त बनले. त्यांच्याबरोबर अवघड जागीं फिरणें, शिकारी करणें, डोंगरांतल्या चोरवाटा माहीत करून घेणें, वारा, ऊन, पाऊस यांचे आघात सहन करणें हा शिवाजीचा नित्याचा व्यवसाय झाला.

पुणें व सुपे हे प्रांत शहाजीच्या जहागिरींत मोडत होते; आणि त्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याचें व शिवाजीच्या शिक्षणावरहि देखरेख करण्याचें काम दादोजी कोंडदेवाकडे होतें. दादोजी हा केवळ सामान्य पंतोजी नसून कर्तृत्ववान् कारभारी होता. त्यानें जहागिरीची व्यवस्था उत्तम ठेवली. रयतांचें रक्षण करून जहागिरीचें उत्पन्न वाढविलें. नेहमीं आपापसांत भांडणाऱ्या देशमुखांचे व तत्समांचे तंटे मिटवून त्या प्रांताची राज्यव्यवस्था नीट लावून दिली. आणि दादोजीच्या प्रयत्नानें हें सर्व शिक्षण शिवाजीला लहान वयांतच मिळालें.

कसब्यांत दादोजीनें रंगमहाल नांवाचा वाडा शिवाजीकरितां बांधला. शिवाजी तेथेंच राहूं लागला. १६४० मध्यें निंबाळकरांच्या सईबाईशीं शिवाजीचें लग्न दादोजी कोंडदेवानेंच घडवून आणलें.

दादोजी कोंडदेवाचे उद्योग १६४४ च्या सुमारास कांहीं काळ विजापूर दरबारच्या डोळ्यांवर आले. कारण हा प्रदेश विजापूरच्या आदिलशाहीच्या

आधिपत्याखालीं मोडत होता. शहाजी त्या आदिलशाहीचा सरदार होता, आणि त्याच्या वतीनें दादोजी त्याच्या जहागिरीचा कारभार करीत होता. परंतु तो काळ धामधुमीचा होता; विजापूर दरबारची राजसत्ता सर्व अंकित प्रदेशावर चालत नव्हती; ठिकठिकाणीं जहागिरदार, सरदार वगैरे असत; आपापल्या प्रदेशाचा सर्व मुलकी व फौजदारी कारभार तेच पाहात. त्यांच्या स्वतःच्या फौजाहि असत. विजापूर दरबाराचें फक्त आधिपत्य त्यांनीं मानावयाचें, कांहीं खंडणी द्यावयाची आणि वेळ पडेल तेव्हां फौजांनिशीं लढावयास जावयाचें, अशी ती सरंजामदारी पद्धत होती. त्यामुळें दादोजी कोंडदेव हा, जहागिरीच्या बंदोबस्ताच्या सबबीवर, कांहीं प्रदेश हस्तगत करूं शकला. शिवाजीहि वयाच्या १७ व्या वर्षापासूनच या धामधुमींत भाग घेऊं लागला. १६४७ च्या मार्च महिन्यांत दादोजी कोंडदेव मृत्यु पावला; आणि जहागिरीचा सर्व कारभार शिवाजी मुखत्यारीनें पाहूं लागला. याच वर्षीं त्यानें कोंडाणा ( सिंहगड ) किल्ला ताब्यांत घेतला व पुढील वर्षीं ( १६४८ ) मोठ्या युक्तिबाजपणानें पुरंदर किल्ल्याचा ताबा मिळविला. तोरणा किल्ल्याच्या किल्लेदाराशीं संधान बांधून तो किल्लाहि त्यानें ताब्यांत घेतला. त्याची डागडुजी करून तेथें मावळ्यांची शिबंदी ठेवली व त्याला प्रचंडगड हें नांव दिलें. या काळांत येसाजी कंक, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे वगैरे कर्तृत्ववान् लोक शिवाजीच्या तालमींत तयार झाले; यांनीं पुढें फार महत्त्वाची कामगिरी बजाविली. मोरोपंत पिंगळे हा तर मोठा कुशल सेनापति झाला व शिवाजीचा मुख्य प्रधान ( पेशवा ) बनला.

इ.स. १६४८ पासून १६५६ पर्यंतचा काळ शिवाजीनें आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्यांत घालविला. या काळांतला त्याचा महत्त्वाचा पराक्रम म्हणजे जावळी प्रांताचा त्यानें घेतलेला ताबा. मोऱ्यांचा पराभव करून त्यानें हा प्रदेश मिळविला. मोऱ्यांची स्वतःची मोठी पागा होती. शिवाय हा जावळी भाग समृद्ध व उत्पन्नाचा असल्यानें मोऱ्यांवरच्या विजयामुळें शिवाजीचें राज्य विस्तृत व समर्थ बनलें. या भागांत अनेक शूर लोक होते; ते शिवाजीच्या फौजेंत दाखल झाले. त्याची फौज एकदम दुप्पट झाली; व त्यामुळें राज्याचा अधिक विस्तार करणें त्याला शक्य झालें. शिवाय या पराक्रमाचा दुसरा परिणाम असा झाला कीं, शिवाजीचा वचक आजू-

बाजूच्या सरदारांवर बसला व ते त्याच्याशीं नम्रपणें वागूं लागले ( १६५६ ). या वेळीं शिवाजीचें वय २९ वर्षांचें होतें.

विजापूरचा बादशहा महंमद आदिलशहा १६४६ मध्यें जो अर्धांगवायूनें आजारी पडला तो पुढें दहा वर्षें मरणकालपर्यंत अंथरुणास खिळलेलाच होता. त्यामुळें शिवाजीचीं या काळांतलीं आक्रमक कृत्यें विजापूर दरबारास खपवून घ्यावीं लागलीं.

कोंकणचा कल्याण प्रांत—म्हणजे भिवंडीपासून नागोठण्यापर्यंतचा प्रदेश—विजापूरकरांच्या मालकीचा होता. हा प्रांत आदिलशहानें मुल्ला अहंमद यास जहागीर म्हणून दिला होता. तो कल्याण येथें राहून जहागिरीची व्यवस्था पाही. १६५५ च्या सुमारास हा मुल्ला अहंमद खजिना घेऊन विजापुरास जात असतां, आधीं सर्व माहिती मिळवून शिवाजीनें तो खजिना लुटला; आणि पुढें १६५७ च्या आरंभीं आपले लोक पाठवून कल्याण व भिवंडी हीं ठाणीं हस्तगत केलीं. कल्याण प्रांतांतले कित्येक किल्लेहि शिवाजीनें ताब्यांत घेतले. याप्रमाणें सर्व कल्याण प्रांत हस्तगत करून आबाजी सोनदेव यास त्यावर सुभेदार नेमलें. त्यानंतर त्यानें कोंकणांत प्रमुखपण भोगणारा वाडीचा लखम सावंत याशीं संधान बांधून त्याला आपल्या कक्षेंत घेतलें. त्यानें शिवाजीचें मांडलिकत्व पतकरलें व शिवाजीनें त्याच्या संरक्षणाची हमी घेतली. शिवाजीनें देशावरील भानगडींत फारसें लक्ष न घालतां कोंकण प्रांतांत समुद्रकिनाऱ्यानें आपली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे. या अनुषंगानेंच त्यानें पुढें स्वतःचें प्रबल आरमारहि तयार केलें.

शिवाजीच्या कार्यपद्धतीचें वर्णन बखरकारांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे :—

" द्रव्य असलें म्हणजे त्याच्या योगें लोक राजी राहतात. किल्ले ताब्यांत असले म्हणजे सभोंवतालचा मुलूख कह्यांत राहतो. मुसलमानी राज्यांतील बिकट जागा म्हणजे सह्याद्रीची ओळ. त्या मुलखांतील लोक माहितगार. पावसांत डोंगरावर चढणें, झाडींत शिरणें हीं कामें मावळे व कोकणे यांनींच करावींत. म्हणून यांचाच संग्रह महाराजांनीं प्रथम केला. नामांकित लढवय्या मनुष्य असेल तेथून त्याला आणावें. किल्ल्याचीं कारस्थानें करवून ते घेण्यास स्वतःच जावें. घरें शाकारण्याचें गवत घेऊन लोक किल्ल्यावर

जात असतां महाराजांच्या माणसांनीं डोईवर गवताचे भारे घेऊन आंत तलवारी लपवून जावें व किल्ला हस्तगत करावा. किल्ले घेतल्यावर त्यांच्या रक्षणासाठीं विश्वासू व मर्द असे हवालदार नेमावे. याप्रमाणें दिवसेंदिवस राज्याची वृद्धि होत चालली. मोठमोठीं मातब्बर मनुष्यें संग्रहीं आलीं. संपूर्ण स्थळींस्थळींचीं राजकारणें महाराजांकडे येऊं लागलीं. **महाराज दयावंत, मनुष्याचे भुकेले; सर्वांचा संग्रह करूं लागले.** ”

या सुमारास, दिल्लीचा बादशहा शहाजहान याचा मुलगा औरंगजेब हा दक्षिणेच्या सुभेदारीवर होता ( १६५३ ते १६५८ ). पत्रव्यवहार करून त्याच्याशीं संधान बांधण्याचा व त्याच्या मदतीनें–किंवा उपेक्षेनें–विजापूर-करांचा आणखी कांहीं मुलूख मिळविण्याचा शिवाजीचा बेत होता. पण तें जमलें नाहीं. शेवटीं औरंगजेब व त्याच्या पाठीशीं असलेली बलाढ्य मोंगल सत्ता यांस न जुमानतां, मोंगलांचें जें जुन्नर ठाणें त्यावर शिवाजीनें छापा घातला व पुष्कळ लूट मिळविली. मराठे घोडेस्वारांच्या चपळ तुकड्या मोंगलांच्या मुलखांत खुशाल हिंडूं लागल्या. थेट अहमदनगरापर्यंत त्यांनीं लूट मिळविली. तेव्हां औरंगजेबानें आपल्या प्रदेशाच्या सरहद्दीवर ठिक-ठिकाणीं सरदार व फौजा ठेवल्या. पुढें औरंगजेब व विजापूर दरबार यांच्यांत तह झाला. तेव्हां शिवाजीनेंहि नरमाई दाखवून औरंगजेबाकडे तहाची मागणी केली.

या सुमारास ( जानेवारी १६५८ ) औरंगजेबाचा बाप शहाजहान आजारी पडल्याचें वर्तमान आलें. तेव्हां औरंगजेबास दिल्लीकडे जाणें भाग होतें. मात्र जातांना त्यानें विजापूरच्या आदिलशहास जें पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर आहे :—

“ शिवाजी किल्ले बळकावून बसला आहे. तेथून त्याला हुसकावून लावा. त्याच्या नोकरीची तुम्हांस जरूरीच असेल तर त्याला कर्नाटकांत दुसरी जहागीर द्या; पण या डोंगरी मुलुखांत त्यास ठेवूं नका. ”

## अफजुलखानाचा वध

जावळीच्या मोऱ्यांचा शिवाजीनें पाडाव केला ( १६५६ ) तेव्हांपासून विजापूर दरबारांत त्याच्या प्रकरणीं चिंतेचेंच वातावरण होतें. परंतु महंमद

आदिलशहा मरण पावल्यामुळें व औरंगजेबाची स्वारी सुरू झाल्यामुळें दरबारास गप्प बसावें लागलें. पुढें मोंगलांशीं तह झाल्यावर व औरंगजेब उत्तरेकडे निघून गेल्यावर शिवाजीचा बंदोबस्त करण्याचा विचार विजापूर दरबारांत पुढें आला, आणि या कामीं अफझुलखानाची नेमणूक करण्याचें ठरलें. मृत बादशहा महंमद आदिलशहा याचा हा दासीपुत्र. महंमद-शहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा लहान असल्यामुळें सारा कारभार महंमदशहाची बायको बडी साहेबीण ही पाहात होती. तिनें बारा हजार फौज अफझुलखानाच्या दिमतीस दिली व त्यास असा गुप्त हुकूम दिला कीं, “दोस्तीचें आमिष दाखवून कपटानें किंवा कशाहि तऱ्हेनें शिवाजीस मारावें किंवा जिवंत पकडून आणावें.”

विजापूरच्या दरबारीं शिवाजीचा बाप शहाजी हा ‘राजा’ हा किताब धारण करणारा व अव्वल दर्जाचा सरदार व सेनानी होता. असें असतां शिवाजीचा निःपात करण्याचा हा मनसुबा त्याच दरबारांत इतक्या उघडपणें कसा शिजूं शकला? याचें उत्तर हें कीं, शिवाजीचें स्वराज्य-संस्थापनेचें उद्दिष्ट अथवा हिंदुपदपातशाहीच्या निर्मितीचें ध्येय इत्यादि कार्यांची शहा-जीला कसलीहि आंच नव्हती. तो कर्नाटकांत, विजापूर दरबारच्या वतीनें, तिकडील हिंदु संस्थानें बुडविण्याचें काम करीत होता, व हिंदु लोकांच्या या विध्वंसनांतून, स्वतःचा आवडता मुलगा व्यंकोजी याला एखादें संस्थान मिळवून देतां आलें तर पाहावें या कारस्थानांत मग्न होता. त्यानें दरबारास स्वच्छ कळवून टाकलें कीं “शिवाजी माझ्या आज्ञेंत वागत नाहीं. आपण त्याचें पारिपत्य पाहिजे तसें करावें. त्यास माझी हरकत नाहीं!”

अर्थात् शहाजी नाराज होईल अथवा शिवाजीच्या वतीनें बंड करील असा धाक बाळगण्याचें दरबारच्या मुत्सद्यांस कांहींच कारण राहिलें नाहीं. तिकडे कर्नाटकांत विजापूरचा श्रेष्ठ मानकरी म्हणून शहाजी हिंदूंच्या विरुद्ध रणांगण गाजवीत राहिला व इकडे त्याच्या पूर्ण परवानगीनें शिवाजीचा निःपात करण्याचा मनसुबा दरबारांत राजरोस शिजून निघाला!

इ. स. १६५९ च्या सप्टेंबर महिन्यांत अफझुलखान विजापुराहून फौजेनिशीं निघाला. शिवाजीचें निवासस्थान पुण्यास असल्यानें त्याच दिशेनें

खान निघाला. वाटेंत हिंदूंचीं देवस्थानें त्यानें मुद्दाम उध्वस्त केलीं. ही हकीकत शिवाजीस राजगडावर समजली. पुण्याचा प्रदेश खानाशीं सामना देण्यास गैरसोयीचा होय हें ओळखून शिवाजी प्रतापगडावर येऊन राहिला. वाई ते प्रतापगड हा भाग फार दुर्गम आहे. त्यांत खानाला अडकवून त्याची खोड मोडावी असा शिवाजीचा बेत होता.

अफझुलखानहि पुण्याची दिशा सोडून वाईस येऊन राहिला. अफझुलखान वाईच्या सुभेदारीवर वरींच वर्षें असल्यानें तिकडची त्याला चांगली माहिती होती. त्यानें वाई येथील कुलकर्णी कृष्णाजी भास्कर यास पढवून शिवाजीकडे पाठविलें. शिवाजीला भेटीसाठीं वाईस बोलावण्याचा खानाचा उद्देश होता. खानाचा दुष्ट बेत शिवाजीनें ओळखला होता. शिवाजीच्या पदरीं पंताजी गोपीनाथ बोकील म्हणून एक धोरणी व हुशार गृहस्थ होता. त्याला शिवाजीनें कृष्णाजीबरोबर वाईस अफझुलखानाकडे शिष्टाईसाठीं पाठविलें. शिवाजी वरचेवर असे निरोप पाठवी कीं, "एवढ्या मोठ्या सैन्याशीं सामना करण्याची ताकद माझ्यांत नाहीं. झालेले अपराध पोटांत घालून खान जीवदान देतील तर मी आपल्या ताब्यांतील सर्व मुलूख सोडून देण्यास तयार आहें." यामुळें खानास अशी खात्री वाटूं लागली कीं आपली मोहीम फत्ते होणार. वाई प्रांताची त्याला उत्तम माहिती होती. त्या डोंगराळ व झाडीच्या प्रदेशांत लढाई करणें म्हणजे आपल्या सैन्याची धूळधाण करणें होय हें त्याला उघड दिसत होतें. म्हणून सामोपचारानें व दगाबाजीनें शिवाजी हस्तगत झाला तर बरें असें त्यानें ठरविलें. कांहीं तरी करून शिवाजीला किल्ल्यांतून बाहेर काढावें व मारून वा कैद करून त्याला विजापुरास न्यावें असा त्याचा बेत होता.

खानाची फौज वाईपासून महाबळेश्वरपर्यंत पसरली होती. शिवाजीनें आपलें सैन्य दाट झाडींतून व दऱ्याखोऱ्यांतून लपवून ठेवलें असल्यानें तें दिसून येत नव्हतें. अफझुलखानाचा प्रतिनिधि कृष्णाजी भास्कर जेव्हां दुसऱ्यांदा शिवाजीच्या भेटीस आला तेव्हां त्यानें कृष्णाजीची एकांतीं गांठ घेतली. "आम्हीं आरंभिलेल्या महाकृत्यास तुमच्यासारख्या ब्राह्मणांची मदत अवश्य पाहिजे," असें म्हणून त्याचें मन आपल्या बाजूला वळवून

घेतलें व त्याचा धर्माभिमान व स्वदेशाभिमान जागृत केला. शेवटीं उभयतांचा असा विचार ठरला कीं, शिवाजीच्या भेटीसाठीं प्रतापगडच्या पायथ्याशीं येण्यासाठीं खानाचें मन वळवावें. त्याप्रमाणें कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ या दोघांनीं खानास भेटून त्याला तयार केलें.

या अनुषंगानें, त्या वेळच्या हिंदूंची मनःस्थिति किती स्वाभिमानशून्य व लाचारीची बनली होती आणि मुसलमान राज्यकर्ते किती घमेंडखोर व उन्मत्त बनले होते याचा विचार करावयास पाहिजे. शिवाजी हिंदु आहे, इतकेंच नव्हे तर हिंदुधर्माचा निस्सीम अभिमानी आहे हें माहीत असतांना, व आपलीहि प्रजा हिंदुच आहे हें स्पष्ट दिसत असतांना हा अफझुलखान खुशाल वाटेंत हिंदूंचीं देवालयें उध्वस्त करतो; पंढरपूरच्या विठोबाची विटंबना करतो; तुळजापूरच्या अंबाबाईचे तुकडे करतो; आणि पुनः कृष्णाजी भास्कर या हिंदूलाच शिवाजीला जाळ्यांत अडकविण्यासाठीं त्याच्याकडे पाठवितो ! हिंदूंविषयीं मुसलमान राज्यकर्त्यांच्या कल्पना कशा प्रकारच्या असल्या पाहिजेत याची कल्पना यावरून येते. कां नाहींत असणार ? खुद्द शहाजीचीच जर शिवाजीच्या निःपाताच्या कामगिरीला निखालस अनुज्ञा होती तर इतरांची काय कथा !

हाच प्रकार, शिवाजीचा पाडाव करण्यासाठीं आपल्या पदरचा हिंदु सरदार राजा जयसिंह यास औरंगजेबानें पाठविलें तेव्हां दृष्टीस पडतो. औरंगजेब हिंदूंचीं मंदिरें पाडतो, हिंदुधर्माचा पुरस्कर्ता शिवाजी याचा सर्वनाश वांछितो; आणि ती कामगिरी हिंदुधर्मी जो जयसिंह त्याला सांगतो व जयसिंह ती मोठ्या अभिनिवेशानें पतकरतो !

अगदीं भयंकर आपत्ति ओढवली असतां, प्राणावरच प्रसंग गुदरला असतां स्वधर्माचा व स्वकीयांचा द्रोह करणें, सामान्य माणसांच्या बाबतींत, क्षम्य मानतां येईल. पण तसें कसलेंहि संकट अथवा उपासमारीची आपत्ति आलेली नसतांना केवळ स्वतःच्या बढतीसाठीं व उत्कर्षासाठीं स्वकीयांचा संहार करण्यास प्रवृत्त होणें—याला काय म्हणावें ? किती कमालीचा हा स्वधर्मद्रोह, स्वतःच्या संस्कृतीचा व आपल्या बांधवांचासुद्धां केवढा हा द्रोह ! हिंदूंची ही स्वाभिमानशून्यता प्रथम शिवाजीमहाराजांनीं आणि त्यानंतर

पेशव्यांनीं घालविली. भारतांतल्या पस्तीस कोट हिंदूंनीं शिवाजीमहाराजांचे ऋणी असलें पाहिजे तें याचसाठीं. नुसतें ऋणी राहून आपलें कर्तव्य संपत नाहीं; तर शिवाजीच्या स्वत्वभावनेचें व स्वाभिमानाचें अनुकरण करण्याचाहि यत्न आपण केला पाहिजे. असो.

१० नोव्हेंबर १६५९ या दिवशीं प्रतापगडच्या पायथ्याशीं अफजुलखानाची व शिवाजीची भेट होण्याचें ठरलें. शिवाजीनें रानांत ठिकठिकाणीं आपल्या चौक्या बसविल्या, आणि किल्ल्यावर येण्याची एक वाट खुली ठेवून बाकीच्या सर्व वाटा, मुद्दाम पाडलेलीं मोठालीं झाडें आडवीं टाकून, बंद करून टाकल्या. तसेंच, अनिष्ट परिणाम घडल्यास किल्ल्याचा व राज्याचा बंदोबस्त कसा करावयाचा याची निरवानिरवहि शिवाजीनें केली. किल्ल्यावरून निघतांना आईला व आपल्या मंत्र्यांना त्यानें असा संदेश दिला : "आम्हीं ही होड आरंभिली; श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडेंहि घडल्यास तुम्हीं घाबरें न होतां शत्रूस बुडवावें व राज्य रक्षावें."

भेटीच्या आधीं शिवाजीनें आपल्या बचावाची सर्व सिद्धता केली. अंगांत चिलखत, त्यावर अंगरखा, डोकीस शिरस्त्राण, वर पागोटें, उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत बिचवा, डाव्या हातांत वाघनखें, अशी आपल्या संरक्षणाची सिद्धता त्यानें केली; आणि देवीस व मातुःश्रीस वंदन करून तो खानाच्या भेटीस निघाला. खानहि तिकडून पंधराशें लोक घेऊन निघाला. परंतु, यायोगें शिवाजी घाबरून भेटीस येणार नाहीं असें वकीलानें सांगितल्यावर फौजेस अर्ध्या रस्त्यांत ठेवून दोन हत्यारबंद शिपाई घेऊन खान सदरेस आला. तिकडून शिवाजीहि दोनच शिपाई घेऊन आला. त्यायोगें खानास बरें वाटलें. शिवाजी दबकत दबकतच आला. खान उंच व दांडगा होता. त्या मानानें शिवाजी किरकोळ होता. प्रथम भेटतांनाच खानानें शिवाजीस आपल्या डाव्या बगलेंत आवळून धरलें व त्याच्या पोटांत जमदाड चालविली. इतक्यांत शिवाजीनें डाव्या हातांतलीं वाघनखें खानाच्या पोटांत खुपसलीं. त्याबरोबर 'दगा रे दगा' असें ओरडून खानानें शिवाजीच्या डोक्यावर तलवारीचा प्रहार केला; पण शिरस्त्राणामुळें तो वाया गेला. इतक्यांत शिवाजीनें तलवारीचा वार करून

अनुक्रम २४१९८ दि: ... क्रमांक ... नों: दि: ...
खानाला खांद्यापासून पोटापर्यंत चिरलें. खानाचा शरीररक्षक सय्यद बंडा शामियान्याच्या बाहेर उभा होता. गडबड ऐकून तो आंत आला, तों खान मरून पडलेला ! तत्क्षणीं तो शिवाजीवर चालून आला. त्यास जिवा महाला या न्हावी जातीच्या शिपायानें ठार केलें. इकडे भोयांनीं खानाचें प्रेत पालखींत घालून चालविलें. परंतु शिवाजीच्या लोकांनीं भोयांस ठार केलें व खानाचें शिर कापून किल्ल्यावर नेलें.

नंतर शिवाजीच्या फौजेनें खानाच्या सैन्याचा पाडाव केला. शत्रूची दाणादाण होऊन पुष्कळ लूट शिवाजीच्या हातीं लागली.

या विजयाप्रीत्यर्थ श्री शिवाजीमहाराजांनीं पुष्कळ दानधर्म केला. ज्यांनीं विशेष पराक्रम केले होते त्यांना बक्षिसें दिलीं. मराठशाहीच्या खऱ्या स्थापनेस शिवाजीमहाराजांचा हा अद्भुत पराक्रम मुख्यतः कारणीभूत झाला. लोकांवर त्यांचा वचक बसला. अचाट पराक्रम, कल्पकता, दूरदर्शीपणा, साहस, प्रसंगावधान इत्यादि गुण त्यांच्या अंगीं असून ते खरोखरच अद्वितीय पुरुष आहेत अशी लोकांची खात्री पटली.

या विजयानंतर शिवाजी स्वस्थ बसला नाहीं; विजयाच्या धुंदींत ऐष-आराम करीत राहिला नाहीं. या प्रचंड पराभवानें शत्रु स्थगित झाला आहे तोंवरच आणखी लाभ करून घ्यावा म्हणून तो फौज घेऊन निघाला; पन्हाळा, पावनगड, विशाळगड ( खेळणा ), रांगणा इत्यादि किल्ले त्यानें घेतले; आणि खंडण्या वसूल करीत करीत तो विजापुरापर्यंत चालून गेला. पण तेथून तो इतक्या त्वरेनें परत निघाला कीं कोणी त्याचा पाठलाग करूं शकलें नाहीं.

परंतु विजापूर दरबारचे मुत्सद्दी कांहीं स्वस्थ नव्हते. त्यांनी सलाबत-खान याच्या हुकमतीखालीं बरीच मोठी फौज दिली व त्याला शिवाजीवर पाठविलें. शिवाजीनें पन्हाळगडावर राहून लढाईची तयारी केली. परंतु सलाबतखानानें पन्हाळगडास पूर्ण वेढा घातला व शिवाजीचा बाहेरचा संबंध साफ तोडला. याच सुमारास मोंगलांचा सरदार शाहिस्तेखान अहमद-नगराहून निघून शिरवळपर्यंत आला. याप्रमाणें दोन्ही शत्रूंना एकदम तोंड देणें शिवाजीच्या सेनापतींना जमेना. शेवटीं शिवाजीनें कांहीं तरी युक्ति

करून पन्हाळगडाच्या बाहेर पडण्याचें ठरविलें. त्यानें सलाबतखानाशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं; इमान वगैरे झाल्यावर शिवाजी त्याला एका मोर्च्याजवळ येऊन भेटला, व दुसऱ्या दिवशीं किल्ला स्वाधीन करण्याचें ठरलें. नंतर शिवाजी किल्ल्यांत परत गेला. तह ठरला म्हणून त्या रात्रीं सलाबतखानाचे सैनिक बेसावध राहिले. त्याच ( १३ जुलै १६६० ) मध्यरात्रीं, एक हजार मावळ्यांची तुकडी बरोबर घेऊन शिवाजी, अंधारांत शत्रूचे चौक्या पहारे चुकवीत, किल्ल्याखालीं उतरला व विशाळगडाच्या रस्त्यानें चालूं लागला. शिवाजी निसटला हें पुष्कळ वेळ विजापूरच्या फौजेला कळलेंच नाहीं. समजल्यानंतर सलाबतखानानें शिवाजीचा पाठलाग करण्यास फौज पाठविली. शिवाजी घाट चढत असतां शत्रूची फौज त्यानें पाहिली. तेव्हां त्यानें बाजी प्रभू यास कांहीं सैनिकांसह किल्ल्याजवळील खिंडींत पांढऱ्या पाण्यानजीक ठेवलें; आणि किल्ल्यावर सुखरूप पोंचल्याची इशारत तोफेच्या रूपानें मिळेपर्यंत शत्रूला अडवून धरण्यास त्याला सांगितलें. ही कामगिरी बाजी प्रभूनें किती उत्कृष्ट प्रकारें बजावली व धन्याच्या—म्हणजे हिंदुत्वाच्या—रक्षणार्थ प्राण खर्ची घालून आपलें नांव इतिहासांत कसें अजरामर केलें हें मशहूर आहे.

## औरंगजेबाचा सरदार शाहिस्तेखान याचा पाडाव

याच सुमारास औरंगजेबाचा सरदार शाहिस्तेखान हा शिवाजीमहाराजांचें पारिपत्य करण्यासाठीं आला असल्यानें पन्हाळा किल्ला लढवणें महाराजांना सोयीचें वाटलें नाहीं; म्हणून त्यांनीं तेथील अधिकारी त्र्यंबक भास्कर यास किल्ला सलाबतखानाच्या ताब्यांत देण्यास सांगितलें.

शाहिस्तेखानानें उत्तर कोंकण प्रांत शिवाजीच्या ताब्यांतून काढून घेण्याचें ठरविलें व त्या कामीं करतल्बखान या सरदाराची नेमणूक केली. परंतु शिवाजीच्या लोकांनीं लोहगडाखालच्या उंबरखिंडींत त्याला गाठून त्याला पूर्णपणें शरण आणलें व मोठा दंड ठरवून व त्याचें सर्व साहित्य घेऊन त्याला पाठवून दिलें !

त्यानंतर शिवाजीनें आपलें लक्ष दक्षिण कोंकण प्रांताकडे वळविलें. अफझुलखान प्रकरणाचा पुरेपूर वचपा त्याला काढावयाचा होता व म्हणून

आदिलशहाच्या वर्चस्वाखालचा हा मुलूख जिंकून घेण्याचें त्यानें ठरविलें. कल्याणपासूनचा दक्षिण किनारा हस्तगत करण्याचा त्याचा बेत होता. अफझुलखानाच्या वधानंतर शिवाजीच्या सैन्यानें दक्षिण कोंकणांत एक फेरी केली होती (१६६०). आतां १६६१ च्या मार्च महिन्यांत शिवाजी स्वतः निघाला. पालवण, दाभोळ, संगमेश्वर, शृंगारपूर इत्यादि ठाणीं त्यानें हस्तगत केलीं व त्र्यंबक भास्कर यांची नेमणूक त्या भागांत करून शिवाजी परतला.

याप्रमाणें दक्षिण कोंकणचा ताबा पुरा होतो न होतो तोंच शिवाजीनें मोठ्या प्रयासानें जिंकलेलें उत्तर कोंकण शाहिस्तेखानाच्या लोकांनीं घेतलें. कल्याण व त्याखालचा प्रदेश मोंगलांनीं घेतला. तो पुनः परत मिळविण्यास शिवाजीला नऊ वर्षें लागलीं. पेणपासून दक्षिणेकडचा प्रदेश मात्र त्यानें हातचा जाऊं दिला नाहीं. १६६२ मध्यें मोंगलांचा सरदार नामदारखान पेणेवर आला पण शिवाजीनें त्याचा पराभव केला. पुढें शाहिस्तेखान स्वतः पुण्यास शिवाजीच्याच वाड्यांत तळ ठोकून बसल्यामुळें ह्या भागांतील शिवाजीचे उद्योग बंद पडले. शाहिस्तेखानानें दोन मोठ्या फौजा तयार केल्या. त्यांपैकीं एक घाटाखालीं चौलजवळ व दुसरी घाटावर रहिमतपूर येथें त्यानें ठेवली. अशा रीतीनें दोन्हीकडून शिवाजीवर दाब आणण्याचा जोरदार प्रयत्न त्यानें सुरू केला.

अशा स्थितींत कांहीं तरी करून शाहिस्तेखानाचें आसन पुण्यांतून उठविणें शिवाजीला प्राप्त होतें. त्यानें एक फार मोठें साहस करण्याचें ठरविलें. स्वतः पुढाकार घेतल्यावांचून मसलत सिद्धीस जाणार नाहीं म्हणून जातीनें नेतृत्व करण्याचा बेत त्यानें कायम केला. शाहिस्तेखानाचा मुक्काम शिवाजीच्या राहत्या वाड्यांतच असल्यामुळें त्याची सर्व रचना शिवाजीला माहीत होती. पुण्यापासून जवळच सिंहगडावर शिवाजीनें मुक्काम ठेवला होता. तेथें सर्व तयारी करून चारशें निवडक मावळ्यांसमवेत ५ एप्रिल १६६३ रोजीं सायंकाळीं शिवाजी तेथून निघाला. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी हे दोन चाणाक्ष प्रभु सरदार त्यानें बरोबर घेतले होते. आम्ही पहाऱ्यावरचे शिपाई आहोंत, पहारे सोडविण्यास जातों असें सांगून वाड्याच्या आवारांत ते मध्यरात्रीपूर्वींच शिरले होते. मध्यरात्र उलटल्यावर

व सर्व सामसूम झाल्यावर चिमणाजी बापूजी दोनशें लोकांची टोळी घेऊन वाड्याच्या मागच्या बाजूस आला. कुदळीनें भिंतीला भोंक पाडून त्याचे लोक आंत शिरले ते थेट शाहिस्तेखानाच्या खोलींत गेले. जनानखान्यांतल्या बायका घाबरून ओरडूं लागल्या. त्याबरोबर खानाचा मुलगा तरवार घेऊन धांवला; पण शिवाजीच्या लोकांनीं त्याचा निकाल लावला. इतक्यांत पुढच्या दरवाज्यावरच्या पहारेकऱ्यांस कापून दुसरी दोनशेंची टोळी घेऊन बाबाजी बापूजी आंत शिरला. त्याच्यापुढें खान हातांत भाला घेऊन उभा राहिला. त्याच्या अंगावर कांहीं लोक धांवून गेले असता एकाला त्यानें ठार केलें. त्याबरोबर दुसऱ्यानें त्याच्या हातावर वार केला; त्यांत खानाचें बोट तुटलें. इकडे खान मेला अशा बायकांच्या आरोळ्या ऐकून आपला हेतु सिद्धीस गेला अशा समजुतीनें शिवाजीचे लोक मागें परतले. शिवाजीहि बाहेर पडला व आपले लोक जमवीत सिंहगडास आला. या छाप्यांत पहाऱ्यापैकीं सहा इसम मेले व चाळीस जखमी झाले. खानाचा एक मुलगा, सहा बायका व दासी मारल्या गेल्या. स्वतः खान, त्याचे दोन मुलगे व आठ दासी जखमी झाल्या.

रात्रीचा अंधार कमी होतांच मोंगलांच्या फौजा सिंहगडावर चढाई करण्यासाठीं गेल्या. त्या तोफेच्या टापूंत येतांच शिवाजीनें वरून तोफांचा मारा सुरू केला, त्यामुळें लोक बाद होऊं लागले. वेढा घालून बसण्याचीहि सोय नव्हती. कारण पावसाळा जवळ आला होता. तोफखान्यावांचून किल्ला सर होण्याजोगा नव्हता. पण त्या अडचणीच्या जागेंत तोफखाना आणवावा तर तो शिवाजीकडून लुटला जावयाचा. इतक्यांत शाहिस्तेखानाचा हत्ती किल्ल्यावरून आलेल्या तोफेच्या गोळ्यानें ठार झाला. त्यायोगें खानाची उमेद खचली व सारें सैन्य घेऊन तो औरंगाबादेस जाऊन राहिला.

छाप्याची वार्ता औरंगजेबास कळतांच त्यानें शाहिस्तेखानाची बदली बंगालकडे केली.

शिवाजीच्या या पराक्रमामुळें त्याची कीर्ति चोहोंकडे पसरली व हा पुरुष अजिंक्य आहे असें सर्वांना वाटूं लागलें.

शाहिस्तेखान आपला वाडा बळकावून बसला आहे, त्याचा वचपा दुसरीकडे काढावा म्हणून शिवाजीनें १६६४ च्या जानेवारीच्या आरंभींच

मोंगलांचें धनाढ्य शहर जें सुरत त्यावर अचानक स्वारी केली व तेथून प्रचंड लूट मिळवून आणली.

शिवाजीच्या आरमारानेंहि पुष्कळ काम केलें. मुसलमान यात्रेकरूंनीं भरलेलीं जहाजें अरबस्तानाकडे चाललीं असतां त्या यात्रेकरूंना शिवाजीच्या आरमारांतील लोकांनीं पकडलें व त्यांच्याकडून खूप मोठी रक्कम घेऊन त्यांना सोडून दिलें.

१६६४ हें शिवाजीच्या अनेक पराक्रमांचें वर्ष आहे. त्यानें कोंकणांतला कुडाळ प्रदेश काबीज केला. पण आदिलशहानें महंमद इखलासखानास तो प्रदेश परत मिळविण्यासाठीं पाठविलें. आणि त्याचा पाठपुरावा करण्यासाठीं वजीर खवासखान व बाजी घोरपडे यांना आणखी फौज देऊन त्यानें कुडाळवर जाण्याचा हुकूम केला. मुधोळकर घोरपडे हे आदिलशहाचे पुरातन, एकनिष्ठ सरदार; मुसलमानांचें राज्य राखण्यास सदैव तत्पर; भोसल्यांच्या घराण्याशीं तर त्यांचें कायमचें वैमनस्य. शिवाजीचा उत्कर्ष सहन न होऊन बाजी घोरपडे मोठ्या ईर्ष्येनें या स्वारींत सामील झाला. पण हें वर्तमान समजतांच शिवाजीनें घोरपड्याच्या मुधोळ ठाण्यावर चाल केली व त्याचा प्रांत लुटला. बाजी घोरपडे लढाईस उभा राहिला, पण त्यांत तो व त्याचे कित्येक प्रमुख लोक पडले.

## जयसिंहाची स्वारी, पुरंदरचा तह, उत्तरेकडे प्रयाण व आग्र्याहून सुटका

दक्षिणेकडून शाहिस्तेखानाची बंगालच्या नोकरीवर रवानगी झाल्यावर औरंगजेबानें आपला मोठा मुलगा मोअज्जीम याची शाहिस्तेखानाच्या जागेवर नेमणूक केली. त्याच्या मदतीस सरदार जसवंतसिंह होताच. पण त्यांच्या हातून कांहीं कामगिरी होत नाहीं असें दिसून येतांच त्यानें मिर्झा राजा जयसिंह याची नेमणूक त्या कामावर केली व त्याच्या हाताखालीं पठाण सरदार दिलीरखान यास दिलें. राजा जयसिंह हा लहानपणापासून मोंगलांच्या सैन्यांत होता. मध्य एशिया, अफगाणिस्तान, पंजाब इत्यादि प्रदेशांत व दक्षिणेकडेसुद्धां मोंगल सैन्यांत तो लढला होता व अनेक विजय त्यानें मिळविले होते. बादशाही सैन्यांत त्याचा मान शहाजाद्याच्या (युवराजाच्या)

बरोबरीचा होता. शिवाय कित्येक वर्षांचा अनुभव जमेस असल्यानें लष्करी पराक्रमाच्या बरोबरीनें मुत्सद्दीपणाची जोड त्याच्या स्वभावास मिळाली होती. बादशहानें त्याला सर्वाधिकार दिले होते; दक्षिणेंतल्या आपल्या सर्व अधिकाऱ्यांना, किल्लेदारांना व लष्करी अंमलदारांना जयसिंहाच्या हुकमतीखालीं वागण्याचे हुकूम औरंगजेबानें सोडले होते.

इ. स. १६६५ च्या जानेवारींत राजा जयसिंह बऱ्हाणपुरास पोंचला व तेथून सैन्याची वगैरे जमवाजमव करून फेब्रुवारीच्या आरंभीं औरंगाबादेस येऊन दाखल झाला. मार्च महिन्याच्या ३ तारखेस तो पुण्यास येऊन पोंचला.

जयसिंहाची ही स्वारी म्हणजे श्री शिवाजीमहाराजांवर फार मोठें संकट होतें. कारण जयसिंहाची लष्करी तयारी तर दांडगी होतीच, पण त्याचें कर्तृत्व व मुत्सद्दीपण त्याहूनहि मोठें होतें. विजापूर दरबाराशीं मोंगलांचें पूर्वीं अनेक वेळां युद्ध झालें होतें, आणि मोंगलांचें भय आपणांला फार दांडगें आहे हें विजापूरकर ओळखून होते. त्यामुळें, शिवाजी कदाचित् विजापूरकरांकडून जिंकून घेतलेला तळकोंकणचा प्रदेश परत देऊन विजापूरची कुमक मिळवील ही शक्यता होती. म्हणून जयसिंहानें आपला तळ विजापूर आणि शिवाजीचा मुलूख यांच्यामध्यें ठोकला व शिवाय विजापूरकरांशीं गोडगोड बोलणीं चालू ठेविलीं. त्याबरोबरच भरपूर द्रव्य देऊन व मोठाल्या पगाराच्या नोकऱ्यांचें आमिष दाखवून शिवाजीच्या भागांतले मराठे सरदार फोडण्याचा क्रम त्यानें आरंभिला. इकडे पुरंदरच्या किल्ल्याला दिलीरखानानें वेढा घातला. त्या किल्ल्यावर शिवाजीच्या विश्वासांतला शूर सेनापति मुरारबाजी हा होता. त्यानें व त्याच्या हाताखालच्या लोकांनीं पराक्रम करून मोंगल फौजांची मनस्वी हानि केली. पण मोंगलांचें सामर्थ्य फार वरचढ होतें; आणि जयसिंहानें आपल्या फौजा ठिकठिकाणीं पेरून ठेवल्या असल्यानें त्यांचा पाडाव करून पुरंदरवरच्या शिबंदीला कुमक पोंचविणें किंवा दिलीरखानाच्या फौजेवर बाहेरून हल्ला चढविणें शिवाजीला जमण्याजोगें नव्हतें. शिवाय, राजा जयसिंह हा हिंदु असल्यानें त्याच्यामार्फत औरंगजेबाशीं तह करणेंच अधिक श्रेयस्कर होय असें शिवाजीस वाटलें. जयसिंहाचे प्रयत्न त्याच दिशेनें चालले होते. म्हणून

शरण येण्याचें कबूल करून शिवाजी जयसिंहाच्या भेटीस गेला. त्याच्या पूर्वींच मुरारबाजी लढतां लढतां मृत्यु पावला होता व पुरंदर किल्ल्यावरचे शिवाजीचे लोक अगदीं टेकीस आले होते.

जयसिंह व शिवाजी यांचीं बोलणीं होऊन, औरंगजेब बादशहाच्या परवानगीनें तहाच्या अटी ठरल्या. केवळ बारा किल्ले स्वतःकडे ठेवून वीस किल्ले शिवाजीनें मोंगलांच्या स्वाधीन करावयाचे; स्वतः शिवाजीनें मोंगल बादशहाचें मांडलिकत्व पतकरून विजापूर हस्तगत करण्याच्या कामीं मोंगलांना लष्करी मदत करावयाची; व राहिलेला प्रदेश शिवाजीकडे बादशहाची जहागीर म्हणून रहावयाचा, हीं, पुरंदरचा तह म्हणून प्रसिद्ध असलेल्या या तहाचीं प्रमुख कलमें होतीं. या तहनाम्यास अनुसरून स्वतःची फौज घेऊन शिवाजी मोंगल सैन्यांत दाखल झाला, व विजापूरकरांविरुद्ध प्रत्यक्ष लढूं लागला. परंतु याच सुमारास जयसिंह व दिलीरखान यांच्यांत वितुष्ट आल्यामुळें विजापूरवर चालून जाण्याचा बेत मागें पडला.

शिवाजी जोंवर दक्षिणेंत आहे तोंवर विजापूरचा पाडाव करणें अशक्य आहे; कारण शिवाजी विजापूरकरांस केव्हां जाऊन मिळेल याचा नेम नाहीं, असें भय जयसिंहास सारखें वाटत होतें. तें त्यानें बादशहास लिहून कळविलें: “ शिवाजीला तुमच्या भेटीस पाठविण्याची परवानगी मला द्या, म्हणजे त्याला तुमच्याकडे पाठवून देतों व त्या काळांत विजापूर जिंकण्याची कामगिरी पुरी करतों, ” असा जयसिंहानें बादशहास सल्ला दिला; तो औरंगजेबालाहि पटला.

परंतु बादशहाच्या भेटीस जाण्याचें शिवाजी सहजासहजीं कबूल करणार नाहीं हें जयसिंहास माहीत होतें. औरंगजेबाचा कपटी स्वभाव महशूर होता, परंतु जयसिंहानें शिवाजीपुढें अनेक आमिषें ठेवलीं. “ बादशहाला तुम्हीं प्रसन्न केलें तर दक्षिणेची सुभेदारी तुम्हांस मिळून तुमचे मनोरथ पूर्ण होतील, ” इत्यादि प्रकारचीं आश्वासनें शिवाजीला दिलीं. शिवाय, “ तुमच्या जिवास कोणताहि अपाय आम्ही होऊं देणार नाहीं, त्याबद्दल मी व माझा पुत्र जामीन राहूं, ” अशा शपथा जयसिंह व त्याचा पुत्र रामसिंह यांनीं घेतल्या व असा लेखी करार शिवाजीकडे पाठवून दिला.

शिवाजीमहाराजांनी औरंगजेबाच्या भेटीचा हा धोका कां पत्करला याचा पूर्ण उलगडा होत नाहीं. कारण, सिंहाच्या गुहेंत आपण होऊन शिरणें योग्य नाहीं असें त्यांच्या अनेक सल्लागारांचें म्हणणें होतें. बहुधा “ उत्तरेकडे इतमामानें जाण्याची ही संधि आपण दवडूं नये; त्यायोगें तिकडची परिस्थिति समक्ष पाहण्यास मिळेल; रजपूत सरदारांच्या भेटी-गांठी होतील; हिंदु राज्य स्थापण्याचा आपला मनोदय तिकडेहि पसरवितां येईल ” असा कांहीं विचार शिवाजीमहाराजांनीं केला असावा. आणि राजा जयसिंह व रामसिंह याच्या शब्दावर भरंवसा ठेवण्यास हरकत नाहीं असेंहि त्यांना वाटलें असावें.

निघण्यापूर्वी शिवाजीमहाराजांनीं, आपल्या राज्याची व्यवस्था कशी चालविण्यांत यावी याबद्दल सर्व तजवीज करून ठेवली. स्वतःवर भलता-सलता प्रसंग गुदरला तरी मागें सर्व गोष्टी सुरळीत चालाव्या असें त्यांचें सर्वांना सांगणें होतें. यावरून, हा धोका त्यांनीं जाणूनबुजून, कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरून पत्करला हें उघड होतें. मुख्य कारभार व हुकमत त्यांनीं जिजाबाईकडे सोंपविली. प्रधान मोरोपंत पिंगळे, मुजुमदार निळो सोनदेव व सेनापति प्रतापराव गुजर यांनीं जिजाबाईच्या आज्ञेंत वागावयाचें होतें. आपले किल्ले त्यांनीं स्वतः फिरून पाहिले व किल्लेदारांना योग्य सूचना देऊन ठेवल्या. ५-३-१६६६ रोजीं बरोबर चार हजार स्वार घेऊन पुत्र संभाजी यासह महाराज उत्तरेकडे जाण्यास निघाले ते ९ मे रोजीं आग्रा राजधानीच्या बाहेर येऊन बागेंत उतरले. १२ मे रोजीं बादशहाचा वाढदिवस होता; त्या वेळीं शिवाजीनें दरबारांत भेटीस यावें असें बादशहानें फर्माविलें. नेमलेल्या दिवशीं शिवाजी दरबारास गेला. बरोबर संभाजी व दहा अंमलदार होते.

जयसिंहाचा पुत्र रामसिंह यानें संभाजी व शिवाजी यांस बादशहापुढें नेलें. प्रणाम, नजराणा वगैरे झाल्यावर बादशहानें खूण करतांच चोपदारांनीं शिवाजीला तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत नेऊन उभें केलें. हा अपमान शिवाजीस सहन झाला नाहीं. शिवाजी एवढा संयमी व जपून वागणारा, पण राग अनावर होऊन तो रामसिंहाजवळ त्वेषानें बोलूं लागला. राम-

सिंहानें त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ यत्न केला, पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. नंतर मुक्कामीं गेल्यावरसुद्धां, बादशहानें आपला जाणूनबुजून अपमान केला व आपणास फसविलें अशी ओरड शिवाजीनें चालूच ठेविली. जवळच्या अधिकाऱ्यांनीं हें सर्व वर्तमान बादशहाच्या कानांवर घातलें. त्यामुळें त्याच्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला. त्यानें रामसिंहास अशी ताकीद दिली कीं, "शहराच्या तटाबाहेर त्याला जयपूर बंगल्यांत बंदोबस्तानें ठेवा. तुम्ही त्याच्यावर सक्त नजर ठेवावी. तो निसटून गेला तर तुम्हांस जबाबदार धरण्यांत येईल."

आपणाला बादशहानें अटकेंत ठेवलें आहे हें शिवाजीच्या लक्षांत येण्यास वेळ लागला नाहीं. बादशहानें आपल्यास भेटीस बोलावलें तर आपण त्याच्या संशयाची निवृत्ति करूं असा निरोप शिवाजीनें बादशहास धाडला. पण बादशहानें तो अमान्य केला. शिवाजी धोकेबाज आहे, एकांतांत त्याची भेट घ्यायची सोय नाहीं असें बादशहानें मनाशीं पक्कें ठरवून ठेवलें होतें. दरबारांत शिवाजीची व बादशहाची भेट झाली तीच पहिली व शेवटची ठरली.

आतां पुढें काय करावें, या कारागृहांतून मुक्तता कशी करून घ्यावी या विचारांत जसा शिवाजी होता तसा बादशहाहि, शिवाजीचें काय करावें या विवंचनेंत होता. शिवाजीस ठार मारावें असा एक विचार त्याच्या मनांत येई; पण जयसिंह व रामसिंह यांची जामिनकी शिवाजीला असल्यामुळें रजपूत राजे बंड करून उठतील असें भय त्याला वाटत होतें. शिवाय शिवाजीस अटक झाल्याची वातमी दक्षिणेंत पोंचल्यावर राजा जयसिंहानें बादशहाला असें लिहून कळविलें कीं, "शिवाजीला परत सुरक्षित पोंचविण्याचें वचन मीं व माझ्या मुलानें दिलें आहे. शिवाय त्याला मारून आपला कांहीं फायदा होणार नाहीं. त्यानें आपल्या मागें फार उत्तम बंदोबस्त करून ठेवला आहे. त्याचे सर्व लोक त्वेषानें आपल्यावर तुटून पडतील व तो कायमचा उद्योग होऊन बसेल. त्याच्याशीं समजुतीनें वागण्यांतच आपला जास्त फायदा आहे."

परंतु औरंगजेबाला हा सल्ला पटण्याजोगा नव्हता. शिवाय बादशहाची मामी — शाहिस्तेखानाची बायको — हिचा सारखा तगादा शिवाजीला

मारून टाका असा होता. दुसरा पक्ष रजपूत राजांचा व कांहीं मुसलमान सरदारांचाहि असें म्हणणारा होता कीं, बादशहानें आपलें वचन मोडूं नये, शिवाजीला सन्मानानें परत पाठवून द्यावें, आणि मग युद्ध वगैरे काय करायचें तें पाहावें. बादशहाची मुलगी झेबुन्निसा हिचा आग्रह शिवाजीला अनुकूलच होता. बरोबरीचा योग्य वर न मिळाल्यामुळें बादशहांच्या मुलींना पुष्कळदां यावज्जीव अविवाहित रहावें लागे. झेबुन्निसेनें शिवाजीच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या होत्या. दरबारांत त्याला चिकाच्या पडद्यांतून तिनें पाहिलेंहि होतें. तिचा तगादा शिवाजीला वश करून घ्यावें व त्याच्याशीं आपलें लग्न लावून द्यावें असा होता. अर्थात् असला सल्ला बादशहास पटणें शक्य नव्हतें. त्याच्या मनांतून शिवाजीला ठार करावें अथवा जन्मभर कैदेंत ठेवावें असें होतें. परंतु औरंगजेब कपटी व दगलबाज असला तरी अविचारी नव्हता. जें काय करावयाचें तें शांतपणें, दूरवर विचार करून करावयाचें अशी त्याची पद्धत होती. अशा प्रकारें तीन महिने निघून गेले.

इतर सर्व उपाय थकल्यावर कांहीं तरी युक्तिच केली पाहिजे असें शिवाजीनें ठरविलें व आपलें वर्तन सर्वतोपरीं बदललें. "आतां मला कसलाहि आधार नाहीं, बादशहा सांगतील तसें वागण्यास आपण तयार आहों," असें तो ज्याच्या त्याच्याजवळ बोलूं लागला. आपला लवाजमा परत पाठविण्याची परवानगी त्यानें मागितली. ती बादशहानें लगेच दिली. बंदोबस्त ठेवण्याचा तेवढा त्रास कमी झाला असें बादशहाला वाटलें. नंतर शिवाजीनें आजारी पडल्याचें सोंग केलें व शांति, अनुष्ठानें इत्यादिकांच्या मिषानें ब्राह्मणांना मिठाई वगैरे पाठविण्यास त्यानें सुरुवात केली. असेच मिठाईचे मोठाले पेटारे, नजराणा म्हणून, दरबारी लोकांकडेहि तो पाठवूं लागला. दोन असामींनीं उचलण्याजोग्या कावडी करावयाच्या; दांडीला मध्यभागीं मिठाईचा पेटारा बांधलेला असावयाचा — अशी ही व्यवस्था होती. आरंभीं आरंभीं पहारेकरी पेटारे काळजीपूर्वक तपासून पाहात. पण ही बाब जेव्हां नित्याचीच होऊन बसली तेव्हां त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें.

तारीख १७ ऑगस्ट १६६६ रोजीं शिवाजीचा नोकर पहारेकऱ्यास म्हणाला, "आज महाराजांची प्रकृति अधिकच बिघडली आहे. दोन दिवस

१०२०८

झोंप नाहीं. तरी गडबड करूं नका व त्यांना त्रास देऊं नका. " हिरोजी फर्जंद व मदारी मेहेतर असे दोनचे इसम शिवाजीच्या जवळ होते. सूर्यास्ताच्या सुमारास महाराजांच्या बिछान्यावर हिरोजी निजून राहिला. महाराजांच्या हातांत सोन्याचें कडें असे; तो हात हिरोजीनें पांघरुणाच्या बाहेर ठेवला होता. आणि शिवाजी व संभाजी हे दोन पेटाऱ्यांत बसून, कावडींतून, पहारेकऱ्यांच्या देखत, कोणास वहीम न येतां निघून गेले. बरोबर आणखीहि कावडी होत्या. भोयांनीं शिवाजीची कावड अंधारांत शहराबाहेर आणून ठेवली. तेथून शिवाजी व संभाजी चालत सहा मैल संकेतस्थळीं गेले. तेथें शिवाजीचे लोक घोडे तयार ठेवून वाटच पाहात होते. पाठलाग होऊं नये म्हणून दक्षिणेकडे न जातां शिवाजी व संभाजी घोड्यावर बसून उत्तरेकडे मथुरेस गेले. तेथें शिवाजीनें व बरोबरच्या लोकांनीं बैराग्याचा वेष घेतला. मथुरेस मोरोपंत पिंगळ्यांचे आप्त रहात होते त्यांच्याकडे संभाजीला ठेवलें. आणि तीर्थयात्रा करीत गोंडवन, गोवळकोंडा, विजापूर या मार्गें २०-११-१६६६ रोजीं बैराग्याच्या वेषांत शिवाजी रायगडास पोंचला. शिवाजी सुटून आल्याचें वर्तमान ऐकून मराठे लोकांत केवढा आनंद पसरला असेल याची कल्पनाच केलेली बरी. शिवाजी खरोखर अवतारी पुरुष व एतदर्थ अजिंक्य होय अशी सर्वांची भावना झाली.

शिवाजी व संभाजी पेटाऱ्यांत बसून निघून गेल्यावर, हिरोजी फर्जंद शिवाजीच्या बिछान्यावर तसाच निजून राहिला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहारेकऱ्यांनीं कडें असलेला हात पाहिला व त्यांना वाटलें कीं शिवाजीला बरें नसल्यानें तो निजून राहिला आहे. जवळ नोकर पाय दाबीत बसलाच होता. दोन प्रहर उलटून गेल्यावर ते दोघेहि बाहेर आले व शिपायांस म्हणाले, " आत्तां कोठें महाराजांचा डोळा लागला आहे; त्यांना उठवूं नका व जवळ गडबड करूं नका. थोड्या वेळांत आम्ही परत येतों. " असें बोलून ते दोघे गेले ते परत आलेच नाहींत. पुष्कळ वेळ झाला तरी सामसूमच; तेव्हां काय आहे तें पाहावें म्हणून पहारेकरी आंत जाऊन पाहतात तों आंत कोणीच नाहीं ! त्यांनीं लगेच सर्व प्रकार पोलादखान फौजदाराला कळविला. त्यानें औरंगजेबाच्या कानावर सर्व हकीकत घातली. त्यानें लगेच शिवाजीचा पाठलाग करण्यास चोहोंकडे, विशेषतः दक्षिणेकडे

लोक पाठविले, व सर्व बादशाही ठाण्यांवर हुकूम पोंचविले. पण तोंपर्यंत चोवीस तासांहून अधिक वेळ लोटला होता. एवढा वेळ शिवाजीला पुष्कळ झाला.

औरंगजेबाला रामसिंहाचा वहीम आला. रामसिंह व जयसिंह या दोघांवरहि त्याची इतराजी झाली. जयसिंहाची दक्षिणेकडची हुकमत त्यानें काढून घेतली. ब्र्हाणपूर येथें औरंगजेबाकडून करविल्या गेलेल्या विषप्रयोगानें हा शूर सेनापति मरण पावला. रामसिंहास आसामांत कामगिरीवर पाठविले. तिकडे तोहि तिकडच्या वाईट हवेनें मृत्यु पावला.

## श्री शिवाजीमहाराजांच्या हेतूंची पूर्तता : मराठी राष्ट्राची निर्मिति

श्री शिवाजीमहाराज अशा प्रकारें आग्र्याहून जेव्हां निसटून आले आणि जयसिंहप्रभृतींचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले तेव्हां औरंगजेबापुढें फार मोठा पेंच उभा ठाकला. त्याला हें एक प्रकारचें आव्हानच होतें. तें स्वीकारावयाचें म्हणजे स्वतः दक्षिणेंत यावयाचें व शिवाजीचा पुरता मोड करावयाचा. पण हें साहस त्याच्यानें करवलें नाहीं. अफगाणांचें युद्ध, रजपूत राजांची बंडखोरी इत्यादि सबबी पुढें करून ती जबाबदारी त्यानें टाळली. खरा प्रकार असा आहे कीं, त्याला शिवाजीचें भय वाटत होतें. त्याला वाटे, आपण स्वतः ही मोहीम अंगावर घेतली आणि आपणास अपयश आलें तर आपली जगभर नामुष्की होईल; त्यापेक्षां झांकली मूठ सव्वा लाखाची या न्यायानें स्वस्थ बसणेंच बरें. शिवाजी असेतों औरंगजेब या भानगडींत पडलाच नाहीं. शिवाजीच्या मृत्यूनंतर मात्र दोनच वर्षांनीं तो दक्षिणेंत आला व स्वतःच्या मृत्यूपर्यंत पंचवीस वर्षें इकडेच राहिला. या पंचवीस वर्षांत त्याला अफगाणांची व रजपुतांची अडचण भासली नाहीं! यावरून हें अनुमान सहजच निघतें कीं, केवळ आपली नामुष्की होऊं नये म्हणून त्यानें शिवाजीवर चालून येण्याचें टाळलें.

शिवाजीनेंहि, मुद्दाम औरंगजेबास डिवचण्याच्या भानगडींत न पडतां नरमाईचेंच धोरण ठेवलें. आग्र्याहून परतल्यावर दोन-तीन वर्षें कोणताहि युद्धप्रसंग त्यानें उकरून काढला नाहीं. हा काळ त्यानें आपल्या राज्याची अंतःस्थिति सुधारण्यांत घालविला.

दक्षिणेच्या कारभारावर औरंगजेबाचा मोठा मुलगा मोअज्जिम हा होता; आणि जशवंतसिंह व दिलीरखान हे त्याचे मदतनीस होते. त्यांच्याशीं शिवाजीनें असें बोलणें चालविलें, कीं, " बादशहांच्याविषयीं माझ्या मनांत कसलेंहि वैषम्य नाहीं. त्यांनींच मला अकारण कैदेंत टाकलें म्हणून मला स्वतःचा प्राण वांचविण्यासाठीं निसटून यावें लागलें. यांत माझी कांहींच चूक नाही. तरी तुम्ही माझ्या वतीनें बादशहांच्याकडे रदबदली करून त्यांचा व माझा लोभ जमवून आणावा." या प्रस्तावास मोअज्जिम वगैरेंची संमति मिळतांच, शिवाजीनें बाळाजी आवजी चिटणिसास, बरोबर लवाजमा देऊन, तहाचीं बोलणीं करण्यास औरंगाबादेस पाठविलें. वाटाघाटींत असें ठरलें कीं, पूर्वींचा पुरंदरचा तह कायम करावा व शिवाजीचें स्वतंत्र राज्य बादशहानें मान्य करावें.

याप्रमाणें मोंगल बादशहाकडून शिवाजीनें आपलें स्वतंत्र राज्य कबूल करून घेतलें. बंडखोर गणला जाणारा इसम राजा म्हणून मान्यता पावला. त्यामुळें मोंगलांचे प्रांतोप्रांतींचे सुभेदार, जंजिऱ्याचे शिद्दी, गोवळकोंडा व विजापूर येथील सुलतान व सर्वसामान्य लोक या सर्वांकडून शिवाजीस 'स्वतंत्र राजा' म्हणून मान मिळूं लागला. शिवाय मोअज्जिमकडून शिवाजीनें चौथाई सरदेशमुखीच्या आपल्या हक्कास मान्यता मिळविली. विजापूर व गोवळकोंडा यांच्या राज्यांतून आपण ही वसुली करूं, त्यास मोंगल बादशहांनीं हरकत करूं नये असा करार झाला. यायोगें विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही दोन्ही राजवटी घाबरल्या. त्यांनीं शिवाजीचा हक्क मान्य केला व त्यास सालीना तीन लाख व पांच लाख रुपये देण्याचें कबूल केलें !

हा शिवाजीमहाराजांच्या राजनीतीचा व पराक्रमाचा प्रत्यक्ष विजय होय.

श्री शिवाजीमहाराजांनीं हिंदूंच्या दास्यविमोचनाचे जे प्रयत्न चालविले होते त्यांचा परिणाम, विशेषतः शिवाजीमहाराजांच्या अद्भुत सुटकेनंतर रजपूत राजांवर झाला असला पाहिजे. कारण १६६९ मध्यें औरंगजेब बादशहाला रजपुतांशीं युद्ध सुरू करावें लागलें. ९ एप्रिल १६६९ रोजीं आपल्या राज्यांतील हिंदूंचीं मंदिरें पाडण्याचा हुकूम त्यानें जाहीर

मारून टाका असा होता. दुसरा पक्ष रजपूत राजांचा व कांहीं मुसलमान सरदारांचाहि असें म्हणणारा होता कीं, बादशहानें आपलें वचन मोडूं नये, शिवाजीला सन्मानानें परत पाठवून द्यावें, आणि मग युद्ध वगैरे काय करायचें तें पाहावें. बादशहाची मुलगी झेबुन्निसा हिचा आग्रह शिवाजीला अनुकूलच होता. बरोबरीचा योग्य वर न मिळाल्यामुळें बादशहांच्या मुलींना पुष्कळदां यावजीव अविवाहित रहावें लागे. झेबुन्निसेनें शिवाजीच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या होत्या. दरबारांत त्याला चिकाच्या पडद्यांतून तिनें पाहिलेंहि होतें. तिचा तगादा शिवाजीला वश करून घ्यावें व त्याच्याशीं आपलें लग्न लावून द्यावें असा होता. अर्थात् असला सल्ला बादशहास पटणें शक्य नव्हतें. त्याच्या मनांतून शिवाजीला ठार करावें अथवा जन्मभर कैदेंत ठेवावें असें होतें. परंतु औरंगजेब कपटी व दगलबाज असला तरी अविचारी नव्हता. जें काय करावयाचें तें शांतपणें, दूरवर विचार करून करावयाचें अशी त्याची पद्धत होती. अशा प्रकारें तीन महिने निघून गेले.

इतर सर्व उपाय थकल्यावर कांहीं तरी युक्तिच केली पाहिजे असें शिवाजीनें ठरविलें व आपलें वर्तन सर्वतोपरीं बदललें. "आतां मला कसलाहि आधार नाहीं, बादशहा सांगतील तसें वागण्यास आपण तयार आहों," असें तो ज्याच्या त्याच्याजवळ बोलूं लागला. आपला लवाजमा परत पाठविण्याची परवानगी त्यानें मागितली. ती बादशहानें लगेच दिली. बंदोबस्त ठेवण्याचा तेवढा त्रास कमी झाला असें बादशहाला वाटलें. नंतर शिवाजीनें आजारी पडल्याचें सोंग केलें व शांति, अनुष्ठानें इत्यादिकांच्या मिषानें ब्राह्मणांना मिठाई वगैरे पाठविण्यास त्यानें सुरुवात केली. असेच मिठाईचे मोठाले पेटारे, नजराणा म्हणून, दरबारी लोकांकडेहि तो पाठवूं लागला. दोन असामींनीं उचलण्याजोग्या कावडी करावयाच्या; दांडीला मध्यभागीं मिठाईचा पेटारा बांधलेला असावयाचा — अशी ही व्यवस्था होती. आरंभीं आरंभीं पहारेकरी पेटारे काळजीपूर्वक तपासून पाहात. पण ही बाब जेव्हां नित्याचीच होऊन बसली तेव्हां त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें.

तारीख १७ ऑगस्ट १६६६ रोजीं शिवाजीचा नोकर पहारेकऱ्यास म्हणाला, "आज महाराजांची प्रकृति अधिकच बिघडली आहे. दोन दिवस

झोंप नाहीं. तरी गडबड करूं नका व त्यांना त्रास देऊं नका. ” हिरोजी फर्जंद व मदारी मेहेतर असे दोनचे इसम शिवाजीच्या जवळ होते. सूर्यास्ताच्या सुमारास महाराजांच्या बिछान्यावर हिरोजी निजून राहिला. महाराजांच्या हातांत सोन्याचें कडें असे; तो हात हिरोजीनें पांघरुणाच्या बाहेर ठेवला होता. आणि शिवाजी व संभाजी हे दोन पेटाऱ्यांत बसून, कावडींतून, पहारेकऱ्यांच्या देखत, कोणास वहीम न येतां निघून गेले. बरोबर आणखीहि कावडी होत्या. भोयांनीं शिवाजीची कावड अंधारांत शहराबाहेर आणून ठेवली. तेथून शिवाजी व संभाजी चालत सहा मैल संकेतस्थळीं गेले. तेथें शिवाजीचे लोक घोडे तयार ठेवून वाटच पाहात होते. पाठलाग होऊं नये म्हणून दक्षिणेकडे न जातां शिवाजी व संभाजी घोड्यावर बसून उत्तरेकडे मथुरेस गेले. तेथें शिवाजीनें व बरोबरच्या लोकांनीं बैराग्याचा वेष घेतला. मथुरेस मोरोपंत पिंगळ्यांचे आप्त रहात होते त्यांच्याकडे संभाजीला ठेवलें. आणि तीर्थयात्रा करीत गोंडवन, गोवळकोंडा, विजापूर या मार्गें २०-११-१६६६ रोजीं बैराग्याच्या वेषांत शिवाजी रायगडास पोंचला. शिवाजी सुटून आल्याचें वर्तमान ऐकून मराठे लोकांत केवढा आनंद पसरला असेल याची कल्पनाच केलेली बरी. शिवाजी खरोखर अवतारी पुरुष व एतदर्थ अजिंक्य होय अशी सर्वांची भावना झाली.

शिवाजी व संभाजी पेटाऱ्यांत बसून निघून गेल्यावर, हिरोजी फर्जंद शिवाजीच्या बिछान्यावर तसाच निजून राहिला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहारेकऱ्यांनीं कडें असलेला हात पाहिला व त्यांना वाटलें कीं शिवाजीला बरें नसल्यानें तो निजून राहिला आहे. जवळ नोकर पाय दाबीत बसलाच होता. दोन प्रहर उलटून गेल्यावर ते दोघेहि बाहेर आले व शिपायांस म्हणाले, “ आत्तां कोठें महाराजांचा डोळा लागला आहे; त्यांना उठवूं नका व जवळ गडबड करूं नका. थोड्या वेळांत आम्ही परत येतों. ” असें बोलून ते दोघे गेले ते परत आलेच नाहींत. पुष्कळ वेळ झाला तरी सामसूमच; तेव्हां काय आहे तें पाहावें म्हणून पहारेकरी आंत जाऊन पाहतात तों आंत कोणीच नाहीं ! त्यांनीं लगेच सर्व प्रकार पोलादखान फौजदाराला कळविला. त्यानें औरंगजेबाच्या कानावर सर्व हकीकत घातली. त्यानें लगेच शिवाजीचा पाठलाग करण्यास चोहोंकडे, विशेषतः दक्षिणेकडे

लोक पाठविले, व सर्व बादशाही ठाण्यांवर हुकूम पोंचविले. पण तोंपर्यंत चोवीस तासांहून अधिक वेळ लोटला होता. एवढा वेळ शिवाजीला पुष्कळ झाला.

औरंगजेबाला रामसिंहाचा वहीम आला. रामसिंह व जयसिंह या दोघांवरहि त्याची इतराजी झाली. जयसिंहाची दक्षिणेकडची हुकमत त्यानें काढून घेतली. बऱ्हाणपूर येथें औरंगजेबाकडून करविल्या गेलेल्या विषप्रयोगानें हा शूर सेनापति मरण पावला. रामसिंहास आसामांत कामगिरीवर पाठविलें. तिकडे तोहि तिकडच्या वाईट हवेनें मृत्यु पावला.

## श्री शिवाजीमहाराजांच्या हेतूंची पूर्तता : मराठी राष्ट्राची निर्मिति

श्री शिवाजीमहाराज अशा प्रकारें आग्र्याहून जेव्हां निसटून आले आणि जयसिंहप्रभृतींचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले तेव्हां औरंगजेबापुढें फार मोठा पेंच उभा ठाकला. त्याला हें एक प्रकारचें आव्हानच होतें. तें स्वीकारावयाचें म्हणजे स्वतः दक्षिणेंत यावयाचें व शिवाजीचा पुरता मोड करावयाचा. पण हें साहस त्याच्यानें करवलें नाहीं. अफगाणांचें युद्ध, रजपूत राजांची बंडखोरी इत्यादि सबबी पुढें करून ती जबाबदारी त्यानें टाळली. खरा प्रकार असा आहे कीं, त्याला शिवाजीचें भय वाटत होतें. त्याला वाटे, आपण स्वतः ही मोहीम अंगावर घेतली आणि आपणास अपयश आलें तर आपली जगभर नामुष्की होईल; त्यापेक्षां झांकली मूठ सव्वा लाखाची या न्यायानें स्वस्थ बसणेंच बरें. शिवाजी असेतों औरंगजेब या भानगडींत पडलाच नाहीं. शिवाजीच्या मृत्यूनंतर मात्र दोनच वर्षांनीं तो दक्षिणेंत आला व स्वतःच्या मृत्यूपर्यंत पंचवीस वर्षें इकडेच राहिला. या पंचवीस वर्षांत त्याला अफगाणांची व रजपुतांची अडचण भासली नाहीं ! यावरून हें अनुमान सहजच निघतें कीं, केवळ आपली नामुष्की होऊं नये म्हणून त्यानें शिवाजीवर चालून येण्याचें टाळलें.

शिवाजीनेंहि, मुद्दाम औरंगजेबास डिवचण्याच्या भानगडींत न पडतां नरमाईचेंच धोरण ठेवलें. आग्र्याहून परतल्यावर दोन-तीन वर्षें कोणताहि युद्धप्रसंग त्यानें उकरून काढला नाहीं. हा काळ त्यानें आपल्या राज्याची अंतःस्थिति सुधारण्यांत घालविला.

दक्षिणेच्या कारभारावर औरंगजेबाचा मोठा मुलगा मोअज्जिम हा होता; आणि जशवंतसिंह व दिलीरखान हे त्याचे मदतनीस होते. त्यांच्याशीं शिवाजीनें असें बोलणें चालविलें, कीं, "बादशहांच्याविषयीं माझ्या मनांत कसलेंहि वैषम्य नाहीं. त्यांनींच मला अकारण कैदेंत टाकलें म्हणून मला स्वतःचा प्राण वांचविण्यासाठीं निसटून यावें लागलें. यांत माझी कांहींच चूक नाही. तरी तुम्ही माझ्या वतीनें बादशहांच्याकडे रदबदली करून त्यांचा व माझा लोभ जमवून आणावा." या प्रस्तावास मोअज्जिम वगैरेंची संमति मिळतांच, शिवाजीनें बाळाजी आवजी चिटणिसास, बरोबर लवाजमा देऊन, तहाचीं बोलणीं करण्यास औरंगाबादेस पाठविलें. वाटाघाटींत असें ठरलें कीं, पूर्वींचा पुरंदरचा तह कायम करावा व शिवाजीचें स्वतंत्र राज्य बादशहानें मान्य करावें.

याप्रमाणें मोंगल बादशहाकडून शिवाजीनें आपलें स्वतंत्र राज्य कबूल करून घेतलें. बंडखोर गणला जाणारा इसम राजा म्हणून मान्यता पावला. त्यामुळें मोंगलांचे प्रांतोप्रांतींचे सुभेदार, जंजिऱ्याचे शिद्दी, गोवळकोंडा व विजापूर येथील सुलतान व सर्वसामान्य लोक या सर्वांकडून शिवाजीस 'स्वतंत्र राजा' म्हणून मान मिळूं लागला. शिवाय मोअज्जिमकडून शिवाजीनें चौथाई सरदेशमुखीच्या आपल्या हक्कास मान्यता मिळविली. विजापूर व गोवळकोंडा यांच्या राज्यांतून आपण ही वसुली करूं, त्यास मोंगल बादशहांनीं हरकत करूं नये असा करार झाला. यायोगें विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही दोन्ही राजवटी घाबरल्या. त्यांनीं शिवाजीचा हक्क मान्य केला व त्यास सालीना तीन लाख व पांच लाख रुपये देण्याचें कबूल केलें !

हा शिवाजीमहाराजांच्या राजनीतीचा व पराक्रमाचा प्रत्यक्ष विजय होय.

श्री शिवाजीमहाराजांनीं हिंदूंच्या दास्यविमोचनाचे जे प्रयत्न चालविले होते त्यांचा परिणाम, विशेषतः शिवाजीमहाराजांच्या अद्भुत सुटकेनंतर रजपूत राजांवर झाला असला पाहिजे. कारण १६६९ मध्यें औरंगजेब बादशहाला रजपुतांशीं युद्ध सुरू करावें लागलें. ९ एप्रिल १६६९ रोजीं आपल्या राज्यांतील हिंदूंचीं मंदिरें पाडण्याचा हुकूम त्यानें जाहीर

केला. त्यास अनुसरून काशी येथील विश्वेश्वराचें मंदिर पाडण्यांत आलें व त्याचे जागीं मशीद उभारण्यांत आली. ती अद्यापि कायम आहे. याचा परिणाम शिवाजीवर अर्थातच झाला. या अपकृत्याचा निषेध करणारें एक पत्र त्यानें औरंगजेबास पाठविलें आणि स्वधर्मरक्षणाच्या तयारीला तो लागला.

इ. स. १६७० मध्यें मोंगलांचा दक्षिणेकडील प्रतिनिधि शहाजादा मोअज्जिम व त्याचा मदतनीस दिलीरखान यांच्या दरम्यान भांडण जुंपलें. दिलीरखानानें औरंगजेबाकडे अशी कागाळी केली कीं, मोअज्जिम हा मराठ्यांशीं संगनमत करून वागतो व त्यामुळें दक्षिणेंतील लष्करी कारवाई कच्ची पडते. याच्या उलट मोअज्जिमनें अशी तक्रार केली कीं, दिलीरखान बादशहाविरुद्ध बंड करण्याच्या तयारींत आहे. तेव्हां दिलीरखानास कैद करून उत्तरेस पाठवून देण्याची आज्ञा बादशहानें शहाजाद्यास केली. दिलीरखानाला ही खबर कळतांच तो उत्तरेकडे पळत सुटला; आणि त्याचा पाठलाग करण्याच्या तयारीस मोअज्जिम व जशवंतसिंह लागले. जातांना त्यांनीं शिवाजीलाहि आपल्या साह्यास बोलाविलें. यामुळें सर्वत्र एकच गोंधळ उडाला. तेव्हां बादशहानें मोअज्जिम यास एकदम हुकूम सोडला कीं तुम्हीं औरंगाबादेसच रहावें. त्याप्रमाणें तो १६७० च्या सप्टेंबर अखेरीस औरंगाबादेस परतला.

या गोंधळाच्या परिस्थितीचा शिवाजीनें भरपूर फायदा घेतला. त्यानें आपल्या फौजा पाठवून मोंगलांचा मुलूख लुटला व पुरंदरच्या तहाप्रमाणें मोंगलांना दिलेले किल्लेहि परत घेण्यास सुरुवात केली. तानाजी मालुसरे यानें सिंहगडचा किल्ला केवढा पराक्रम करून व आपला प्राण खर्चीं घालून घेतला हें सर्वांना ठाऊकच आहे. निळोपंतानें पुरंदरचा किल्ला परत मिळविला. शिवाजीनें कल्याण, भिवंडी वगैरे नऊ वर्षांपूर्वी शाहिस्तेखानानें घेतलेलीं स्थळें हस्तगत केलीं. माहुलीचा किल्लाहि त्याला मिळाला. कोंकणचा मोंगल सुभेदार लढाईंत जखमी होऊन पळून गेला. त्यामुळें तो प्रांत शिवाजीला मिळाला.

याच सुमारास ( ऑक्टोबर १६७० ) शिवाजीस असें वर्तमान समजलें कीं, सुरतेचा मोंगल सुभेदार मरण पावला असून तेथील शिबंदी मोअज्जिमनें काढून घेतली आहे. या गोष्टीचा फायदा शिवाजीनें तावडतोब घेतला

व सुरतेवर स्वारी करून तेथील मातबर लोकांकडून सहासष्ट लाखांची लूट मिळविली. परत येत असतांना मोंगलांनीं त्याच्याशीं संग्राम केला; पण त्यांत मोंगलांचाच पराभव झाला व त्यांच्याजवळची पुष्कळ संपत्ति व कित्येक घोडे शिवाजीस मिळाले.

याच सुमारास प्रधान मोरोपंत पिंगळे यानें त्रिंबकचा किल्ला घेतला; आणि सेनापति प्रतापराव गुजर यानें उत्तर खानदेशांतलें बहादरपुरा शहर व वऱ्हाडांतलें धनाढ्य शहर कारंजा हीं शहरें लुटलीं. या एका शहरांतून त्याला चार कोट रुपयांचा ऐवज मिळाला. वऱ्हाडांतलीं आणखी कांहीं शहरें त्यानें लुटलीं. शिवाजीनें सर्व वऱ्हाडांतून चौथाई वसूल करण्याचा हुकूम जाहीर केला व प्रतापरावानें त्याची अंमलबजावणी केली.

हें वर्तमान जेव्हां औरंगजेबाच्या कानावर पोंचलें तेव्हां तो फार घाबरून गेला. शहाजादा मोअज्जिम याचाच त्यास वहीम आला; त्यानें शहाजाद्याची सुभेदारी रद्द केली व महाबतखान या नामांकित व अनुभवी सरदारास मोठ्या फौजेसह दक्षिणेकडे पाठविलें. इतकेंच नव्हे तर त्याच्या मदतीस माळव्यांतून दिलीरखान व गुजराथेंतून बहादुरखान यांस पाठविलें. याप्रमाणें १६७१ च्या आरंभापासून १६७२ च्या मध्यापर्यंत मोठाले मोंगल सरदार प्रचंड फौजांसह शिवाजीवर चालून आले असतां त्यानें जो शौर्याचा समरप्रसंग केला व मोंगलांचा पाडाव करून खानदेश, बागलाण, वऱ्हाड इत्यादि प्रांतांत आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें त्यायोगानें शिवाजी हा केवळ गुंड नसून फार श्रेष्ठ दर्जाचा योद्धा व कुशल सेनानी आहे अशी खुद्द बादशहाची व समग्र हिंदुस्थानाची खात्री पटली. या सर्व झटापटींत मुख्य व फार मोठा संग्राम साल्हेर येथें झाला. या लढाईत मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांनीं शौर्याची व लष्करी कौशल्याची पराकाष्ठा केली. आपण घाबरलों असें दाखवून मराठ्यांनीं पळ काढला; आणि मोंगलांची फौज अस्ताव्यस्त होत्साती पाठलागावर आलेली पाहतांच त्यांच्यावर उलटून त्यांची वाताहात करून टाकली. या लढाईत मोंगलांचा फार मोठा पराभव झाला. त्यांचे तीस नामांकित सरदार व दहा हजार सैनिक धारातीर्थीं पडले. सहा हजार घोडे, तितकेच उंट, सवाशें हत्ती व अगणित संपत्ति मराठ्यांच्या हातीं लागली. या पराक्रमाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलेलें आढळतें :

पुण्याच्या कप्या ( कपारी ) गर्जतातो ' शिवाजी ' ।
तिथें नांदतो पेशवा मर्द गाजी ॥
जशीं मर्दिलीं कौरवें अर्जुनानें
तशीं मारिलीं मोगलें पेशव्यानें ॥

' सभासद ' बखरींत या पराक्रमास अनुषंगून पुढील वर्णन आहे :—

" मराठे सरदारांनीं व मावळ्यांनीं बाजेवजीर व उमराव कस्त ( खलास ) केले. वर्तमान ऐकून महाराज बहुत खूष झाले. साखरा वाटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांचे हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. दिलीरखान पळून गेला. शत्रूकडील पाडाव झालेल्या लोकांच्या व सरदारांच्या जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर त्यांस नजराणे देऊन शिवाजीनें सोडून दिलें. ज्याची मर्जी होती ते शिवाजीजवळ राहिले. शिवाजीच्या फौजेंतील ज्यांनीं ज्यांनीं म्हणून विशेष बहादुरी दाखविली त्यांस वस्त्रें-भूषणें देऊन संतुष्ट केलें. "

औरंगजेबानें मोअजिम व महाबतखान यांस परत बोलावून बहादुर-खानाची नेमणूक दक्षिणेस केली व त्याच्या हाताखालीं दिलीरखानास दिलें.

श्री शिवाजीमहाराजांनीं मराठ्यांचें राष्ट्र तयार केलें असें जें आपण म्हणतों तें हेंच. महाराजांनीं, आपल्या ध्येयनिष्ठेनें, पराक्रमानें, प्रचंड साहसानें व अफाट हिकमतबाजपणानें स्वदेशबांधवांमध्यें जें तेज, जी स्फूर्ति, जो आवेश, जी वीरश्री व जें स्वधर्माचें व स्वसंस्कृतीचें प्रेम निर्माण केलें होतें त्याचा उत्कृष्ट परिपाक या सुमारास, महाराजांनीं कार्यास प्रारंभ केल्या-नंतर पचवीस वर्षांनीं, दृष्टोत्पत्तीस आला. मराठे, ब्राह्मण, प्रभू वगैरे जाती-जमातींतून अनेक कर्तबगार पुरुष पुढें आले व प्राणाची पर्वा न करतां राष्ट्रकार्य करीत राहिले. आपण सर्व या राज्याचे घटक आहों, राज्याच्या रक्षणासाठीं व वृद्धीसाठीं आपलें सर्वस्व खर्ची घालणें हें आपलें कर्तव्य आहे ही भावना वृद्धीस लागली. यायोगें व अशा प्रकारें छत्रपति श्रीशिवाजी-महाराजांचें राज्य व मराठ्यांचें राष्ट्र सिद्ध झालें.

विजापूरकरांच्या ताब्यांत गेलेला पन्हाळा किल्ला १६७३ च्या मार्च महिन्यांत शिवाजीनें परत घेतला. त्याची हकीकत मोठी उद्बोधक आहे व मराठ्यांच्या पराक्रमशालित्वावर प्रकाश टाकणारी आहे. पन्हाळा किल्ला

ही रायगडाप्रमाणें शिवाजीची दक्षिणेकडील राजधानी. तो परत घेणें अवश्यच होतें. शिवाजीनें ही कामगिरी अनाजी पंडित व कोंडाजी रवळेकर यांच्यावर सोंपविली. फक्त शें-दोनशें लोक घेऊन हे सरदार अंधाऱ्या रात्रीं पन्हाळ-गडाखालीं आले. कोंडाजीनें शिबंदींतले कांहीं लोक आधींच वश करून घेतले होते. नंतर रात्रीं कोंडाजी साठ माणसांसह दोऱ्यांवरून तटावर चढला. नंतर कर्णे वाजवून त्यांनीं पहारेकऱ्यांमध्यें असा गोंधळ उडवून दिला कीं काय करावें हें कोणास सुचेना. मागाहून अनाजी व त्याचे लोक आंत आले. त्यांनीं किल्लेदारास ठार मारलें. दुसरा अधिकारी नागोजी पंडित म्हणून होता तो पळून गेला आणि अनायासें किल्ला मराठ्यांच्या कबजांत आला. हें वर्तमान रायगडावर महाराजांना कळतांच ते आनंदित होऊन मोठ्या समारंभानें निघून पन्हाळ्यावर आले व तेथील व्यवस्था पाहात एक महिना तेथें राहिले.

पन्हाळा गेल्याचें वर्तमान विजापुरास समजतांच तेथील मुख्य वजीर खवासखान यानें मोठी फौज जमविली व ती बरोबर देऊन बहलोलखान यास पन्हाळा घेण्यास पाठविलें. पण सेनापति प्रतापराव गुजर यांनें उंबराणीच्या लढाईंत त्याचा फार मोठा पराभव केला. स्वतः बहलोलखान मोठ्या अजीजीनें जीवदान मिळवून परत गेला. बहलोलखानास प्रतापरावानें अशा रीतीनें जाऊं दिलें हें शिवाजीस पटलें नाहीं. त्यानें प्रतापरावाची निर्भर्त्सना केली. त्यामुळें प्रतापराव फार खिन्न झाला, आणि कित्येक महिने हुबळी-कोल्हापूरच्या प्रदेशांत विजापूर दरबारच्या फौजांशीं झगडत राहिला. पुढें बहलोलखानास गडहिंग्लजजवळ नेसरीच्या खिंडींत प्रतापरावानें गाठलें आणि अविचारानें थोड्याच घोडेस्वारांनिशीं तो बहलोलखानाच्या फौजेंत घुसला. त्यांत ते सर्व लोक मृत्युमुखीं पडले! शिवाजीचा ठपका जिव्हारीं लागल्या-मुळें प्रतापरावानें हें साहस केलें. शिवाजीसहि याचें फार वाईट वाटलें. पुढें सहा वर्षांनीं याच प्रतापरावाच्या मुलीचें लग्न आपला दुसरा मुलगा राजाराम याशीं शिवाजीनें लाविलें.

## राज्याभिषेक, दक्षिण-दिग्विजय इत्यादि

जून ५ सन १६७४ रोजीं श्री शिवाजीमहाराजांनीं स्वतःला राज्या-भिषेक करवून घेतला. केवळ आपलें राजपद प्रस्थापित करण्यासाठींच नव्हे,

तर इतरांवर अवश्य तो वचक बसविण्यासाठीं ही गोष्ट अवश्य होती. दिल्लीचे मोंगल, विजापूरचे आदिलशहा, गोवळकोंड्याचे कुतुबशहा इत्यादिकांशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणीं करतां यावीं यासाठींहि हें आवश्यक होतें. कारण एरवीं शिवाजीला आदिलशहाच्या दरबारीं नोकरी करणाऱ्या एका सरदाराचा बंडखोर पुत्र म्हणूनच लेखीत. ती अवस्था नाहींशी करण्यासाठीं राज्याभिषेकाची जरूरी होती. शिवाय, हिंदूंचा धार्मिक छळ यापुढें मुसलमानांना करतां यावयाचा नाहीं; त्यांचा पाठीराखा व रक्षणकर्ता एक छत्रपति आहे हेंहि त्याला हिंदुस्थानभर जाहीर करावयाचें होतें. समग्र भारतांतल्या हिंदूंनाहि असें आश्वासन द्यावयाचें होतें कीं, आपल्या धर्माप्रमाणें आचरण करण्याचें तुम्हांस पूर्ण स्वातंत्र्य आहे.

पण हें सर्व करतांना आपल्या बुद्धीचा व वृत्तीचा समतोल शिवाजीनें ढळूं दिला नाहीं. औरंगजेबानें हिंदूंचा छळ आरंभिला म्हणून आपल्या राज्यांतल्या मुसलमानांना उपद्रव देण्याचा विचार त्यानें आपल्या मनांत येऊं दिला नाहीं. त्या मध्ययुगांत मनाचें एवढें औदार्य दाखविणारा व धार्मिक आचारविचारांचें व्यक्तिमात्राचें स्वातंत्र्य मान्य करणारा पुरुष हिंदुस्थानांतच काय पण युरोपमध्येंसुद्धां नव्हता !

देवगिरीचें मराठ्यांचें राज्य लयाला गेल्यापासून तीन-साडेतीनशें वर्षांत राज्याभिषेकाची प्रथा महाराष्ट्रांतून नष्ट झाली होती. उत्तरेकडे मात्र रजपूत राजे राज्याभिषेक करून घेत. म्हणून या विधीची साद्यंत माहिती असलेल्या अशा काशीच्या गागाभट्टाला शिवाजीमहाराजांनीं मुद्दाम आणवून घेतलें. या गागाभट्टाचे पूर्वज मूळचे पैठणचे राहणारे. गागाभट्टाचे एक पूर्वज गोविंदभट्ट हे सोळाव्या शतकाच्या आरंभीं काशीस जाऊन राहिले. गागाभट्ट हा त्यांचा पांचवा वंशज. त्यानें पुण्यास येऊन सर्व राज्याभिषेक-विधि यथासांग केला.

आपल्या मुलाचें हें महद्भाग्य अवलोकन करून स्वतःस कृतकृत्य समजणारी मातुःश्री जिजाबाई पुढें बाराच दिवसांनीं—१७ जून १६७४ रोजीं—पांचाड येथें वारली. शहाजी राजे यांच्या मृत्यूनंतर रायगडाच्या उतरणीवर असलेल्या या गांवीं, शिवाजीनें मुद्दाम बांधलेल्या भव्य वाड्यांत

जिजाबाई रहात होती. शेवटचीं आठ-दहा वर्षें या साध्वीनें येथेंच काढलीं. अनेक थोर पुरुषांच्या थोर मातांच्या कथा आपण वाचतों; परंतु जिजाबाई इतकी करारी, धर्मनिष्ठ, ध्येयवादी, महत्त्वाकांक्षी, विचारवान्, राजकारणकुशल, पुत्रावर केवळ निस्सीम प्रेमच नव्हे तर प्रसंगीं कठोर मार्गदर्शनहि करणारी आणि पुत्राच्या भावी भाग्याचा अचूक अंदाज करून त्याच्यापुढें मोठालीं उद्दिष्टें ठेवणारी महिला जगाच्या इतिहासांत विरळा! जिजाबाईचें पुत्र-वात्सल्य आंधळें नव्हतें; तिची मुत्सद्देगिरी आकुंचित अथवा अदूरदर्शी-पणाची नव्हती; तिच्या मनाची झेंप किरकोळ नव्हती. शिवाजीसारख्या असामान्य महत्तेच्या पुरुषाला साजेशीच माता परमेश्वरानें त्याला दिली होती.

शिवाजीच्या राज्याभिषेक–समारंभानें औरंगजेब अतिशय संतप्त झाला. त्याचा दक्षिणेंतील सरदार बहादुरखान यानें समारंभांत विघ्नें उपस्थित करण्याचे अनेक प्रयत्न केले. म्हणून शिवाजीनें १६७४ च्या जुलै महिन्यांत बहादुरखानाच्या छावणीवर छापा घालण्यासाठीं दोन हजार स्वार पाठ-विले; आणि त्याचा प्रतिकार करण्यासाठीं बहादुरखान छावणी सोडून कित्येक मैल पुढें गेलेला पाहतांच दुसरे सात हजार स्वार त्याच्या छावणी-वर पाठविले. त्यांनीं एक कोटीचा खजिना हस्तगत केला व बादशहाला नजर पाठविण्याकरितां जमविलेले दोनशें सुंदर घोडेहि ताब्यांत घेतले.

श्रीशिवाजीमहाराजांच्या राज्याचा पाया पश्चिम किनाऱ्यावर होता. तेव्हां, सुरतेपासून कारवारपर्यंत सर्व प्रदेश अविच्छिन्न आपल्या ताब्यांत असावा असें महाराजांना वाटे. परंतु या भागांत पोर्तुगीज लोक प्रबळ होते. दर्यावर्दी म्हणूनहि ते वाकबगार होते, आणि बंदुका, तोफा वगैरे तयार करण्यांतहि निपुण होते. ते अचानक शिवाजीच्या प्रदेशावर झडप घालीत, लूट व जाळपोळ करीत आणि हिंदु प्रजेला छळीत अथवा पकडून जबर-दस्तीनें त्यांस ख्रिस्ती करीत. तसेंच ऐन समरप्रसंगीं शिवाजीच्या शत्रूंना ते तोफांची व गोलंदाजांची कुमक पुरवीत. म्हणून पोर्तुगीजांना येथून घालवून देणें, निदान त्यांना धाकांत ठेवणें शिवाजीला अवश्य होतें. या भागांत पोर्तुगीजांच्या बरोबरीनें शिद्दी व इंग्रज यांचाहि उपद्रव शिवाजीला होई. या सर्वांचें उच्चाटन करणें अशक्य वाटून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं

त्यानें कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग इत्यादि ठिकाणें पश्चिम किनाऱ्यावर सिद्ध केलीं. तसेंच किनाऱ्यापासूनचा अंतर्गत प्रदेशसुद्धां कल्याणपासून कारवार बसनूरपर्यंत नवीन किल्ल्यांनीं व लष्करी बंदोबस्तानें त्यानें मजबूत केला. पुढें १६७५ च्या एप्रिल महिन्यांत विजापूरकरांच्या मालकीचा फोंडा किल्ला त्यानें वेढा घालून घेतला. तसेंच पुढें दक्षिणेकडे जाऊन कारवार बंदर, तेथचा किल्ला सदाशिवगड व नजीकचें सोंधे वगैरे प्रदेश त्यानें काबीज केले. पुढें पावसाळा संपल्यावर १६७५ च्या नोव्हेंबर महिन्यांत त्यानें सातारा किल्ला घेतला.

ही झाली पश्चिम किनाऱ्याची हकीकत. तिकडे पूर्व किनाऱ्यावर १६७५ च्या आरंभीं शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी यानें तंजावरचें राज्य संपादन केलें. त्याच्या पदरीं रघुनाथपंत हणमंते या नांवाचा एक चतुर व राजकार्यधुरंधर ब्राह्मण होता. राज्य मिळविण्यांत व तें सुस्थिर करण्यांत व्यंकोजीला या रघुनाथपंताचें पुष्कळ साह्य झालें होतें. पुढें त्या दोघांचा बेबनाव होऊन रघुनाथपंतानें शिवाजीशीं बोलणें चालविलें. गोवळकोंड्यास कुतुबशहाच्या दरबारीं मादण्णा या नांवाचा हिंदुच मुख्य कारभारी होता. तो अत्यंत विद्वान् व कुशल होता. त्याच्यामार्फत रघुनाथपंतानें कुतुबशहावर छाप बसविली आणि शिवाजी व कुतुबशहा यांचें सख्य जुळवून आणून तंजावर वगैरे प्रदेशावरच्या स्वारीची मसलत सिद्ध केली. इ. स. १६७७ च्या आरंभीं शिवाजीचे सरदार हंबीरराव मोहिते व धनाजी जाधव यांनीं दक्षिणचा दरवाजा म्हणून प्रसिद्ध असलेलें कोप्पल हें ठिकाण, विजापूरकरांच्या सैन्यांचा फार मोठा पराभव करून हस्तगत केलें.

इ. स. १६७७ च्या आरंभीं शिवाजीनें भागानगर (हैद्राबाद) येथें कुतुबशहाची भेट घेतली. उभयतांचा तह झाला. कुतुबशहानें शिवाजीला फार मोठें द्रव्यसाहाय्य केलें व पूर्व किनाऱ्यावरचा व दक्षिणेकडील प्रदेश जिंकण्याचें ठरलें. १६७७ च्या मे महिन्यांत शिवाजी आपल्या फौजेनिशीं मद्रासच्या आसमंतांत दाखल झाला. लौकरच, विजापूरकरांच्या मालकीचा जिंजी हा किल्ला त्यानें हस्तगत केला. हा किल्ला मूळचाच दुर्गम होता. पण शिवाजीनें त्याची आणखी डागडुजी करून त्याला अधिकच पक्केपणा आणला.

तेथून वेलोरचा वेढा आपल्या एका सेनापतीवर सोंपवून शिवाजी आपला बंधु व्यंकोजी याच्या भेटीसाठीं तंजावराकडे निघाला व तंजावरच्या उत्तरेस दहा मैलांवर तिरुमलवाडी येथें छावणी करून राहिला. ( जुलै १६७७ ). शिवाजीचा उद्देश, व्यंकोजीनें विजापूरची ताबेदारी सोडून आपल्या सार्वभौम सत्तेचा मांडलिक म्हणून रहावें असा होता. पण सलोख्यानें व समजुतीनें मसलत तडीस जाण्याचा रंग दिसेना. आणि बंधूवर स्वतः चालून जाणें बरें नव्हे म्हणून शिवाजी महाराष्ट्रांत परतला. मागें शिवाजीचे सेनापति व कुशल वकील होते. त्यांत रघुनाथ हणमंते प्रमुख होता. त्यानें शिवाजी व व्यंकोजी यांच्या दरम्यान तह जुळवून आणला.

श्रीशिवाजीमहाराज दक्षिणेच्या स्वारीवर असतांना इकडे औरंगजेबानें मराठ्यांच्या पारिपत्याची तयारी चालविली होती. म्हणून कर्नाटकची कामगिरी रघुनाथपंत, संताजी भोसले, धनाजी जाधव इत्यादिकांवर सोंपवून व १६७७ च्या अखेरीस तुंगभद्रा उतरून बंकापूर, लक्ष्मेश्वर, कोप्पल, गदग वगैरे विजापुरी ठाणीं हस्तगत करून १६७८ च्या एप्रिल महिन्यांत महाराज पन्हाळ्यास दाखल झाले. मे महिन्यांत ते रायगडास येऊन पोंचले.

याच्यापुढचा शिवाजीचा काळ काळजींत गेला. राज्याचा विस्तार वाढला, पण मोंगलांच्या आक्रमणापासून त्याचा बचाव करण्याची जबाबदारीहि वाढली. त्यांत संभाजी मोंगलास जाऊन मिळाल्यामुळें शिवाजीच्या विवंचनेंत अधिकच भर पडली. पुढें दिलीरखानाचा हिंदुद्वेष दिसून आल्यावर संभाजी त्याच्या छावणींतून निसटून पन्हाळ्यास दाखल झाला ( ४-१२-१६७९ ). शिवाजीनें त्याचें मन अधिक न दुखवतां त्याला उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या. त्यासाठीं तो एक महिनाभर पन्हाळ्यास राहिला, पण त्याचा उपयोग होण्याचें चिन्ह दिसेना. यायोगें शिवाजीची प्रकृति क्षीण होत चालली. आपल्यामागें, एवढ्या कष्टानें मिळविलेल्या स्वराज्याचें रक्षण कोण करणार याची चिंता त्यास वाटूं लागली. कारण दुसरा मुलगा राजाराम लहान, केवळ दहा वर्षांचा. संभाजीची समजूत काढण्याचा शिवाजीनें पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याची सुधारणा होण्याचा रंग दिसेना. तेव्हां पन्हाळ्यावर संभाजीला विश्वासू सरदारांच्या बंदोबस्ता-

खालीं ठेवून शिवाजी रायगडावर परतला. तेथें ७-३-१६८० रोजीं त्यानें राजारामाची मुंज केली, व १५-३-१६८० रोजीं प्रतापराव गुजर याच्या मुलीशीं त्याचें लग्न केलें. आठच दिवसांनीं महाराजांस ज्वराची व्यथा झाली. अंत समीप आलेला ओळखून महाराजांनीं संभाजीस सांगून पाठविलें कीं दोघां पुत्रांस राज्य वाटून देतों. पण संभाजीनें तें ऐकलें नाहीं.

४-४-१६८० रोजीं दोन प्रहरीं महाराज मृत्यु पावले. त्या वेळीं त्यांच्या वयाला त्रेपन्न वर्षें पुरीं होण्यास दोनच दिवस कमी होते.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

भाग दुसरा

# प्रकरण पहिलें

## श्री शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य-संस्थापनेचें कार्य हातीं घेतलें त्या वेळची अत्यंत प्रतिकूल परिस्थिति

छत्रपति श्रीशिवाजीमहाराज जन्मले त्या वेळेस व त्यांनीं स्वराज्य-संस्थापनेच्या प्रयत्नास प्रारंभ केला तेव्हां महाराष्ट्रांतली एकंदर परिस्थिति स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेस किती प्रतिकूल होती व कशवढाल्या विरोधी शक्तींशीं शिवाजीमहाराजांना झगडावें लागलें याची बरोबर कल्पना येण्यासाठीं, त्या वेळच्या अवस्थेचें, पूर्वग्रहरहित दृष्टीनें निरीक्षण करणें अवश्य आहे. मराठी इतिहासकारांनीं व निबंधलेखकांनीं जीं वर्णनें केलीं आहेत त्यांवरून असा समज होतो कीं, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास वगैरे संतांनीं आपल्या उपदेशानें व आपल्या प्रचारानें एकंदर भूमि राजकीय स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेस अतिशय अनुकूल करून ठेवली होती; श्रीशिवछत्रपतींसारख्या थोर पुरुषाच्या जन्मास, कर्तृत्वास व ध्येयसिद्धीस अनुकूलतेची सारी संसिद्धि होऊन चुकली होती; त्यामुळेंच ह्या महापुरुषाचें कार्य सुलभ झालें, इत्यादि.

पण हा समज व इतिहासकारांनीं केलेलें त्या वेळच्या परिस्थितीचें हें मूल्यमापन साफ चुकीचें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या व त्या काळांत जन्मलेल्या इतर संतांच्या उपदेशाचा मराठी जनतेवर कांहींच चांगला परिणाम झाला नव्हता असें प्रस्तुत लेखकास म्हणावयाचें नाहीं. त्यांनीं पुष्कळ उपयुक्त कार्य केलें होतें. लोकांत आपल्या धर्माचा व संस्कृतीचा अभिमान पेरला होता; निदान आपण हिंदु आहोंत आणि आपला धर्म व आपली संस्कृति म्हणजे कांहीं तरी वेगळी वस्तु आहे ही जाणीव लोकांत जिवंत ठेवली होती. पण यापलीकडे, शिवाजीमहाराजांच्या कार्यास फारशी अनुकूलता हे साधुसंतसुद्धां निर्माण करूं शकले नव्हते. शिवाजीमहाराज हे अतिशय लोकोत्तर पुरुष होते; केवळ कर्तृत्वच नव्हे तर त्यांचें विभूतिमत्त्व अलोट होतें; म्हणूनच, तितक्या प्रतिकूल व संकटग्रस्त परिस्थितींत त्यांच्या हातून स्वराज्याची संस्थापना होऊं शकली; म्हणूनच हिंदूंना स्वाभिमानानें जगतां येईल अशी परिस्थिति ते निर्माण करूं शकले.

सतराव्या शतकाच्या आरंभीं महाराष्ट्रांत विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही आणि अहमदनगरची निजामशाही या तीन मुस्लिम राजघराण्यांचा अंमल होता. उत्तरेकडून मोंगल बादशहांचा प्रयत्न निजामशाहीला बुडविण्याचा चालला होता. इ.स. १६०५ सालीं अकबर मृत्यु पावला. त्याच्या आधीं त्यानें निजामशाहीचा पराभव करून अहमदनगर घेतलें; पण अकबराच्या अंतकाळांत व त्याच्या मृत्यूनंतर निजामशाहीचा बराचसा प्रदेश तिचा विख्यात संरक्षक मलिकंबर यानें परत मिळविला होता. निजामशाही बुडविण्याचा मोंगलांचा प्रयत्न या वेळेपासून १६३६ पर्यंत (शिवाजीमहाराज नऊ वर्षांचे होईपर्यंत) सारखा चालला होता. यांत कधीं विजापूरची आदिलशाही व क्वचित् प्रसंगीं गोवळकोंड्याची कुतुबशाही या किंवा त्या बाजूनें गुंतलेली असे. आणि या झगड्यांत मराठे शिपाई व मराठे सरदार, केवळ भाडोत्री वृत्तीनें, या किंवा त्या बाजूनें लढत असत. कोणाचीहि सरशी झाली तरी मुसलमानी धर्माचाच प्रसार व्हावयाचा; मराठ्यांचींच घरें लुटलीं जावयाचीं; मराठ्यांचाच प्रदेश बेचिराख व्हावयाचा; त्यांच्याच स्त्रिया भ्रष्ट केल्या जावयाच्या; आणि त्यांचींच मंदिरें पाडण्यांत यावयाचीं किंवा लुटलीं जावयाचीं हें ठरलेलें होतें. पण याची

कसलीहि घृणा त्यांच्यांतल्या मोठमोठ्या सरदारांना, जहागिरदारांना अथवा सेनानायकांना कधीं आली नाहीं.

या लोकांना, शुद्ध भाडोत्री वृत्ति स्वीकारून, हिंदुत्वाची व हिंदु लोकांची काय हानि होईल याचा विचार न करतां, या मुसलमानी राज्यांतून त्या मुसलमानी राज्यांत जाण्यास व पुनः परत त्याच राज्याच्या चाकरींत दाखल होण्यास कसलीहि क्षिति वाटत नव्हती. केवळ वैयक्तिक स्वार्थ व वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यांच्या सिद्धीसाठीं आपल्याच बांधवांच्या कत्तली करण्यास आणि आपली संस्कृति व आपला धर्म बुडविण्यास त्यांनीं कधींहि मागेंपुढें पाहिलें नाहीं. शहाजी भोसले व त्याचे भाऊबंद, आणि त्याचे सासरे लखूजी जाधव व त्याचे भाऊबंद प्रथम निजामशहाच्या तैनातींत होते. नंतर त्यांतील जाधव लोक व कांहीं भोसले मोंगलांस मिळाले. त्यानंतर १६२५ सालीं स्वतः शहाजीनें विजापूरच्या आदिलशाहीची ताबेदारी पतकरली. त्यानंतर १६२८ च्या आरंभीं किंवा त्याच्याहि आधीं तो परत निजामशाहींत आला. परंतु पुढें शहाजहान बादशहाच्या कर्तृत्वामुळें मोंगलांचा जोर व प्रताप वाढूं लागलेला दिसतांच त्यानें मोंगलांचें दास्य पतकरलें (१६३०). त्यानंतर दोन वर्षांनीं तो परत निजामशाहींत आला.आणि पुढें १६३६ मध्यें निजामशाही पार बुडाल्यावर विजापूरच्या आदिलशाहीची ताबेदारी त्यानें स्वीकारली.

त्यानंतर शहाजी व त्याहून कमी प्रतीचे मराठे सरदार काय करीत होते ? आपापल्या मुसलमान मालकांच्या फायद्यासाठीं, लहरीसाठीं किंवा त्यांच्या राज्याच्या वृद्धीसाठीं ते स्वकीयांविरुद्ध लढत राहिले आणि महाराष्ट्रीय व बिगरमहाराष्ट्रीय हिंदूंची सर्व बाजूंनीं ससेहोलपट करीत राहिले. १६३७ पासून आयुष्याच्या अखेरीपर्यंत शहाजी हा आदिलशाहीच्या उत्कर्षासाठीं झटत होता. विजयानगरच्या हिंदु राज्याच्या पाडावानंतर जीं अनेक छोटीं छोटीं राज्यें किंवा संस्थानें दक्षिणेंत निर्माण झालीं होतीं त्यांचा पाडाव करण्यांत तो गुंतला होता. विजापूर दरबारचा कोणीतरी मुसलमान सेनापति —रणदुल्लाखान, मुस्ताफाखान किंवा मुल्लामहंमद—मुख्य असावयाचा व त्याच्या आधिपत्याखालीं शहाजीनें आपलें कर्तृत्व व आपलें शौर्य हिंदु संस्कृतीच्या उच्छेदासाठीं व हिंदु जनतेच्या निर्दालनासाठीं खर्चीं घालावयाचें

असें चाललें होतें. इक्केरीचा वीरभद्र, बंगलोरचा केंपगौडा, श्रीरंगपट्टणचा कांतिराज वोडियार, बसवापट्टणचा केंगनायक इत्यादि हिंदु राजांचा निःपात शहाजीनें केला. त्यांत हजारों हिंदूंची कत्तल झाली; हजारों घरें भस्मसात् झालीं; कित्येक हिंदु स्त्रियांच्या इज्जती घेतल्या गेल्या; किती तरी अधिक स्त्रिया, अब्रूच्या रक्षणासाठी, अग्नींत प्रविष्ट झाल्या. तें वर्णन वाचणेंसुद्धां हृदय पिळवटून टाकतें. या साऱ्या उलाढालींत अपरंपार लूट आदिलशहाला मिळाली; जिंजीच्या किल्ल्यांत तर वीस कोटींची हिंदु संपत्ति आदिलशहास लाभली; व एकुणनव्वद हत्तींवर लादून ती विजापुरास आणावी लागली! विजापूरच्या बादशहाला अशी धन्यता वाटली कीं, " आपण दक्षिणचे सर्व हिंदु राजे व महाराजे जिंकले; मोठमोठीं हिंदु मंदिरें धुळीस मिळविलीं; तीन वर्षांच्या अवधींत सेतुबंध रामेश्वराची भक्ति करणाऱ्या हिंदूंच्या शेंड्या कापून काफरांचें निर्मूलन केलें." आणि या पराक्रमाबद्दल बादशहानें शहाजीचा " महाराज फर्जंद शहाजी भोसले " या अभिधानानें गौरव केला!

ज्या शहाजीच्या राणीनें ( जिजाबाईनें ) श्री शिवाजीमहाराजांना जन्म दिला त्या शहाजीचें जर हें कर्तृत्व, तर इतर मराठे सरदार काय करीत असतील याची कल्पनाच करावी. महाराष्ट्रभर सांस्कृतिक निर्जीवतेचें व परिपूर्ण स्वाभिमानशून्यतेचें साम्राज्य पसरलें होतें. मुसलमान बादशहांच्या आज्ञेवरून मराठे सरदार खुशाल आपल्याच धर्मबांधवावर व जातिबांधवांवर उठण्यास व त्यांचा संहार करण्यास उद्युक्त होत होते. निजामशाहीचा त्याग करून शहाजी जेव्हां आदिलशहाच्या नोकरींत गेला तेव्हां निजामशाहीच्या मलिकंबरनें कानदखोऱ्याच्या मरळ देशमुखाला शहाजीविरुद्ध पाठविलें व त्या मराठा देशमुखानें ती कामगिरी खुशाल पतकरली; त्यानंतर शहाजी परत निजामशाहींत आल्यावर विजापूरच्या आदिलशाहीच्या आज्ञेवरून मुरार जगदेव, कान्होजी जेधे वगैरे मराठे सरदार शहाजीच्या पुणें प्रांतावर चालून गेले. सारी जहागीर त्यांनीं उध्वस्त केली. शहाजीचे वाडे जाळले आणि " पुणें कसबा वसती जाळून गाढवाचा नांगर पांढरीवर धरिला "! शिवाजीमहाराज सहा वर्षांचे असतांना जिजाबाईला मोंगलांनीं शिवनेरीच्या किल्ल्यावरून पकडून नेलें, तेव्हां तिचा चुलता जगदेवराव जाधव मोंगलां-

कडेच एक प्रमुख सरदार म्हणून वावरत होता! (ही चाहूल आधींच लागल्यामुळें जिजाबाईनें बाल शिवाजीला गुप्तपणें शिवापुरास पाठवून दिलें होतें.) १६४४ मध्यें आदिलशहाच्या आज्ञेवरून खंडोजी घोरपडे व बाजी घोरपडे हे मराठे सरदार शहाजीच्या पुणें जहागिरीचे प्रशासक दादोजी कोंडदेव याच्यावर चालून गेले. त्या वेळीं स्वतः शहाजी हा आदिलशहाच्याच दरबारांत एक प्रतिष्ठित व बलशाली सरदार होता व दक्षिणेकडे हिंदु राज्यें बुडविण्यांत मग्न होता! स्वाभिमानशून्यतेची मजल याच्यापलीकडे जाणें शक्य आहे काय? कोणी म्हणतील कीं, ह्या परिस्थितींत मराठ्यांना अधिक कांहीं करणें शक्य नव्हतें. नसेल. पण मग शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य-संस्थापनेच्या कार्याला त्या वेळची परिस्थिति भारी अनुकूल होती व साधुसंतांनीं भूमि अगदीं तयार करून ठेवली होती असें तरी म्हणूं नका!

याहूनहि अधिक प्रतिकूल परिस्थितीचा आणखी एक दाखला घ्या. एकामागून एक आदिलशाहीचे किल्ले, ठाणीं व प्रदेश सर करण्याचा शिवाजीमहाराजांनीं जेव्हां सपाटा चालविला, व कल्याणहून विजापूरकडे येणारा दरबारचा खजिना लुटून नेला तेव्हां, १६५९ सालीं, विजापूरच्या दरबारानें अफजुलखानाला, शिवाजीमहाराजांना जिवंत किंवा मेलेले पकडून आणण्यासाठीं पाठविलें. त्या वेळीं महाराजांच्या कर्तृत्वाची, थोरपणाची व विभूतिमत्त्वाची कसोटी थोडीफार लागली होती. त्यांनीं आदिलशाहीचे कित्येक किल्ले हस्तगत केले होते; कांहीं स्वतः बांधले होते; मावळ प्रांताचें संघटन करून त्याला मजबुती आणली होती; हजारों चौरस मैलांच्या टापूवर आपलें राज्य प्रस्थापित केलें होतें; मोऱ्यांचा पाडाव करून जावळीचा समृद्ध प्रदेश हस्तगत केला होता; सुपे येथील मोहित्याचा पराभव करून त्याला (तो शहाजीच्या दुसऱ्या बायकोचा भाऊ होता म्हणून) कर्नाटकांत शहाजीकडे रवाना केला होता; कल्याण व भिवंडी हस्तगत करून समुद्र-कांठानें राजापुरापर्यंत स्वामित्व प्रस्थापित केलें होतें किंवा दहशत बसविली होती. सारांश, शिवाजीमहाराजांचा स्वराज्य-संस्थापनेचा हेतु सफल होण्याचीं स्पष्ट स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं. आणि अशा स्थितींत त्यांच्यावर स्वारी करण्यास अफजुलखान निघाला होता. बरें, हें वृत्त कर्नाटकांत हिंदु राज्यांविरुद्ध मोहीमशीर असलेल्या शहाजीच्या कानांवर

जाण्यास अवधि नव्हता असेंहि नाहीं. कारण विजापूर दरबारांत चाललेल्या सर्व घडामोडी शहाजीला इत्थंभूत कळत होत्या. १६५८ च्या नोव्हेंबरांत, अफजुलखानाच्या स्वारीची वाटाघाट दरबारांत सुरू झाली; पुढें दहा महिन्यांनीं प्रबळ फौजेसह अफजुलखान विजापुराहून निघाला; व त्यानंतर दोन सव्वादोन महिन्यांनीं त्याची व शिवाजीमहाराजांची मुलाखत झाली. वाटेंत देवळें भ्रष्ट करणें, हिंदूंच्या सुप्रसिद्ध देवालयांतील मूर्ति फोडणें, गायींची कत्तल करणें इत्यादि गोष्टी अफजुलखान करीतच होता. तरीसुद्धां खानाच्या फौजेंतील मराठे सेनानायक, हिंदु धर्माचा व हिंदु जमातीचा रक्षणकर्ता म्हणून प्रसिद्धी पावलेल्या शिवाजीमहाराजांवर चढाई करण्याच्या पवित्र्यांतच राहिले. आपल्या पुत्रावर आलेल्या या संकटाच्या परिहारार्थ येण्याची आवश्यकता खुद्द शहाजीला वाटली नाहीं. शहाजी हा महापराक्रमी व शूर योद्धा होता, अनुभवसंपन्न मुत्सद्दी होता आणि हिकमतबाज सेनापतीहि होता. बंगलोर येथें व एकंदर कर्नाटकांत त्यानें आपलें बस्तान चांगलें बसविलें होतें. विजापूरचा आदिलशहा त्याला वचकून होता. या वेळीं शहाजीनें जर बंडाचें निशाण उभारलें असतें तर महाराजांचें बळ मनस्वी वाढलें असतें व त्यांचें स्वराज्य-संस्थापनेचें कार्य अनेक पटींनीं सुकर झालें असतें. पण इतकें करणें दूर राहिलें. स्वतःच्या एकंदर धोरणाबाबत व मसलतीबाबत विजापूर दरबाराला संशयांत व धाकांत ठेवण्याचेंसुद्धा साहस शहाजीच्यानें करवलें नाहीं. त्यानें दरबाराला निक्षून कळविलें कीं, " पुत्र माझ्या आज्ञेंत वागत नाहीं. आपण त्याचें पारिपत्य पाहिजे तसें करावें. त्यास माझी हरकत नाहीं. " रियासतकार सरदेसाई श्रीशिवचरित्रांत आणखी म्हणतात :—

" मोऱ्यांचा पाडाव झाल्यापासून विजापूर दरबारावर एकामागून एक संकटेंच येऊं लागलीं. महंमद आदिलशहा मरण पावल्यानें राज्यकार-भारांतील धरबंध सुटला. वजीर खान महंमद, बहलोलखान, रुसतुमिजमा वगैरे सरदारांचा मेळ बसेना...**या संकटसमयीं शहाजीच काय तो आपल्या धन्याशीं निष्ठेनें वागत होता.** ही गोष्ट सिद्ध करणारें आदिल-शहाचें फर्मान म्हणतें, ' शहाजी भोसले यांस — तुमचा पुत्र शिवाजी यानें जी बंडखोरी चालविली आहे तींत तुमचा कांहीं एक संबंध नाहीं अशी आमची खात्री झाल्यावरून तुमची बंगलोरकडील जहागीर व तुमचे सर्व

मानमरातब पहिलेप्रमाणें तुमचे तुम्हांकडे बहाल करण्यांत येत आहेत.' या पत्रावरून शिवाजीचा जोर या वेळीं कसा वाढूं लागला होता हें स्पष्ट होतें."

आणि शिवाजीचें सामर्थ्य इतक्या निर्विवादपणें वाढलें असतांनाहि त्याला साह्य करण्याइतकी स्वाभिमानबुद्धि शहाजींत जागृत होऊं शकली नाहीं; हिंदुपदपातशाहीच्या संस्थापनेसाठीं शिवाजी जेवढा धोका पतकरीत होता त्याच्या दशांशाइतकाहि धोका पतकरण्यास शहाजी तयार झाला नाहीं ! यापूर्वीं विजापूर दरबारानें शहाजीला कैदेंत ठेवलें असतां शिवाजीनें मोंगल सत्तेचा धाक विजापूरकरांना घालून शहाजीची मुक्तता घडवून आणली होती (१६४९). पण, स्वराज्य-संस्थापनेसाठीं राहो, आपल्या पुत्राच्या प्राणरक्षणा-साठींसुद्धां शहाजीला कांहीं करण्याची आवश्यकता या वेळीं वाटली नाहीं.

हें विवेचन करण्यांत शहाजीराजांचा कमीपणा दाखविण्याचा आमचा उद्देश नाहीं. तर, त्या वेळची एकंदर परिस्थिति स्वराज्य-स्थापनेला व हिंदूंच्या दास्यविमोचनाला किती प्रतिकूल होती, मोठमोठ्या मराठा सरदारांवरसुद्धां स्वाभिमानशून्यतेचा पगडा किती जबरदस्त बसला होता, हिंदूंचा सर्व बाजूंनीं उच्छेद करण्यास जे सर्वस्वीं टपले होते अशा मुसलमान बादशहांची ताबेदारी करण्यांत प्रमुख व पराक्रमी मराठे कशी धन्यता मानीत होते, व त्यामुळें श्रीशिवाजीमहाराजांचें कार्य किती बिकट व संकटग्रस्त झालें होतें हें आम्हांस वाचकांच्या मनावर बिंबवावयाचें आहे. त्या वेळची परिस्थिति स्वराज्य-संस्थापनेच्या कार्याला अतिशय अनुकूल होती हा जो समज इतिहासकारांनीं निर्माण करून ठेवला आहे त्याचा खोटेपणा आम्हांस दाखवावयाचा आहे. आपलें जीवितकार्य महाराजांनीं जेव्हां निम्मेंशिम्में उरकलें होतें तेव्हां जर ही अवस्था, तर प्रारंभीं प्रारंभीं परिस्थिति किती बिकट असेल याची कल्पनाच केलेली बरी !

ज्या मावळ भागांत महाराजांनीं आपल्या कार्यास प्रारंभ केला तेथेंहि त्यांच्या मार्गांत फार मोठालीं संकटें होतीं. कारण "या मावळ खोऱ्यांत प्राचीन देशमुखांचीं घराणीं नांदत होतीं. हे मावळे देशमुख घरंदाज, इभ्रत-दार, द्रव्यवान, शिकलेले व व्यवहारचतुर असत. आपापल्या टापूंत त्यांचा कारभार स्वतंत्रपणें चालत असे. पण स्वभावानें ते मानी असून मानासाठीं

जिवाचीसुद्धां पर्वा करीत नसत. वतनांच्या वगैरे संबंधानें एकाच घराण्यांत किंवा अनेक घराण्यांत कैक शतकें कलागती चालून खून, मारामाऱ्या, जाळपोळ हे प्रकार नित्याचे झाले होते. लग्नसमारंभासारख्या गडबडीच्या प्रसंगीं एकदम धाड घालण्याचा प्रकार किती तरी चाले. बायकामुलांचे खून होणें, देशोधडीस लागणें, फिरून सावरासावर करून सूड घेणें अशी अंदाधुंदी शिवाजीच्या पूर्वी शें-दोनशें वर्षें सारखी चाललेली आढळते." (सरदेसाई रियासत). या लोकांत स्वातंत्र्याची स्फूर्ति उत्पन्न करणें, एका ध्येयनिष्ठेनें असल्या लोकांना बांधून टाकणें आणि यांच्यांत ऐक्य व सामरस्य निर्माण करून यांच्याकरवीं महत्कृत्यें करविणें हें कार्य किती बिकट असलें पाहिजे ! हें ज्यानें घडवून आणलें व या लोकांचा विश्वास, त्यांचें प्रेम व त्यांची भक्ति संपादन करून त्यांच्या साह्यानें स्वराज्याचा पाया ज्यानें घातला तो पुरुष किती लोकोत्तर असला पाहिजे !

सतराव्या शतकाच्या आरंभीं महाराष्ट्रांत ज्या उलाढाली झाल्या त्यांत मराठ्यांचा शूरपणा, त्यांची पराक्रमी वृत्ति, त्यांचा धाडसी बाणा व त्यांचा हिकमतबाजपणा अनेक वेळां प्रत्ययास आला. परंतु त्यांचे हे सारे मोठाले गुण व्यक्तींच्या स्वार्थी उत्कर्षाकरितां व स्वजनांच्या संहाराकरितां उपयोगी पडत. त्यांचें सारें कर्तृत्व या किंवा त्या मुसलमान बादशहाच्या वैभववृद्धीसाठीं व मराठ्यांच्याच नाशासाठीं वापरलें जाई व खर्चीं पडे. यांत महाराष्ट्रीयांच्या घरादारांचा व शेतीवाडीचा विध्वंस, मुलां-माणसांची कत्तल, स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे, मंदिरांचा भ्रष्टाकार व नाश—या सर्व गोष्टी एकसारख्या घडत व स्वकीयांच्या या सर्वांगीण विध्वंसनांत महाराष्ट्रीयांचेच हात गुंतलेले असत.

आपल्या शक्तीचा, बुद्धीचा व कर्तृत्वाचा वापर आपल्याच शत्रूच्या कारणीं लावण्याची ही वृत्ति आजहि महाराष्ट्रीयांमध्यें आपण पाहतों. यांत कित्येक विद्वान्, अनेक विचारवंत व कांहीं कर्तृत्ववान् अग्रभागीं आहेत. विरोधकांना फितूर होऊन स्वजनांची मानहानि करणें; स्वजनांवरचा घोर अन्याय पचविण्यासाठीं परक्यांचें हस्तकत्व पत्करणें; स्वकीयांच्या प्रगतीचीं व उन्नतीचीं द्वारें बंद करण्याचें काम, केवळ क्षुद्र स्वार्थासाठीं व पोकळ

प्रतिष्ठेसाठीं, इतरांच्या हुकुमतीवरून अंगिकारणें; स्वकीयांवरचा अन्याय धडधडीत दिसत असतां व अमान्यहि करतां येण्याजोगा नसतां त्या अन्यायाची निर्लज्जपणें तरफदारी करणें; स्वजनांवर जुलूम-जबरदस्ती करणारांची ताबेदारी पत्करणें अथवा त्यांच्या कह्यांत वर्तणें,—या गोष्टी आजहि चालल्या आहेत, आणि याच गोष्टी महाराष्ट्रीयांच्या उत्कर्षाच्या आड येत आहेत. आपणां महाराष्ट्रीयांचे न्याय्य हक्क लुबाडले जात आहेत, आपल्या कष्टानें मिळविलेली संपत्ति परक्यांच्या उत्कर्षासाठीं वापरली जात आहे व हें कायदेशीर लूटमारीचें कार्य आपलेच जातिबांधव उमेदीनें पार पाडीत आहेत. या फुटीर व स्वजनद्रोही वृत्तीनेंच पूर्वी महाराष्ट्राचा घात केला, आजहि तेंच घडत आहे. अस्तु.

श्री शिवाजीमहाराजांनीं स्वधर्मरक्षणाचें, स्वजनांच्या उद्धाराचें व जुलमी परसत्तेच्या निर्दालनाचें कार्य हातीं घेतलें तेव्हां त्यांच्या कार्याला परिस्थिति फार अनुकूल होती असें ज्यांना वाटतें त्यांनीं समर्थ रामदासांची पुढील उक्ति ध्यानांत घ्यावी :—

" बोलतां कलीचें महिमान । धर्म झाला कंपायमान । जे युगीं राजा यवन । तेथें अन्य वार्ता कायसी ।। जे युगीं धर्म बुडाले । अवघे एकंकार झाले । सत्य जातीनिशीं हरपलें । स्वधर्मासकट ।। राजा देवद्रोही झाला । देवस्थळांचा उच्छेद केला । तीर्थमहिमा सकळ बुडाला । ठाईंठाईंचा ।। कुळस्त्रिया भ्रष्टविल्या यवनीं । ब्राह्मण झाले दासीगमनी । अंत्यजांचे गृहीं उत्तमवर्णी । बलात्कारें भ्रष्टविती ।। राज्याचीं अनेक बंडें जालीं । गोब्राह्मणांवरी पालाणें पडलीं । पृथ्वी हलकल्लोळ झाली । कोणी नव्हे कवणाचें ।। कुळवधू निर्लज्जा झाल्या । त्या हीन जातीशीं रतल्या । लोकापवादें भ्रष्टल्या । देशोदेशीं फिरती ।। तीर्थें-क्षेत्रें व्रतें-उद्यापनें । सकळहि उच्छेदिलीं यवनें । धर्मचर्चा पुराणश्रवणें । कथाकीर्तन राहिलें ।। "

श्रीशिवछत्रपतींनीं महाराष्ट्रांत आपल्या कार्यास प्रारंभ केला त्या वेळची एकंदर भारतांतली परिस्थिति काय होती हें आतां आपण पाहूं. अकराव्या, बाराव्या, तेराव्या व चौदाव्या शतकांत उत्तर हिंदुस्थान जात जात पूर्णपणें परकी लोकांच्या ताब्यांत गेला. हिंदु संस्कृतीचा पाडाव उत्तर हिंदुस्थानांत

सर्वत्र झाला होता. तें कार्य पुढें जातां रजपूत लोकच, मोंगल बादशहांचे हस्तक बनून, करूं लागले होते. दक्षिणेंतील देवगिरीचें राज्य जेव्हां दिल्लीच्या खिलजी बादशाहीनें बुडविलें तेव्हां महाराष्ट्राचें स्वातंत्र्य लयाला गेलें (१३१८). त्यानंतर, १५६५ सालीं, तालिकोटच्या लढाईत विजयानगरच्या हिंदु राज्याचा बेरीदशाही, निजामशाही, कुतुबशाही व आदिलशाही या चार मुस्लिम शाह्यांनीं मिळून पराभव केला तेव्हां दक्षिणेंतलें शेवटचें प्रमुख हिंदुराज्य लयाला गेलें. तालिकोट हें समृद्ध शहर मुसलमान सैन्यांनीं लुटलें व इमारती वगैरे पाडून उध्वस्त करून टाकल्या. मात्र, याप्रमाणें विजयानगरचें साम्राज्य नष्ट झाल्यावरसुद्धां एके काळीं त्याच्या छत्राखालीं नांदणारे सरदार व जहागीरदार कायम राहिले व आपापल्या भागांत स्वतंत्रपणें कारभार पाहूं लागले. पेनुकोंडा, वेलोर, इक्केरी, कोंगू, कावेरीपट्टण, श्रीरंगपट्टण, तंजावर, मदुरा, बसवापट्टण, जिंजी, चंद्रगिरी, बंगलोर इत्यादि ठिकाणीं हिंदूंचीं राज्यें अथवा सरदारक्या होत्या. उत्तरेकडून मोंगलांचें दडपण सुरू झालें आणि निजामशाहीचा अंत होऊन ( १६३६ ) विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही हीं दोनच मुसलमानी राज्यें दक्षिणेंत राहिलीं. तेव्हां त्यांनीं मोंगलांशीं तह केला; आणि उत्तरेकडे सरकण्यास अवसर नाहीं असें पाहून दक्षिणेंतलीं हिंदु राज्यें बुडविण्याचा व तिकडे आपल्या राज्यांचा व धर्माचा विस्तार करण्याचा मनसुबा रचला. याप्रमाणें आदिलशहा व कुतुबशहा यांच्या दरम्यान करारमदार होऊन त्यांच्या संयुक्त फौजा, मुसलमान सेनापति व शहाजी राजे यांच्या आधिपत्याखालीं हिंदु धर्माच्या व हिंदु संस्कृतीच्या विध्वंसनाचें कार्य करूं लागल्या. " हिंदु धर्माचा पाडाव करून मुसलमानी धर्म वाढवावा आणि हिंदूंची संपत्ति लुटून विजापुरास व गोवळकोंड्यास आणावी, " हा त्यांचा जाहीर उद्देशच होता. इकडे दक्षिणेंत हें कार्य चालू असतांना १६५८ मध्यें, हिंदु धर्माचा व हिंदु संस्कृतीचा कट्टर दुष्मन म्हणून पुढें प्रसिद्धीस आलेला औरंगजेब बादशहा दिल्लीच्या तख्तावर बसला व सर्व हिंदुस्थानांतला हिंदुधर्म बुडविण्याचें व मुसलमानी धर्म स्थापण्याचें त्याचें कार्य अत्यंत जोरानें व क्रूरपणानें सुरू झालें. औरंगजेब बादशहाची ही कडवी कारकीर्द पन्नास वर्षें चालली. आम्हांस हें दाखवावयाचें आहे कीं, श्रीशिवाजीमहाराज जर झाले नसते

तर उत्तरेकडून औरंगजेब व दक्षिणेकडच्या या दोन मुस्लिम शाह्या यांनीं हिंदु धर्माच्या व हिंदु संस्कृतीच्या विध्वंसनाचें कार्य पुरेपूर तडीस नेलें असतें. हिंदुस्थानांतून हिंदु संस्कृति नामशेष झाली असती, किंवा इतक्या लाचार अवस्थेंत राहिली असती कीं तिचें पुनरुत्थान अशक्यप्राय होऊन बसलें असतें. आर्य संस्कृतीचा प्रसार भिन्नभिन्न रूपानें जगभर झाला. भारतांत आर्यांच्या संस्कृतीला हिंदु संस्कृतीचें रूप आलें. युरोपमध्यें ग्रीस देशांत तिला ग्रीक संस्कृतीचें स्वरूप प्राप्त झालें. इटलींत रोमन संस्कृति म्हणून ती पुढें आली. इराणांत पर्शियन संस्कृतीचें नांव तिनें घेतलें. चारी ठिकाणीं आर्यांचीच संस्कृति पसरली व भरभराटीस पोंचली. या चारीपैकीं ग्रीक संस्कृति सर्वांच्या आधीं, इसवी सनाच्या पूर्वींच, रोमन संस्कृतींत विलीन झाली. रोमन संस्कृति पुढें जातां ख्रिश्चनांच्या संस्कृतींत गडप झाली. ग्रीक व रोमन लोकांच्या मूळच्या आर्य देवतांचा अभिमान बाळगणारे व त्यांच्या यज्ञयागांची परंपरा चालविणारे कोणीहि आज राहिले नाहींत. बहुतेक सर्व ख्रिस्ती झाले; कांहीं थोडे मुसलमान बनले. इराणांतल्या आर्य — म्हणजे पर्शियन — संस्कृतीचा उच्छेद मुसलमानांनीं केला. फक्त **भारतांतले हिंदूच प्राचीन आर्य संस्कृतीचें सातत्य व तिची थोर परंपरा टिकवून राहिले आहेत.** याबद्दल केवळ महाराष्ट्रीयांनींच नव्हे तर सर्व भारतीयांनीं श्री शिवाजी-महाराजांचे ऋणी असलें पाहिजे. इतकी प्रतिकूल परिस्थिति असतांना; छोट्याशा जहागिरीपलीकडे अधिक कांहीं हाताशीं नसतांना; ज्यांच्या करवीं स्वकीयांचा उद्धार घडवून आणावयाचा तेच, वर वर्णिल्याप्रमाणें, कमालीचे परधार्जिणे व परमावधीचे स्वाभिमानशून्य बनले असतांना; एकी-कडून विजापूरची सामर्थ्यशाली आदिलशाही आणि दुसरीकडून मोंगलांची जबरदस्त साम्राज्यसत्ता यांचें शत्रुत्व व आक्रमण सतत जारी असतांना; ज्यांनीं पाठपुरावा करावयास पाहिजे असे शहाजी राजे व त्यांचे इतर पुत्र तटस्थ, किंबहुना शत्रूचे ( आदिलशाहीचे ) बळ वाढविण्यांत इतिकर्तव्यता मानीत असतांना; आपल्यांतलेच मोरे, जाधव, घोरपडे यांसारखे मातब्बर मराठे सरदार शत्रूस सामील असतांना, — एवढी जबरदस्त प्रतिकूलता सर्व बाजूंनीं असतांना श्रीशिवाजीमहाराजांनीं आपल्या लोकोत्तर पराक्रम-शालित्वानें व मुत्सद्दीपणानें शत्रूंचें निर्दालन करून जर स्वराज्यसंस्थापना

केली नसती तर भारतभर अंधार पसरला असता; आणि आधींच हीन अवस्थेस पोंचलेली व कित्येक शतकांच्या इस्लामी जुलमानें लाचार बनलेली हिंदु जनता अधिकच स्वाभिमानशून्य व स्वत्वाच्या जाणिवेस पारखी झाली असती. ही परिस्थिति पूर्णपणें बदलून टाकण्याचें काम शिवाजीमहाराजांनीं केलें. त्यांनीं महाराष्ट्रांत तर चैतन्य आणलेंच, पण त्यांच्या अलौकिक व अद्‌भुत कर्तृत्वाचे पडसाद उत्तर हिंदुस्थानांतसुद्धां उमटले. रजपूत राजे बंड करण्यास प्रवृत्त झाले. हिंदु धर्माच्या व हिंदु संस्कृतीच्या पुनरुत्थानाची लाट उत्तरेकडेहि पसरली. स्वतः शिवाजीमहाराजांनीं दक्षिणदिग्विजय करून ती तंजावरपर्यंत पोंचविली; आणि अशा रीतीनें हिंदु लोकांना प्राप्त झालेली अवकळा चोहोंकडे दूर झाली.

आमचें हिंदुस्थान सरकार अशोकचक्राचें चिन्ह राष्ट्रध्वजावर धारण करतें. पण अशोकचक्र हें ज्या भारतीय संस्कृतीचें प्रतीक आहे ती भारतीय संस्कृति श्रीशिवाजीमहाराजांनीं टिकविली. कारण महाराज न होते तर भारतीय संस्कृति रहातीच ना. अर्थात हें सत्य ज्यायोगें जगाच्या मनावर बिंबेल असें चिन्ह भारत सरकारानें आपल्या राष्ट्रध्वजावर ठेवावयास पाहिजे. पण इतकें करणें दूर राहिलें; उलट त्या सरकारांत प्रामुख्यानें मिरविणारे कांहीं लोक इतके कृतघ्न बनले आहेत, कीं श्रीशिवाजीमहाराजांची नालस्ती करण्यांत ते धन्यता मानीत आहेत; व अशा स्वधर्मद्रोह्यांना व स्वजनद्रोह्यांना आमच्या महाराष्ट्रीयांतल्याच कांहीं थोर व्यक्ति पूज्य मानीत आहेत! शिवाजीमहाराजांच्या जन्माच्या वेळीं जी परिस्थिति होती ती आजहि कांहीं अंशीं विद्यमान आहे असेंच म्हटलें पाहिजे !

या अनु ंगानें आपण महाराष्ट्रीयांनीं थोडें आत्मनिरीक्षणहि करावयास पाहिजे. केवळ आमच्यांतील दुहीमुळें, फितुरीमुळें आणि विद्वानांच्या व विचारवंतांच्या सर्वसामान्य लाचारीमुळेंच आपण या अवमानित अवस्थेला पोंचलों काय ? आपण जे कोणी या कामीं जागे आहोंत ते तरी सर्वांच्या बऱ्यासाठीं व महाराष्ट्राच्या उत्कर्षासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहोंत काय ? मराठी स्वाभिमानाचा व महाराष्ट्रीय पुनरुत्थानाचा संदेश खेड्यापाड्यांतून व शहरांतून सर्वांच्या कानांपर्यंत आपण पोंचविला आहे काय ?

श्रीशिवाजीमहाराजांच्या नांवाचा आपण जयजयकार करतों; पण त्यांच्या चरित्राचें, कर्तृत्वाचें व पराक्रमशालित्वाचें यथातथ्य दर्शन सर्वसामान्य जनतेला आपण घडविलें आहे काय ? आपण जे स्वतःला कार्यकर्ते व नेते म्हणवितों त्यांनीं तरी शिवछत्रपतींचें चरित्र सामग्र्यानें अभ्यासिलें आहे काय ? एवढें जरी आपण केलें तरी, ज्या उत्तरेकडच्या लोकांनीं मोंगलांची ताबेदारी व खर्डेघाशी करण्यांत धन्यता मानली त्यांचे वंशज आज दिमाखानें कां मिरवीत आहेत आणि ज्या मराठ्यांनीं समग्र भारताची लाज राखली ते आपण मराठे अधिक्षेपित अवस्थेंत कां जिर्णे कंठीत आहोंत याची आपणांला कल्पना येईल, आणि या अवस्थेंतून बाहेर पडण्याचा मार्ग आपणांला दिसूं लागेल. कारण आम्हांस असा दृढ विश्वास वाटतो कीं, शिवचरित्राचा आपण जर खराखुरा व निष्ठेनें व्यासंग केला तर त्या महात्म्याचें अल्पस्वल्प तरी अनुकरण करण्याची बुद्धि आपणांस होईल; त्या महापुरुषाचे जे सद्‍गुण, अंशतः कां होईना, उचलणें आपणांस शक्य आहे ते अंगीं आणण्याची इच्छा आपल्या ठिकाणीं जागृत होईल, आणि हा पुण्यकारक उपक्रम आपल्या उत्कर्षास कारणीभूत होईल.

# प्रकरण दुसरें

## श्रीशिवाजीमहाराजांचें अलौकिकत्व व विभूतिमत्व

श्री शिवाजीमहाराजांचें बालपण सूक्ष्मपणें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, मुसलमानांचा जुलमी अंमल झुगारून देण्याची व न्यायावर आधारलेलें हिंदुराज्य स्थापन करण्याची स्फूर्ति त्यांच्या ठिकाणीं फार लहानपणीं निर्माण झाली होती. इ. स. १६४४ मध्यें, म्हणजे महाराजांच्या वयास केवळ १७ वर्षें झालीं असतांना कान्होजी जेधे यास विजापूरच्या बादशहाचें असें फर्मान आलें होतें कीं, " दादोजी कोंडदेव यानें कोंडाण्या ( सिंहगडा) च्या बाजूस धामधूम चालविलेली आहे व त्यास शिक्षा करून प्रदेश ताब्यांत घेण्यासाठीं खंडोजी व बाजी घोरपडे यांची नेमणूक करण्यांत आली आहे. तरी तुम्हीं त्यास सामील व्हावें व तो दुष्ट दादोजी आणि त्याचे हरामखोर साथीदार यांना नेस्तनाबूद करावें. तेणेंकरून तुमची सरफराजी होईल. " पण याचा कांहीं परिणाम झाला नाहीं व शिवाजीमहाराजांची बंडखोरी वाढतच चालली. तेव्हां कान्होजी जेधे याचा कुळकर्णी दादोजी नरस प्रभु यास ३०-३-१६४५ रोजीं आदिलशाहीच्या अधिकाऱ्याचा पुढील हुकूम झाला :—

" शिवाजी राजे यानें मावळे लोकांचा जमाव केला. रोहिडा किल्ल्यावरील ठाणें उठवून आपण किल्ल्यांत शिरला. हल्लीं राजगड किल्ला बळकावला. तूं त्यास सामील होऊन वसूल देतोस; ठाणें शिरवळ येथील अमीनास रुजू रहात नाहींस; मग्रुरीचे जबाब देतोस, हें योग्य नाहीं. हुकूम पोंचतांच अमीनाशीं रुजू होणें. नाहींतर शहा तुला विजापुरीं नेऊन गर्दन मारतील. "

हा दादोजी प्रभु प्रथमपासूनच शिवाजीमहाराजांच्या उद्योगांत सामील होता. त्यानें वरील हुकूम लगेच महाराजांकडे पाठवून, पुढें काय करावयाचें याबद्दल त्यांचा सल्ला विचारला. त्यावर महाराजांनीं त्यास कळविलें कीं, " तुम्ही तो कागद घेऊन लगेच आमचेजवळ यावें. रोहिडेश्वरानें आम्हांस यश दिलें आणि पुढेंहि तोच तुमचे आमचे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पुरे करण्यास समर्थ आहे. श्रीचे संनिध तुमचें आमचें इमान झालें तें वज्रप्राय कायम आहे. **हें राज्य व्हावें अशी श्रीचीच इच्छा दिसते.** तुम्हीं बिलकुल हवालदिल होऊं नये. "

सतरा वर्षांच्या वयांत आपल्या ध्येयाच्या सिद्धीबद्दल ज्याला एवढा आत्मविश्वास वाटत होता व त्यासाठीं एका प्रबळ साम्राज्यसत्तेशीं झुंज करण्याची ज्याची तयारी होती अशा पुरुषाला स्फूर्ति कोठून प्राप्त झाली याची शहानिशा करण्यांत काय अर्थ आहे? ती स्फूर्ति त्याची स्वतःची अंतःस्फूर्तिच असली पाहिजे. कोणी म्हणतात, त्या वेळच्या परिस्थितीच्या अनुकूलतेमुळें ही स्फूर्ति शिवाजीमहाराजांना मिळाली. पण परिस्थितीची अनुकूलता होती कोठें? एकूणएक महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् मराठे या किंवा त्या मुस्लिम सत्तेची ताबेदारी करून आपला वैयक्तिक उत्कर्ष साधण्यास टपलेले होते. खुद्द शिवाजीमहाराजांचे अति निकटचे आप्तेष्ट याच व्यवसायांत मग्न होते. अर्थात् महाराजांच्या ठिकाणीं स्वराज्यस्थापनेची जबर लालसा उत्पन्न झाली ती परिस्थितीच्या अनुकूलतेंतून नव्हे तर परिस्थितीच्या प्रतिकूलतेंतून आणि त्यांच्या अंतस्थ परमोच्च प्रेरणेंतून. " स्त्रियांवर बलात्कार, हिंदूंचे खून, मंदिरांचा विध्वंस, गोवध इत्यादि प्रकार उघड होत होते. अब्रूनें उद्योग करून लौकिक मिळविण्याचें व धर्माचरण करण्याचें साधन हिंदूंस राहिलें नव्हतें. " म्हणून त्या अल्पवयांतच

महाराजांनीं असा निश्चय केला कीं, " जें वडिलांनीं मिळविलें तेंच खाऊन राहणें योग्य नाहीं. आपण हिंदु, सर्व दक्षिण देश यवनांनीं ग्रासिला; देव, गायी यांस व क्षेत्रांस पीडा केली, धर्म बुडविला. तरी प्राणहि वेंचून धर्म रक्षूं. "

आणि खरोखरच हिंदु धर्म हा " प्राणहि वेंचून " रक्षिण्याच्या लायकीचा आहे. हिंदु धर्म आणि हिंदु धर्माशींच अनुस्यूत असलेली हिंदु संस्कृति यांचें स्वरूप फार थोर, उदार, जीवितांत जें जें चांगलें त्या सर्वांचा संग्रह करणारे आणि मानव्याच्या उद्धारास जें जें आवश्यक त्या सर्वांला पूर्ण अवकाश देणारें असें आहे. शिवाजीमहाराजांनीं हें सर्व ओळखलें होतें. म्हणूनच त्यांच्या राज्यांत हिंदूंइतक्याच स्वाभिमानानें व इज्जतीनें मुसलमानहि जगूं शकत. ती स्थिति त्या वेळच्या मुसलमानी राज्यांत नव्हती. हिंदु लोकांची कोणतीहि आगळीक मुसलमानांनीं केली तरी तिकडे शासनसंस्था दुर्लक्ष करी. मुसलमानांनीं हिंदु स्त्रियांवर बलात्कार केले, हिंदूंचीं देवळें भ्रष्टविलीं, गायींची कत्तल केली, फार काय, हिंदूंचा खून जरी केला तरी मुसलमानांचें पारिपत्य होत नसे. किंबहुना काफीर लोकांना अशा प्रकारें वागविणें म्हणजे आपल्या धर्माचा उत्कर्ष करणें होय अशी मुसलमान राज्यकर्त्यांची व त्यांच्या मुस्लिम प्रजाजनांची श्रद्धा होती. त्यामुळें हिंदु धर्माच्या रक्षणाला त्या काळीं फार व्यापक अर्थ आला होता. हिंदु समाज, त्याच्या चालीरीति, हिंदूंचे धार्मिक व सामाजिक आचार-विचार, त्यांची स्वतःची व त्यांच्या स्त्रियांची अब्रू, त्यांना पूज्य वाटणाऱ्या देवस्थानांचें पावित्र्य, त्यांचें वित्त, त्यांचें जीवित--या सर्वांचें रक्षण करण्यासाठीं हिंदु धर्माचें रक्षण करणें अवश्य होतें व तें करण्यासाठीं हिंदु राज्याची स्थापना करणें जरूर होतें. हें तरी करावें एक, नाहीं तर या किंवा त्या मुसलमान उमरावाच्या आश्रयानें व मेहेरबानीनें स्वाभिमानशून्य जिणें जगावें एक--हे दोनच विकल्प त्या वेळच्या महत्त्वाकांक्षी व पराक्रमी हिंदूंपुढें होते.

अशा हिंदु धर्माच्या रक्षणाची जबर आस्था शिवाजीला बाळपणापासून वाटत होती; म्हणून त्यानें ऐहिक सुखसमृद्धीचा पण स्वाभिमानशून्यतेचा मार्ग सोडला आणि स्वधर्मरक्षणाचा खडतर मार्ग स्वीकारला. त्याच्या स्फूर्तीचें

उगमस्थान त्याच्या स्वधर्मप्रेमांत व स्वधर्मरक्षणाच्या तळमळींत होतें. त्याची धर्मावर बळकट श्रद्धा होती. आपल्या महत्त्वाकांक्षेवर व ऐश्वर्यलालसेवर एक सोयिस्कर पांघरूण म्हणून त्यानें धर्मभावनेचा उपयोग केला नाहीं. तर धर्म-रक्षणावर व धर्मोन्नतावर राष्ट्रोन्नति सर्वस्वी अवलंबून आहे असा त्याचा दृढ विश्वास होता. हाच विश्वास त्याच्या अनेक कागदपत्रांत व प्रसंगांत व्यक्त होतो. केवळ स्वार्थ साधण्यांत जन्माचें साफल्य नाहीं; आपल्या समाजासाठीं, आपल्या बांधवांसाठीं कांहीं पराक्रम करणें अवश्य आहे असें जें शिवाजीस वाटे त्यास कारण त्याची नितान्त धर्मश्रद्धाच होय. स्वहिताची उपेक्षा करून परहित साधण्याकरितांच आपला अवतार आहे असें शिवाजी नेहमीं म्हणे. तो जसजसा मोठा होत गेला तसतशी "कांहीं विशेष पराक्रम करून हिंदुधर्माचें रक्षण करण्याकरितां परमेश्वरानें आपल्याला जन्मास घातलें आहे व तें कर्तव्य आपण केलें पाहिजे" ही शिवाजीची श्रद्धा दृढ होऊं लागली. त्याच्या आयुष्यांत अनेक आणीबाणीचे प्रसंग गुदरले. ते इतके कीं, त्याच्या हातून किंचित् जरी चूक झाली असती तरी त्याच्या सर्व उदात्त आशा-आकांक्षांवर पाणी पडलें असतें. अशा प्रत्येक प्रसंगीं, ईश्वराशिवाय दुसरा कोणी आपणांस मार्ग दाखविणारा नाहीं या श्रद्धेनें त्यानें परमेश्वराचीच करुणा भाकली. परमेश्वर आपल्या अंतःकरणांत कांहीं तरी प्रेरणा उत्पन्न करील व संकटांतून बाहेर पडण्याचा मार्ग आपल्याला दाखवील अशी त्याची श्रद्धा होती. शिवाजीच्या स्वभावाचें व मनोरचनेचें हें अंग ज्यांनीं समजून घेतलें नाहीं त्यांना त्याच्या एकंदर आयुष्यक्रमाच्या रहस्याचा उलगडा होणार नाहीं.

इतिहासांत जे इतर अनेक थोर पुरुष होऊन गेले त्यांच्यांमध्यें व शिवाजीमध्यें हा फार मोठा फरक आहे. नेपोलियन, ज्यूलियस सीझर, अलेक्झांडर दि ग्रेट यांनीं मोठाले पराक्रम केले; पण त्यांच्या स्फूर्तीचा उगम वैयक्तिक महत्त्वाकांक्षेंत, ऐश्वर्यलालसेंत अथवा प्रदेश काबीज करण्याच्या भावनेंत होता. शिवाजीच्या स्फूर्तीचा उगम स्वधर्मरक्षणाच्या म्हणजे हिंदूंच्या सर्वस्वरक्षणाच्या आकांक्षेंत होता.

शिवाजीचें धर्मप्रेम व धर्मासाठीं प्राणहि वेंचण्याचा त्याचा निर्धार हा इतका जबरदस्त होता कीं, जे जे त्याच्या कक्षेंत येत त्या सर्वांवर त्याची विलक्षण छाप बसे. "ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें, त्यांस वेध लागून वाटावें कीं, हे परम थोर आहेत, यांचेच संमतें चालावें, हे सांगतील तसें वर्तावें; प्राणहि गेले तरी जावोत, परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें."

शिवाजीच्या अंगचा विलक्षण व अलौकिक गुण अशा प्रकारचा होता. म्हणूनच, मुसलमानी राज्यकर्त्यांच्या गुलामागिरींत वागण्याची जी स्वाभिमानशून्यतेची वृत्ति हिंदु समाजांत पसरली होती ती त्यानें साफ बदलून टाकली व सर्व समाजाला स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं कार्यप्रवण केलें. स्वदेश आणि स्वधर्म यांकरितां आपल्या प्राणांचेंहि मोल देण्यास महाराष्ट्रीयांनीं मागेंपुढें पाहूं नये असा अलौकिक आवेश त्यांच्या अंगांत शिवाजीनें उत्पन्न केला. याचें प्रत्यंतर, बाजी प्रभू व त्याचे एक हजार सैनिक यांनीं शिवाजीच्या आज्ञापालनासाठीं आपल्या प्राणांची जी आहुति दिली त्यासारख्या अनेक प्रसंगीं मिळालें.

शिवाजीचें स्वधर्मप्रेम जबरदस्त होतें; परंतु त्या धर्मप्रेमाला धर्मवेडाचें स्वरूप चुकूनसुद्धां कधीं आलें नाहीं. त्याच्या राज्यांत मुसलमानांना हिंदूइतकेंच रक्षण होतें. युद्धांत वगैरे कधीं कुराण सापडलें तर तो तें आदरपूर्वक आपल्या सैन्यांतल्या मुसलमानांकडे पोंचतें करी. त्याच्या मनाचा हा संयम व हा समतोलपणा, विशेषतः त्या काळांत, अलौकिक होता. विजापूरचा आदिलशहा व गोवळकोंड्याचा कुतुबशाहा हिंदुराज्यें बुडविण्यांत, हिंदूंच्या देवालयांचा विध्वंस करण्यांत व "काफीर ब्राह्मणांच्या शेंड्या" कापण्यांत धन्यता मानीत होते. औरंगजेबानें तर काशीविश्वेश्वराचें देवालय व आणखी असंख्य देवालयें पाडून आपला हिंदुद्वेष प्रकर्षानें प्रकट केला होता. याची स्वाभाविक प्रतिक्रिया अशी झाली असती कीं, उदयोन्मुख हिंदु राजानें आपल्या प्रदेशांत मुसलमानांना हीच वागणूक दिली असती. परंतु, शिवाजीनें या बाबतींत — व इतर सर्वच बाबतींत — पराकाष्ठेचा संयम दाखविला. त्याचें वर्तन सर्व प्रकारें निर्दोष होतें. मशिदी, कुराण अथवा मुसलमानांचें जीवित, वित्त वा इज्जत हीं त्याच्या राज्यांत हिंदू-

इतकींच सुरक्षित होतीं. "धर्मसंस्थापना हेंच शिवाजीच्या उद्योगाचें अधिष्ठान असलें तरी त्यांत परधर्मांचा उच्छेद बिलकुल अभिप्रेत नव्हता. धर्माचरण प्रत्येकानें स्वेच्छेनुसार करावें, त्यास कोणीं अडथळा किंवा त्यावर जुलूम करूं नये अशीच सहिष्णु भावना शिवाजीची होती."

शिवाजीमहाराजांच्या या सहिष्णुवृत्तीचा व उदारमनस्कतेचा विचार मनांत आणला म्हणजे आपण मध्ययुगांत नसून विसाव्या शतकांत आहों असें वाटूं लागतें. शिवाजीमहाराज ज्या वेळीं सर्वधर्मसहिष्णुतेचें हें उदाहरण घालून देत होते व आरमाराच्या प्रमुखत्वासारख्या जागेवर मुसलमानाची नेमणूक करीत होते त्या वेळीं, पुरोगामी म्हणविणाऱ्या इंग्लंडमध्येंसुद्धां रोमन कॅथलिक, ज्यू वगैरे धर्मांच्या लोकांना सरकारी नोकरींत मज्जाव होता. मनाची ही कोती वृत्ति घालविण्यापूर्वी इंग्रजांना आणखी दीडशें पावणेदोनशें वर्षें काढावीं लागलीं !

शिवाजीमहाराजांचें केवळ बाळपणच नव्हे तर त्यांच्या जन्माआधींचें त्यांच्या मातु:श्रींचें गर्भारपणहि आपत्तींतच गेलें होतें. शहाजीनें दुसरें लग्न केलें होतें. ( संभाजी मोहित्याची बहीण गुणाबाई ही त्याची दुसरी बायको.) त्या नादांत अथवा अन्य कांहीं अडचणींमुळें जिजाबाईची वास्तपुस्त करण्यासहि शहाजीला फुरसद झाली नाहीं असें दिसतें. मोंगलांच्या भयानें जिजाबाईला शिवनेरीच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलें. तेथेंच ( ६ एप्रिल १६२७ ) शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. पुढें १६३३ पर्यंत सहा वर्षें जिजाबाई व बालशिवाजी तेथेंच होते. त्या सुमारास शहाजी निजामशाहीच्या रक्षणार्थ मोंगलांशीं झगडत होता. त्यास शरण आणावें म्हणून मोंगलांनीं जिजाबाईस पकडून अटकेंत ठेवलें. पण या संकटाची चाहूल तिला लागली असल्यानें तिनें शिवाजीमहाराजांना गुप्तपणें शिवापुरास पाठवून दिलें. त्यांचा अज्ञातवास तीन वर्षेंपर्यंत चालू होता. दरम्यान, जिजाबाईचा चुलता जगदेवराव जाधव मोंगलांच्या नोकरीत होता. तो मोंगल सेनापति महाबतखान यास म्हणाला कीं, " शहाजी व जिजाबाई यांचें बिलकुल पटत नाहीं. त्यानें दुसरी बायको केली असून जिजाबाई त्याचेजवळ नांदत नाहीं. म्हणून हिला कैदेंत ठेवल्यानें शहाजीला उलट बरें वाटेल. मात्र तेणेंकरून आम्हां

जाधवांचा अपमान होतो. तरी तिला सोडून द्यावी." जिजाबाईची सुटका अशा प्रकारें झाली. पुढें १६३६ सालीं मोंगलांशीं तह झाल्यावर शहाजी विजापुरास गेला व जिजाबाई शिवाजीमहाराजांना घेऊन दादोजी कोंडदेवाबरोबर पुण्यास आली.

शिवाजीला शहाजीपासून स्फूर्ति मिळण्याची कसलीच शक्यता नव्हती. शहाजीजवळ शिवाजी कधीं राहिलाच नाहीं. १६४० ते ४२ च्या सुमारसा कांहीं काळ बंगलोर येथें व कांहीं काळ विजापूर येथें शिवाजी शहाजीजवळ होता. शहाजीचा विचार त्याला विजापूर दरबारांत दाखल करण्याचा होता. त्या उद्देशानें महंमद आदिलशहाच्या भेटीस त्यानें शिवाजीस नेलेंहि. पण इतर सरदारांनीं बादशहास ज्या प्रकारें जमिनीवर पालथें पडून व शिरस्त्राण काढून कुर्निसात केला तसा शिवाजीनें केला नाहीं. दोन हात जोडून साधा नमस्कारच केला ! त्यामुळें व विजापुरास एके ठिकाणीं गोवध होत असतां शिवाजीनें त्यास आपला सक्रिय विरोध दर्शविल्यामुळें शहाजीला अडचण उत्पन्न झाली. शिवाजीला दरबारी वातावरणांत वाढविण्याचा बेत शहाजीनें रद्द केला. त्याची व जिजाबाईची त्यानें पुण्यास रवानगी केली. त्या वेळीं शिवाजीचें वय पंधरा वर्षांचें होतें. त्यानंतर वीस वर्षेपर्यंत शहाजीनें शिवाजीचें अथवा जिजाबाईचें तोंड पाहिलें नाहीं !

शहाजीपासून दूर रहाण्यानेंच हिंदुपदपातशाही स्थापण्याच्या शिवाजीमहाराजांच्या अंतःस्फूर्तीला प्रोत्साहन मिळालें. मावळ्यांची संघटना करण्यास आणि एक एक किल्ला हस्तगत करून आपलें सामर्थ्य वाढविण्यास त्यांना पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. तिकडे शहाजीनें आपला मोठा मुलगा ( जिजाबाईपासून झालेला ज्येष्ठ पुत्र ) संभाजी यास आदिलशाहीच्या नोकरींत घातलें; आणि दुसऱ्या बायकोपासून झालेल्या व्यंकोजीलाहि तो मोठा झाल्यावर, विजापूरचा नोकर म्हणूनच पुढें आणलें !

रामायण व महाभारत यांतील उदात्त प्रसंगांच्या श्रवणानें अथवा जिजाबाईच्या व दादोजी कोंडदेवाच्या शिकवणीनें महाराजांच्या बालमनांत स्वराज्य-स्थापनेची स्फूर्ति उद्भवली असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण त्या उदात्त प्रसंगांचें श्रवण त्या वेळीं अनेक हिंदु तरुण करीत होते; आणि

उपदेश जर प्रभावी ठरणार असता तर स्वतः शिवाजीमहाराजांनीं पुढें जातां आपला पुत्र संभाजी यास काय थोडाथोडका उपदेश केला ? पण बापाविरुद्ध मोंगलांस तो फितूर झाला व तेथून परत आल्यावरसुद्धां सन्मार्गाला लागलाच नाहीं ! सारांश, ही स्फूर्ति स्वतः शिवाजीमहाराजांचीच, अगदीं लहानपणापासूनची होती. इतर गोष्टी व विशेषतः जिजाबाईची शिकवण त्या वृत्तीस पोषक झाली यांत शंका नाहीं. परंतु अन्यायापुढें मान तुकवावयाची नाहीं, कोणाची कोणावर जुलूमजबरदस्ती चालूं द्यावयाची नाहीं ही वृत्ति शिवाजीमहाराजांच्या अंगांत उपजतच होती. ती त्यांच्या ठिकाणीं एवढ्या प्रकर्षानें नसती तर त्यांच्या हातून एवढालीं पराक्रमाचीं कृत्यें घडलींच नसतीं.

कोणी म्हणतात कीं, शिवाजी केवळ महत्त्वाकांक्षी व साहसी इसम होता; वाटेल त्या मार्गानें आपलें नशीब काढणें एवढेंच त्याचें ध्येय होतें. पण हें मत सर्वस्वीं चुकीचें व शिवाजीमहाराजांची बदनामी करणारें आहे. त्यांच्या ठिकाणीं केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षाच असती तर विजापूरच्या किंवा मोंगलांच्या दरबारांत सरदारकी पतकरून त्यांना ती तृप्त करतां आली असती. तो वैयक्तिक सुखाचा व विलासी समृद्धीचा मार्ग त्यांनीं मुद्दाम वर्ज्य ठरविला आणि जाणूनबुजून संकटांत उडी घेतली. विजापूरची प्रचंड राजसत्ता व तिजहूनहि बलवत्तर अशी मोंगलाची साम्राज्यसत्ता या दोहोंविरुद्ध, बापाचें अथवा दुसऱ्या कोणा थोरामोठ्याचें साह्य नसतांना, त्यांनीं एकाकी लढा सुरू केला; अनेक वेळां स्वतःचा प्राण धोक्यांत घातला; वर्षानुवर्षें अत्यंत कष्टाचें व त्रासाचें जीवन पतकरलें; — या सर्व आपत्ति त्यांनीं स्वतःवर उघड्या डोळ्यांनीं कां ओढवून घेतल्या ? संपत्ति, ऐश्वर्य, सुखोपभोग, राजशाही विलास — हें सर्व पायाशीं उभें असतांना त्यावर महाराजांनीं लाथ कां मारली व दऱ्याखोऱ्यांतलें वास्तव्य व संकटमय जीवन कां पतकरलें ? लौकिक वैभव व लौकिक सुखविलास यांहून त्यांना ध्येयाची महती अधिक वाटली म्हणूनच ना ? हिंदूंना दास्यमुक्त व अन्यायमुक्त करण्याची, जुलमी परकीयांपासून स्वधर्माचें व आपल्या संस्कृतीचें रक्षण करण्याची, स्वकीयांना अब्रूनें व मानानें जगतां येईल अशी परिस्थिति निर्माण करण्याची,—या सर्व गोष्टींची महती महाराजांना स्वसुखाहून अधिक

वाटली म्हणून त्यांनीं हें खडतर जीवन पतकरलें. महाराजांचा हा फार मोठा त्याग होता. इतिहासांत याला कोठें तोड सापडणार नाहीं.

शिवाजीनें आपल्या बाळपणांतला एक क्षणहि वाया घालविला नाहीं. लांबलांबचे प्रवास करून व डोंगर, दऱ्या, खोरीं इत्यादिकांत प्रहर न् फिरून त्यानें आपल्या अंगीं कमालीचा काटकपणा आणला. असले कष्ट सहन करण्यांत तो कोणालाहि हार जात नसे. जंगली प्रदेशांत फिरणाऱ्या मावळे लोकांना त्यानें आपले सोबती व स्नेही केले. त्यांच्याबरोबर अनेक अवघड जागीं फिरून स्वारी-शिकारी करणें, डोंगरांतील चोरवाटा धुंडाळणें, गरीब व कष्टकरी लोकांच्या व्यवसायांचें बारीक निरीक्षण करणें, डोंगरांतील चोरवाटा माहीत करून घेणें, वारा, ऊन, पाऊस इत्यादिकांची तमा न बाळगतां दिवसच्या दिवस भटकत राहणें — यांत शिवाजीनें पुष्कळ काळ घालविला; मावळ भागांतील व महाराष्ट्राच्या इतर भागांतील सह्याद्रीचा असा कोणताहि भाग नसेल कीं, ज्याला शिवाजीचा पदस्पर्श घडला नाहीं. शिवाजीचें हें नुसतें भटकणें नव्हतें. प्रत्येक ठिकाणाची व अवघड वाटांची तपासणी तो बारकाईनें करी. या माहितीचा पुढें स्वराज्यसंपादनाच्या कामांत त्याला फार उपयोग झाला. या बाबतींत शिवाजीची तुलना नेपोलियन बोनापार्टशीं करतां येण्याजोगी आहे. नेपोलियनला असाच नाद होता. कोठल्याहि भूप्रदेशाची पाहणी करणें, त्याचें जरूर तर मोजमाप घेणें, चोरवाटा माहीत करून घेणें — असले उद्योग नेपोलियन हौसेनें करी. त्यामुळें पुष्कळदां असें होई कीं, शत्रूच्या प्रदेशांतलीसुद्धां असली माहिती शत्रूपेक्षां नेपोलियनला अधिक असे. एकदां एका लढाईत दिवसभर लढून नेपोलियनचे सैनिक थकले. रात्र पडली, आणि नेपोलियननें आपल्या फौजेला एकदम परत फिरण्याचा हुकूम सोडला. सैनिक अत्यंत नाराज झाले. कधींच न अनुभवलेला असा, शत्रूला पाठ दाखविण्याचा प्रसंग आलेला पाहून त्यांना मनस्वीं वाईट वाटलें. परंतु परिणामीं वेगळेंच घडलें. नेपोलियननें, शत्रूलाहि ठाऊक नसलेल्या चोरवाटेनें आपली फौज नेमकी शत्रूच्या पाठीमागें नेऊन उभी केली व शत्रूला रणांगण सोडून पळावयास लावलें. शिवाजीचें महाराष्ट्रांतील भूप्रदेशाचें ज्ञान अशाच प्रकारचें होतें. तो व त्याचे सेनापति हे सर्व या शास्त्रांत तरबेज झालेले होते. म्हणूनच,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. हस्तप्रत.
अनुक्रम ........ दि: ........

अफजुलखानाशीं सामनी देण्याचा प्रसंग जेव्हां आला तेव्हां शिवाजीच्या सर्व फौजा, खानाला संशय येणार नाहीं अशा प्रकारें, दऱ्याखोऱ्यांत व झाडींत दडून बसूं शकल्या व योग्य वेळीं खानाच्या वरचढ सैन्याचा पाडाव करूं शकल्या ( १६५९ ). कल्याणच्या खजिन्यावर छापा घालण्याचें काम अशा हिकमतीनेंच यशस्वी होऊं शकलें ( १६५७ ). पुढें मोंगलांचा सरदार शाहिस्तेखान शिवाजीवर चालून आला व खुद्द पुण्यांत शिवाजीच्याच वाड्यांत तळ देऊन राहिला. तेथून त्यानें उत्तर कोंकण प्रांत शिवाजीच्या ताब्यांतून घेण्याचें ठरविलें, व या कामगिरीवर करतलबखान हा नांवाजलेला सरदार पाठविला. तो पुण्याहून निघाला आणि लोहगडाखालच्या उंबरखिंडीनें कोंकणांत उतरूं लागला. त्याच्या हालचालीची बरोबर माहिती शिवाजीला होती. खिंडीच्या सभोंवार डोंगराच्या दाट झाडींत त्यानें आपली फौज गुप्तरूपें बसवून ठेविली; आणि अवघड जागेंत मोंगलांच्या फौजा पूर्ण काबूंत येतांच त्यांच्यावर हल्ला करून त्यांची हालचाल पूर्णपणें बंद करून टाकली. मागच्यांना पुढच्यांची दाद नाहीं, आणि पुढच्यांना मागच्यांची नाहीं. काय झालें हें कळण्यासच त्यांना दोन प्रहर लागले. भला मोठा दंड कबूल करून व सर्व शस्त्रास्त्रें व इतर सामान स्वाधीन करून करतलबखानानें आपली सुटका करून घेतली !

या सर्व पुढील पराक्रमांची पूर्वतयारी शिवाजीमहाराजांनीं आपल्या बाळपणांत करून ठेवली. शरीराचा काटकपणाहि कमावला आणि महत्त्वाचें ज्ञानहि संपादन केलें. शिवाजीमहाराज वीस वर्षांचे असतांना दादोजी कोंडदेव वारले. पण त्याच्या आधींच त्यांनीं शिवाजीमहाराजांचें भावी थोरपण ओळखलें होतें; महाराजांचें अद्भुत पराक्रमशालित्व दादोजींच्या मनावर मरणापूर्वींच बिंबलें होतें; त्यांच्या भावी उत्कर्षाची व महत्कार्यांची अस्फुट कल्पना त्यांना आली होती. महाराजांना दादोजी सदरेस बसवीत, व मावळे लोकांत चालणारे भाऊबंदकीचे व वतनांचे तंटे त्यांच्यासमोर व त्यांच्याकरवीं समाधानकारक रीतीनें मिटवीत. यायोगें महाराजांना पुष्कळ बहुमूल्य अनुभव मिळाला. अल्पवयांतच असल्या गंभीर गोष्टींत लक्ष घालून त्यांनीं आपलें मन सुसंस्कृत, न्यायप्रिय व लोकसंग्रहोन्मुख बनविलें.

शिवचरित्राच्या या भागापासून सद्यःकालीन तरुणांना पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. अंगीं योग्यता सहजासहजीं येत नसते. त्यासाठीं शरीर व मन दोहोंची फार मोठी तपश्चर्या करावी लागते. व्यायामानें व कष्टानें शरीरहि कमावलें पाहिजे आणि विद्येच्या अखंड व्यासंगानें मनहि सुसंस्कृत केलें पाहिजे. शाळा-कॉलेजांच्या सुट्या या सुट्या समजतां कामा नयेत. अधिक ज्ञान संपादन करण्याची व उपयुक्त अशी विविध माहिती मिळविण्याची ती एक संधीच होय असें समजून वागलें पाहिजे. शिवाजी-महाराजांच्या बालवयांतील आयुःक्रमापासून एवढा तरी बोध तरुण-मंडळींनीं अवश्य घ्यावा. अठरा वर्षांच्या वयांत शिवाजीमहाराजांनीं व त्यांच्या अनेक साथीदारांनीं रोहिडेश्वरासंनिध स्वराज्य-संस्थापनेच्या व त्यासाठीं वाटेल तो त्याग करण्याच्या शपथा घेतल्या. आजच्या तरुणांनी एवढी जरी प्रतिज्ञा केली कीं, शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यसंस्थापनेसाठीं जसे कष्ट घेतले तसे कष्ट आम्ही ज्ञानार्जनासाठीं घेऊं व सर्व तऱ्हेची पात्रता अंगीं आणून स्वतःची व महाराष्ट्राचीहि ऊर्जितावस्था घडवून आणूं,—एवढें जरी त्यांनीं केलें आणि ती प्रतिज्ञा निष्ठेनें पार पाडली तरी पुष्कळ झालें. उदयोन्मुख व उत्कर्षेच्छु तरुणांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, केवळ छचोरपणानें व उथळपणानें कोणाचेंच बरें होत नाहीं. जीविताकडे व आयुष्यांतल्या विविध प्रश्नांकडे गंभीरपणानें पाहण्याची व त्यांचा गंभीरपणें विचार करण्याची संवय पूर्ववयांतच अंगीं आणली पाहिजे. विसावें वर्ष पुरें होण्यापूर्वींच शिवाजी-महाराजांनीं तोरणा, राजगड, सिंहगड ( कोंडाणा ) इत्यादि किल्ले हस्तगत केले होते; मावळ्यांमध्यें स्वराज्य संस्थापनेची कल्पना पेरून ती रुजविली होती; कित्येक कर्तबगार तरुण आपल्या छापेंत आणले होते; मावळे-देशमुखांची आपापसांत भांडण्याची वृत्ति आटोक्यांत आणून त्यांच्यापुढें हिंदुराज्याचें उज्ज्वल ध्येय ठेवलें होतें. ‘ छत्रपति ’ हें विशिष्ट पद व आपली राजमुद्रा या वेळेपासून उपयोगांत आणण्यास त्यांनीं सुरुवात केली होती.

एवढाले पराक्रम व भावी पराक्रमांचे एवढाले निर्धार ज्या शिवाजी-महाराजांनीं इतक्या अल्पवयांत केले त्यांच्या चारित्रापासून वर दर्शविलेला अल्पसा बोध सध्यांच्या तरुणांनीं कां घेऊं नये ?

• • •

# प्रकरण तिसरें

## श्री शिवाजीमहाराजानीं राष्ट्र निर्माण केलें म्हणजे काय केलें ?

श्री शिवाजीमहाराजांनीं केवळ राज्यच मिळविलें नाहीं तर स्वराज्य मिळविलें; म्हणजे जेणेंकरून हें आपलें राज्य आहे असें सर्व महाराष्ट्रीयांना वाटेल असें राज्य स्थापन केलें. इतकेंच नव्हे तर महाराजांनीं राष्ट्र निर्माण केलें; महाराष्ट्रीयांमध्यें आणि कांहीं अंशीं सर्व हिंदूंच्या ठायीं राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली.

शिवाजीच्या या कर्तृत्वाचा अर्थ आपण नीट समजून घेतली पाहिजे.

शिवाजीनें राष्ट्र निर्माण केलें म्हणजे काय केलें ? तें कोणत्या साधनांनीं केलें ? त्याचे तात्कालिक व दूरगामी परिणाम कोणते झाले ? त्याचा व्याप केवढा होता ?

ध्येयनिष्ठा, संस्कृतीचें प्रेम, धर्मावरची श्रद्धा, स्वत्वाची भावना, स्वदेशभक्ति इत्यादि मोठाले गुण शिवाजीनें महाराष्ट्रीय जनतेंत पेरले. अन्यायाचा व जुलमाचा प्रतिकार करण्याची व त्या कामीं पडतील ते कष्ट सोसण्याची तयारी स्वजनांमध्यें आणली. स्वधर्मरक्षणासाठीं वाटेल तो त्याग करण्याची प्रेरणा महाराष्ट्रीयांत निर्माण केली. हिंदु धर्माच्या व हिंदु संस्कृतीच्या रक्षणाचें

जें उज्ज्वल ध्येय त्याविषयींच्या निष्ठेनें लक्षावधि लोकांचीं मनें त्यानें इतकीं भारून टाकलीं कीं त्या ध्येयासाठीं वाटेल ते कष्ट सोसण्यास, झगडण्यास, प्रसंगीं प्राणसुद्धां खर्चीं घालण्यास हे लोक तयार झाले. विचाराची, ध्येयाची व कर्तव्यबुद्धीची ही एकात्मता शिवाजीनें स्वदेशबांधवांत निर्माण केली. म्हणूनच प्रत्येक लढाईत, प्रत्येक साहसी उपक्रमांत व प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगीं त्याचे लोक इमानानें, निष्ठेनें व कर्तव्यबुद्धीनें वागले. औरंगजेब बादशहाच्या भेटीस शिवाजी आग्र्याला गेला असतां तेथें त्याला कैद झाली; तेथून सुटका होण्याची शक्यता कित्येक महिने दिसत नव्हती; आणि आग्र्याहून सुटल्यावरसुद्धां कित्येक महिने त्याचा ठावठिकाणा कोणास माहीत नव्हता. एकंदरींत साडे आठ महिने (५।३।६६ ते २०।११।६६) तो राजधानीच्या बाहेर होता. परंतु तो जेव्हां परत आला तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं, आपण आपल्या मागें राज्याची जी व्यवस्था करून गेलों होतों ती उत्कृष्ट प्रकारें चालू राहिली; किंबहुना अपेक्षेहून सरस रीतीनें ज्यांनीं त्यांनीं आपापलीं कर्तव्यें पार पाडलीं. हें कशानें घडलें ? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, वर वर्णन केलेली राष्ट्रीयत्वाची तशी प्रखर भावनाच स्वकीयांमध्यें शिवाजी निर्माण करूं शकला होता. शिवाजी आग्र्यास तीन महिने नजरकैदेंत होता. त्या वेळीं औरंगजेबाचा एक प्रमुख सरदार व सेनापति मिर्झा राजा जयसिंह हा दक्षिणेंत होता. त्याच्याच स्वारीपुढें शिवाजीला पडतें घेऊन तह करावा लागला होता व पुढें जयसिंहानेंच सुरक्षिततेचा पूर्ण भरंवसा दिला म्हणून शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस गेला. औरंगजेबाच्या मनांत शिवाजीचा शिरच्छेद करावा असें होतें. तसल्या अपकृत्यापासून त्याला परावृत्त करण्यासाठीं राजा जयसिंहानें औरंगजेबाला अनेक पत्रें लिहिलीं. एका पत्रांत जयसिंह म्हणतो :—

" शिवाजीला कैदेंत ठेवून अथवा ठार मारून आपणांस कांहीं एक फायदा नाहीं. तो एकटा नाहींसा झाल्यानें मराठ्यांचें राज्य मोडेल अशांतला बिलकुल प्रकार नाहीं; इतकी त्याची व्यवस्था इकडे परिपूर्ण झालेली आहे. उलट, शिवाजीची मर्जी संभाळून त्याचा योग्य उपयोग करून घेण्यांतच दक्षिणेंतील आपला डाव सुधारणार आहे. "

शिवाजीनें राष्ट्र तयार केलें तें हेंच. आपल्या देशबांधवांमध्यें त्यानें अशी स्फूर्ति, त्यागवृत्ति व कर्तव्यनिष्ठा निर्माण केली होती कीं, औरंगजेबानें त्याचा तिकडे शिरच्छेद जरी केला असता तरी त्यामुळें मोंगलांचा फायदा झाला नसता; उलट, मराठे लोक मोंगलांविरुद्ध चिडले असते व अधिक त्वेषानें व निकरानें लढले असते. पुढें, संभाजीच्या वधानंतर या सत्याची प्रचीति औरंगजेबास पूर्णपणें आली. शिवाजीच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं ( १६८२ ) स्वतः औरंगजेब दक्षिणेंत प्रचंड सैन्यानिशीं आला व शिवाजी-महाराजांनीं प्रस्थापित केलेलें हिंदूंचें राज्य बुडवावें म्हणून सतत पंचवीस वर्षें त्यानें आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १६८९ मध्यें त्यानें संभाजी-महाराजांचा वध केल्यानंतर तर मराठ्यांचें नेतृत्व करूं शकेल असा राजासुद्धां राहिला नव्हता. कारण शिवाजीचा दुसरा पुत्र राजाराम हा अल्पवयस्क व अननुभवीच होता. परंतु शिवाजीमहाराजांनीं जी प्रेरणा मराठ्यांच्या ठायीं निर्माण केली होती तिचा प्रभाव एवढा जबरदस्त होता कीं, त्या काळीं सर्व जगांत पहिल्या प्रतीची गणली जाणारी मोंगल साम्राज्यशाही त्यांनीं कस्पटासमान मानली; औरंगजेबाचे सारे प्रयत्न निष्फळ ठरविले व शेवटीं मराठ्यांच्या फौजांपुढें त्याला पळ काढावा लागला व अहमदनगरच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. तेथेंच तो मृत्यु पावला ( १७०७ ).

शिवाजीमहाराजांनीं निर्माण केलेल्या या हिंदु राष्ट्रीयत्वाचा प्रभाव महाराष्ट्रापुरताच मर्यादित राहिला नाहीं. उत्तरेकडे रजपूत सरदारांमध्येंहि त्या प्रेरणेनें मूळ धरलें; मोंगल बादशाहीविरुद्ध त्यांच्यांत बेदिली माजली; खुद्द औरंगजेबाच्या हयातींत ती त्याला जाणवली.

पुढें औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ही हिंदु राष्ट्रीयत्वाची प्रेरणा – शिवाजी-महाराजांनीं मराठ्यांत पेरलेली स्वधर्मरक्षणाची ऊर्मि––अधिक व्यापक व प्रबळ बनली. पहिल्या बाजीराव पेशव्यानें ( १७२०-१७४० ) तापी नदीपासून यमुनेच्या किनाऱ्यापर्यंतचा — मध्यप्रांत, बुंदेलखंड, गुजरात व माळवा –– इतका प्रदेश मोंगलांच्या जुलमांतून मुक्त केला.

मनुष्याच्या देहाच्या कोणत्याहि भागाला इजा झाली असतां त्याचें दुःख जसें सर्व देहाला जाणवतें, तद्वत् राष्ट्राच्या कोणत्याहि भागावर झालेला आघात

अथवा राष्ट्राचा झालेला किंचित्सुद्धां अवमान राष्ट्राच्या सर्व घटकांना जाणवणें, त्याच्या वेदना समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोंचणें हेंच राष्ट्रीयत्व. तें शिवाजीमहाराज मराठ्यांमध्यें व कांहीं अंशीं उत्तरेकडेच्या हिंदु लोकांमध्यें निर्माण करूं शकले. त्यायोगेंच पुढें पेशव्यांच्या आमदानींत हा भारत देश मोंगलांच्या कचाट्यांतून सुटला; हिंदु धर्म सुरक्षित राहिला; हिंदूंची प्राचीन संस्कृति टिकून राहिली; दहा हजार वर्षांइतक्या जुन्या वैदिक संस्कृतीचा अभिमान बाळगणारीं माणसें जिवंत राहिलीं. बुद्ध, महावीर, आद्य शंकराचार्य इत्यादिकांच्या सुधारणावादी प्रयत्नांनीं अधिक उज्ज्वल बनलेल्या हिंदु धर्माचा व हिंदु संस्कृतीचा वारसा सांगणारे कोट्यवधि लोक पृथ्वीच्या पाठीवर शिल्लक राहिले. आज तेंच हिंदु राष्ट्र स्वतंत्र होत्सातें जगांतल्या प्रमुख राष्ट्रांमध्यें मानाची जागा भूषवीत आहे. आणि आमच्या प्रचलित राज्यकर्त्यांना जरी या राष्ट्राला हिंदु राष्ट्र म्हणून संबोधणें कमीपणाचें वाटत असलें तरी हें राष्ट्र वस्तुतः हिंदूंचेंच आहे आणि तें हिंदूंचेंच राहणार आहे. या अभिमानास्पद घटनेचें श्रेय श्री शिवाजीमहाराजांना आहे हें ओळखणारे व हें मान्य करणारे राज्यकर्ते लौकरच पुढें येतील व कृतघ्नतेचा सध्यांचा कलंक धुऊन टाकतील; असो.

दशलक्षावधि लोकांमध्यें ही प्रेरणा शिवाजीनें कोणत्या साधनांनीं निर्माण केली ? शेंकडों पराक्रमशाली योद्धे, सेनापति, मुत्सद्दी व राजकारणकुशल लोक—हिंदुत्वाच्या रक्षणासाठीं पराकाष्ठेचा त्याग करण्याची तयारी असलेले अगणित लोक—निर्माण करण्यासाठीं शिवाजीनें कोणतीं साधनें वापरलीं ? पहिली व सर्वांत महत्त्वाची गोष्ट, हिंदु धर्माच्या रक्षणासाठीं व हिंदूंवर होणाऱ्या जुलमाच्या प्रतिकारासाठीं शिवाजीनें सतत परिश्रम केले, मारखे कष्ट सोसले. १६४५ पासून १६८० पर्यंत, वयाच्या १७ व्या वर्षापासून त्रेपन्नाव्या वर्षीं मृत्यु येईपर्यंत तो एकसारखा झगडत होता. दुसरी गोष्ट, जेव्हां जेव्हां आणीबाणीचा प्रसंग उद्भवला तेव्हां तेव्हां आपल्या सहकाऱ्यांबरोबर संकटांत उडी घेण्याच्या कामीं तो अग्रभागीं होता. १६४८ पासून १६५८ पर्यंत विजापूरच्या सैन्यांविरुद्ध व विजापूर दरबारच्या हस्तकांविरुद्ध, जातीनें पुढाकार घेऊन त्यानें अनेक युद्धप्रसंग केले. त्यानंतर

अफजुलखानाचें संकट जेव्हां उभें राहिलें तेव्हां त्यास तोंड देण्यास तो स्वतः पुढें झाला. त्याच्या जीविताला तो मोठा धोका होता. पण सैन्य वाया घालविण्याऐवजीं स्वतःच्या प्राणाचा धोका त्यानें पतकरला. त्यानंतर मोंगल सरदार शाहिस्तेखान याच्या निवासस्थानावर रात्रीचा छापा घालण्याचा बेत जेव्हां ठरला तेव्हां त्या टोळींत तो अग्रभागीं होता. त्यांतहि त्याच्या प्राणाला फार मोठा धोका होता. पुढें १६६६ सालीं तो औरंगजेबाच्या भेटीला गेला तेव्हांहि त्याच्या प्राणाला उघड उघड धोका होता. परंतु जाणून बुजून, प्रदीर्घ सल्लामसलतीनंतर व पूर्ण विचाराअंतीं त्यानें तें साहस केलें. उत्तरेकडच्या हिंदु लोकांमध्यें, विशेषतः रजपूत सरदारांमध्यें, हिंदुत्वाची ज्योत पेटविण्यास संधि मिळावी म्हणून त्यानें तो धोका उघड्या डोळ्यांनीं पतकरला. त्यानंतर अखेरपर्यंत ध्येयसिद्धीसाठी त्याचे परिश्रम अविरत चालू होते. राज्याची अंतस्थ व्यवस्था लावण्यासाठीं व इतर जमवाजमव करण्यासाठीं, आग्र्याहून सुटून आल्यानंतर, जीं दोन-तीन वर्षें गेलीं तीं सोडलीं तर आयुष्याच्या अंतापर्यंत त्याच्या स्वाऱ्या व मोहिमा एकसारख्या चालूच होत्या. हिंदु राज्याच्या संस्थापनेसाठीं, त्याला बळकटी आणण्यासाठीं व हिंदु धर्माच्या रक्षणासाठीं जो पुरुष स्वतः एवढे कष्ट घेतो त्याची छाप इतरांवर कां नाहीं पडणार व त्या ध्येयनिष्ठेनें ते कां नाहींत भारले जाणार ?

शिवाजीचें वैयक्तिक चारित्र्यहि या गोष्टीस कारणीभूत झालें. त्याला कसलेंहि व्यसन नव्हतें. त्याची रहाणी साधी होती. आपल्या सहकाऱ्यांबरोबर व सैनिकांबरोबर सर्व कष्ट सोसण्याची त्याची तयारी असे.

आणि या सर्वांहून अधिक प्रभावी ठरणारी गोष्ट म्हणजे त्याच्या अंगी असलेला विलक्षण पराक्रम, त्याचा बाणेदार, दयाळू व दिलदार स्वभाव, जगाला दिपवून टाकणारे त्याच्या अंगचे शौर्य, साहस, हिकमतबाजपणा, मुत्सद्दीपणा इत्यादि गुण. मोठ्या योद्धयांच्या व मोठ्या राज्यकर्त्यांच्या अंगीं असणें अवश्य असलेला अमुक एक गुण शिवाजीच्या अंगीं नव्हता असें नाहीं. आणि अमुक एक दोष त्याच्या ठिकाणीं होता असें त्याचे शत्रूहि म्हणूं शकत नाहींत.

अर्थात् शिवाजीच्या अंगचे हे सर्व मोठाले गुण प्रकट होण्यास पुष्कळ अवधि लागला. त्याच्या शौर्यानें, पराक्रमानें व मुत्सद्देगिरीनें सामान्य व असामान्य लोकांचे डोळे दिपण्यास व ते त्याचे अनुयायी बनण्यास बराच काळ जावा लागला. आणि त्याच्या लोकोत्तर गुणांच्या पूर्ण आविष्कारानंतर——विशेषत : औरंगजेबाच्या दाढेंतून तो सुटून आल्यानंतर —— त्याच्या हिंदु धर्माच्या निष्ठेनें आकृष्ट झालेले मोठाले लोक—छत्रसाल बुंदेला, कवि भूषण, गागाभट्ट यांसारखे उत्तर हिंदुस्थानांतले लोकसुद्धां त्याच्या दर्शनासाठीं व भेटीसाठीं दक्षिणेंत येऊं लागले. परंतु हें सर्व व्हावयास बराच अवधि लागला. प्रारंभीं त्यानें आपल्या भागांतले सामान्य लोक स्वतःच्या हुकमतींत आणले ते केवळ स्वतःची सद्भावना, आपली तळमळ व आपली सचोटी त्यांना पटवून देऊन; आपले चांगले विचार त्यांच्या मनावर बिंबवून. शिवाजी त्यांना असें म्हणत असला पाहिजे :—

" हा आपला हिंदूंचा देश. आपण येथे कित्येक पिढ्या नांदलों. असें असतां हे परके मुसलमान येथें येऊन आपणावर राज्य करूं लागले. रीतीप्रमाणें राज्य करूनच यांचें समाधान झालें नाहीं व होत नाहीं. हे हिंदूंचा धर्म बुडवावयास निघाले आहेत. हिंदूंचीं देवळें हे लोक पाडतात; हिंदूंना पूज्य असलेल्या मूर्ती फोडतात; गायींची कत्तल करतात; हिंदूंच्या स्त्रियांवर बलात्कार करतात; हिंदूंना जबरीने बाटवितात. एखाद्या हिंदूनें मुसलमानाची कांहीं आगळीक केली तर त्याला जबर शिक्षा होते, प्रसंगीं त्याची गर्दन उडविण्यांत येते. पण मुसलमानानें हिंदु स्त्री भ्रष्ट केली तर तें धर्मकृत्य समजलें जातें. मुसलमानानें गाय मारली किंवा देऊळ भ्रष्ट केलें तर तो धर्मप्रसार समजला जातो. अशा मामल्यांत हिंदु लोक मारले गेले तर तें क्षम्य मानलें जातें. अशा अपमानाच्या स्थितींत व गुलामगिरींत जगून काय उपयोग? त्यापेक्षां आपला धर्म व आपली इज्जत सांभाळण्यासाठीं मेलेलें काय वाईट? आणि हें कार्य तुमच्या-माझ्यासारख्या सामान्य लोकांनीं, शेतीभातीवर जगणाऱ्या मंडळींनींच केलें पाहिजे. आपल्यांतले मातबर लोक आपल्या उपयोगी पडणार नाहींत. ते मुसलमान बादशहाची ताबेदारी करण्यांतच धन्यता मानतात; बादशहाची मर्जी सांभाळण्यांत मग्न

असतात; स्वतःच्या जमातीविरुद्ध लढून व आपल्या जमातीचा धर्म बुडवून दरबारांत बढती मिळवूं पाहतात. त्यांचे डोळे उघडणार नाहींत. कारण त्यांनीं जाणून बुजून, स्वार्थासाठीं डोळे झांकले आहेत; आपला स्वाभिमान बादशहांच्या पायावर वाहिला आहे. म्हणून धर्मरक्षणाचें व हिंदूंच्या उद्धाराचें काम आपणासारख्या सामान्य लोकांनींच केलें पाहिजे; आपली एकजूट बांधली पाहिजे; आपल्या विचाराचे लोक वाढविले पाहिजेत; आणि त्यांच्यांत धर्मभावना व स्वाभिमानाची वृत्ति पेरून त्यांच्या साह्यानें हिंदूंचें स्वराज्य स्थापिलें पाहिजे. ”

हिंदुराष्ट्राच्या निर्मितीस व बांधणीस शिवाजीची लोकसंग्रह करण्याची वृत्तीहि साह्यभूत झाली. गुणी लोकांच्या गुणांचें व पराक्रमी लोकांच्या सेवेचें शिवाजीकडून योग्य चीज नेहमीं होई. तो त्यांच्याशीं औदार्यानें वागे, त्यांना मोठालीं बक्षिसें देई. यामुळें शत्रुपक्षांतलेसुद्धां गुणी लोक त्याच्या चाकरींत दाखल होत व इमानानें वागत.

हिंदूंचें ऐक्य बांधण्यासाठीं व टिकविण्यासाठीं त्यांतील जातिव्यवस्थेची दखल घेतली पाहिजे व सर्व प्रमुख जातींना, त्यांच्या त्यांच्या गुणांप्रमाणें व योग्यतेप्रमाणें, कामें वाटून दिलीं पाहिजेत हें शिवाजीनें ओळखलें होतें. त्याच्या अष्टप्रधानांत मराठे, ब्राह्मण व प्रभु—तिन्ही प्रमुख जातींचे लोक—असत. प्रत्येक किल्ल्यावर एक मराठा हवालदार किंवा गडकरी असे; लष्करी व्यवस्था त्याच्याकडे असे. दुसरा मोठा कामगार ब्राह्मण जातीचा सबनीस असे. तो मुलकी जमाबंदीचें काम पाही. तिसरा अधिकारी, घासदाणा, दारूगोळा, डागडुजी इत्यादि पाहणारा प्रभु जातीचा कारखाननीस म्हणून असे. इतर जातींच्या लोकांनाहि त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें राज्यांत कामें मिळत. जाति-जमातींचा हा समतोल राज्याच्या स्थैर्यास अत्यावश्यक होता. पेशवाईच्या उतरत्या काळांत ही दूरदृष्टि व समदृष्टि राहिली नाहीं; हें वैगुण्य मराठ्यांच्या सत्तेच्या ऱ्हासास कांहीं अंशीं कारणीभूत झालें.

या अनुषंगानें आणखी कांहीं विचार येथें नमूद करणें अवश्य आहे. धर्म, संस्कृति, श्रेष्ठ प्राचीन परंपरा इत्यादिकांच्या साह्यावांचून राज्याला व राष्ट्राला मजबुती येत नसते. समाजाच्या सर्व घटकांना एकत्र बांधणारीं

हीं फार प्रभावी बंधनें आहेत. आपल्या राष्ट्रांत दहा-पांच टक्के अन्यधर्मी लोक आहेत, तेव्हां ते बिचकतील या भीतीनें, या थोर परंपरांना गौणत्व देणें अथवा त्यांचा जाहीर उल्लेखसुद्धां टाळणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. आणि हिंदु राष्ट्राच्या या प्राचीन परंपरांमध्यें व भावनांमध्यें परधर्मीयांना जाचेल अथवा खटकेल असें काय आहे? हिंदुधर्म इतका व्यापक, इतका उदार, इतका सहिष्णु व इतका सर्वसंग्राहक आहे कीं परधर्मीयांना लागण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. स्वतः हिंदुधर्मसंरक्षक म्हणविणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या राज्यांत जर मुसलमान लोक सुखानें व स्वाभिमानानें जगत होते व मोठाल्या अधिकाराच्या जागा भूषवीत होते, तर आजच्या युगांत त्यांनीं अथवा दुसऱ्या कोणीं हिंदु राजवटीच्या कल्पनेला कां बिचकावें? धर्म, संस्कृति इत्यादि बाबी आतांशा मागें पडल्या असून सर्वत्र अर्थवादाला प्राधान्य मिळालें आहे हें खरें आहे. पण नुसता अर्थवाद राज्याच्या मजबुतीस व स्थैर्यास पुरा पडेल असें वाटत नाहीं. अगदीं स्पष्ट बोलावयाचें म्हणजे, राष्ट्राचा खरा आधारस्तंभ जो सुशिक्षित व सुसंस्कृत असा मध्यम वर्ग तो आजच आपल्या नव्या राजवटीवर कमालीचा नाराज आहे. एकीकडून बलाढ्य असा भांडवलवाल्यांचा वर्ग आणि दुसरीकडून आक्रमक बनलेला कामगारांचा वर्ग यांच्या दरम्यान या मध्यम वर्गाची दामटी वळली आहे.

अर्थवादाची उपासना अर्थात् अवश्य व अपरिहार्य आहे. सर्वसामान्य जनता — कष्टकरी जनता — उपाशी रहातां कामा नये. तिचें जीवन सुसह्य करणें हें समाजहितचिंतकांचें कर्तव्य आहे. पण नुसत्या — कोरड्या — अर्थवादाचा पुरस्कार करून राष्ट्राची बांधणी होत नसते; समाजाला मजबुती येत नसते. खुद्द शिवाजीमहाराजांच्या वेळीं विजापूरच्या दरबारांत व मोंगलांच्या दरबारांत अनेक प्रतिष्ठित गणले जाणारे हिंदु अर्थवादाच्याच आहारीं गेलेले होते. आजहि मोठाले भांडवलवाले शुद्ध अर्थवादीच असतात; निव्वळ पैशासाठीं व नफ्यासाठीं ब्रिटनच्या भांडवलवाल्यांनीं वाटेल तितकीं शस्त्रास्त्रें जर्मनीला विकलीं होतीं व तीं जर्मनांनीं ब्रिटिश सैनिकांविरुद्ध वापरलीं होतीं! शुद्ध, विशुद्ध, निर्भेळ अर्थवाद म्हणजे केवळ पैसा व वैभव याला परमेश्वर मानणें, व त्यासाठीं स्वदेश, स्वधर्म, मानवता व भूतदया यांचा होम

करणें ! अशा गोष्टी शिवाजीच्या काळांत घडल्या आहेत. त्याच्यापूर्वीं घडत होत्या, आज घडत आहेत. पैशाच्या लोभानें फितुरी करणारे पूर्वीं होते, आजहि आहेत. भांडवलवाल्यांच्या या निर्भेळ अर्थवादाविरुद्धच तर समाजवाद्यांचा लढा आहे. केवळ पैशाच्या लोभानें हे भांडवलवाले लोक मानव्याची उपेक्षा करतात, कामगारांना पिळतात, हें समाजवाद्यांच्या तत्त्वज्ञानाचें मुख्य सूत्र आहे. असें जर आहे, तर खुद्द समाजवाद्यांनीं केवळ अर्थवादावर भिस्त ठेवून, त्याच तत्त्वावर एकत्र येणाऱ्या कामगार-किसानांच्या संघटनेनें संतुष्ट राहूं नये. त्या अर्थवादाला मानवी मूल्यांची, संस्कृतिरक्षणाची, धर्मभावनेची, प्राचीन परंपरेच्या अभिमानाची जोड दिलीच पाहिजे. आणि हें साध्य करण्यासाठीं मध्यमवर्गीयांच्या हितसंबंधांचें रक्षण केलें पाहिजे; त्यांना संतुष्ट राखलें पाहिजे. कारण तोच वर्ग अर्थवादाच्या पलीकडे पाहणारा, मानवी मूल्यांची व संस्कृतीची कदर करणारा, राष्ट्रीयतेची चाड बाळगणारा, प्राचीन परंपरेच्या रक्षणासाठीं झीज सोसणारा असा आहे. भांडवलवाल्यांचा वर्ग शुद्ध अर्थाचीच उपासना करीत असतो व त्यापायीं ध्येयवादाला पारखा झालेला असतो. उलटपक्षीं कष्टकरी वर्ग, मामूल जीवनसाधनांच्या उणीवेमुळें असो अथवा त्याची एकंदर सांस्कृतिक पातळीच खालावलेली असते म्हणून असो, अर्थवादाच्या पलीकडे पाहण्यास असमर्थ असतो. एक वर्ग, पैसा फार साचल्यामुळें व पैसा हेंच ध्येय बनल्यामुळें, राष्ट्रीयत्वाचा व मानवतेचा वैरी बनलेला असतो; तर दुसरा वर्ग, प्रतिकूल परिस्थितीमुळें ध्येयवादाच्या पातळीपर्यंत पोंचण्यासच असमर्थ असतो. अशा स्थितींत राष्ट्रीयता, संस्कृति, मानवी मूल्यें, ध्येयनिष्ठा इत्यादिकांची जी काय जोपासना व्हावयाची ती मध्यमवर्गीयांकडूनच होणें शक्य आहे. आणि त्यांचीच उपेक्षा आज सत्तारूढ पक्षहि करीत आहे; आणि विरोधकांचा जो समाजवादी गट तोहि त्यांच्या उद्धाराला आपल्या कार्यक्रमांत स्थान देण्यास असमर्थ ठरत आहे.

या दृष्टीनें श्री शिवाजीमहाराजांचें चरित्र अतिशय उद्बोधक आहे. समाजवादाच्या मूलभूत मूल्यांचीहि त्यांनीं कदर केली आणि ज्या वर्गाकडून संस्कृतीचें व धर्माचें रक्षण व्हावयाचें तो वर्गहि संपन्न बनविला व

संतुष्ट ठेवला. त्यांनीं जमीनदारांचें उच्चाटन केलें. सर्व हिंदुस्थानभर जमीनदारीच जारी होती. कारण त्यांत राज्यकर्त्यांची सोय होती. जमीनदारांकडून नक्त रक्कम घ्यावयाची व रयतांना पिळण्याचें जमीनदारांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें—हें धोरण राज्यकर्त्यांना कमी त्रासदायक वाटे. पण शिवाजीमहाराजांनीं आपल्या राज्यांत वेगळी प्रथा निर्माण केली. कष्टकरी लोकांवर जुलूमजबरदस्ती होऊं नये म्हणून त्यांनीं जमीनदारांना बाजूला सारलें व रयतांशीं शासनसंस्थेचा प्रत्यक्ष संबंध जोडला.

आपल्या सैनिकांनाहि त्यांनीं जे धारे ( निर्बंध ) घालून दिले होते ते असेच शेतकऱ्यांची व रयतांची कदर बाळगणारे होतें. सैनिकांना त्यांची सक्त ताकीद असे कीं, "दाणागोटा वगैरेंची व्यवस्था आम्हीं पुरेशी केली आहे. मात्र तो जपून वापरीत जा. नाहींतर आहे तोंपर्यंत उधळेगिरी कराल आणि मग तुटवडा पडला म्हणजे घोडीं उपाशी माराल किंवा शेतकऱ्यांना छळाल. मग कोणी कुणब्यांकडे जातील, कोणी दाणे, कोणी भाकर, कोणी गवत, कोणी फाटे, कोणी पाते असें करूं लागतील; तर, जे कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. कित्येक उपाशी मरूं लागतील. म्हणजे त्यांना असें होईल कीं, मोंगलांपेक्षां हेच लोक अधिक वाईट ! असा तळतळाट होईल."

शत्रूच्या मुलखांतील शहरें लुटण्याची पद्धत बरी कीं वाईट हा वाद अप्रस्तुत आहे. कारण त्या काळीं, युद्ध चालू असतांना, शत्रूच्या मुलखांत लुटालूट करणें हें रास्त समजलें जाई. औरंगजेबाच्या शाहिस्तेखानानें पुण्यांतला शिवाजीचा वाडा बळकावला व त्याच्या प्रदेशांत धुमाकूळ घातला म्हणून शिवाजीनें मोंगलांचें सुरत शहर लुटलें व मक्केला जाणारीं यात्रेकरूंचीं जहाजें लुटलीं. पण हें करतांनासुद्धा शिवाजीनें माणुसकीच्या मर्यादा संभाळल्या मुसलमानी अंमलदार नुसती लुटालूट करूनच थांबत नसत; जाळपोळ, स्त्रियांवर बलात्कार, देवळांचा विध्वंस, गायींची कत्तल हें सर्व व्हावयाचें; गरीब लोक व शेतकरी नागवले जावयाचे; त्यांचीं पिकें उध्वस्त करण्यांत यावयाचीं. पण शिवाजी किंवा त्याचे अधिकारी असें कोणतेंहि अपकृत्य करीत नसत. शहराच्या बाहेर तळ ठोकावयाचा व प्रमुख मातबर

लोकांना बोलावून आणून त्यांच्याशीं उक्तीच रक्कम ठरवावयाची. याप्रमाणें नच जमलें आणि धनिक लोकांनीं चुकारपणा केला तर फक्त मातब्बर लोकांकडूनच पैसे उकळावयाचे; आणि हें करतांना गरीब लोक, शेतकरी, स्त्रिया अथवा गायी यांना कसलाहि उपसर्ग पोंचवावयाचा नाहीं अशी शिवाजीची सर्व अधिकाऱ्यांना सक्त ताकीद असे व ती बरोबर पाळली जाई.

याप्रमाणें रयत, कुणबी, शेतकरी इत्यादिकांचें योग्य रक्षण करीत असतांना ब्राह्मण, प्रभु इत्यादि जमातींच्या रूपानें त्या काळीं वावरणारा जो मध्यम वर्ग तोहि शिवाजीनें संतुष्ट ठेवला होता. कारण लष्कर व सेनापति यांच्याइतकाच हा समाजहि राष्ट्राच्या बांधणीस व मजबुतीस आवश्यक आहे हें त्यानें ओळखलें होतें. आज मध्यमवर्गीयांची व्याप्ति केवळ ब्राह्मण अथवा प्रभु या जातींपुरती मर्यादित राहिलेली नाहीं. मराठा वगैरे जमातींतसुद्धां शिक्षक, छोटे व्यापारी इत्यादिकांच्या रूपानें मध्यम-वर्गीयांचा फार मोठा भरणा झाला आहे. राष्ट्राचा, राष्ट्राच्या संस्कृतीचा व समाजाच्या स्थैर्याचा खरा आधारस्तंभ असलेला जो हा वर्ग त्याची कॉंग्रेसहि उपेक्षा करीत आहे आणि कम्युनिस्टादि समाजवादी गटहि यांना कांहीं खास दिलासा देण्याच्या मानसिक अवस्थेंत दिसत नाहींत. ही परिस्थिति बदलली पाहिजे. या दृष्टीनें श्री शिवाजीमहाराजांच्या चरित्रापासून अवश्य तो बोध घेतला पाहिजे.

याच अनुषंगानें आणखी एक विचार मार्क्सवादी मंडळींनीं ध्यानांत घ्यावा. कामगार, किसान इत्यादिकांची संख्या मोठी असल्यानें त्यांची संघटना करणें सोपें जातें व मतांच्या दृष्टीनेंहि त्यांचा जमाव भरगच्च वाटतो. पण एवढ्यानें निवडणुकी जिंकल्या जात नाहींत हें समाजवाद्यांनीं ध्यानांत ठेवावें. शेतकऱ्यांचा व कामगारांचा कितीहि पाठिंबा असला आणि मध्यम-वर्ग (**ज्यांत ब्राह्मण, मराठा, प्रभु इत्यादि सर्व जातींचा समावेश होतो**) जर नाराज असला तर निवडणुकी जिंकणें कदापि शक्य नाहीं. कारण तुम्ही शेतकऱ्यांची व कामगारांची कितीहि मजबूत घडी बसविली तरी मध्यमवर्गीयांची या लोकांवर फार मोठी छाप असते व त्यांचें नेतृत्व मानणारे पुष्कळ लोक या संघटित वर्गांत असतात. म्हणून, निवडणुकी

जिंकण्याच्या आकुंचित दृष्टीनेंसुद्धां मध्यम वर्गाचें महत्त्व फार आहे. १९५७ च्या निवडणुकी संयुक्त महाराष्ट्र समिति जिंकूं शकली याचें कारण, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नामुळें इतर वर्गाप्रमाणेंच मध्यम वर्गहि पूर्णतया समितीला अनुकूल होता हें होय.

शिवाजीमहाराजांनीं गायींचें रक्षण केलें. त्या बाबतींत त्यांचें अनुकरण करावयाचें म्हणजे गोरक्षणाबरोबर मध्यमवर्गाचेंहि रक्षण राज्यकर्त्यांनीं केलें पाहिजे व समाजवाद्यांनींहि त्यांच्या रक्षणाला आपल्या कार्यक्रमांत प्रमुख स्थान दिलें पाहिजे. कारण ह्या मध्यमवर्गीयांची अवस्था गाईसारखीच–असहाय व अनुकंपनीय–आहे. तो संघटित होऊं शकत नाहीं, तो आक्रमक बनूं शकत नाहीं. त्याची परिस्थिति व त्याची सांस्कृतिक शालीनता या गोष्टीहि आड येतात. निमूटपणें छळ सहन करणें एवढंच त्यांच्या नशिबीं येतें. म्हणून जे कोणी स्वतःला समाजवादी म्हणवतात ते जर खरे मानवतावादी असतील तर त्यांनीं या उपेक्षितांना आपल्या कार्यक्रमांत जागा करून दिली पाहिजे.

शेवटीं एक प्रश्न मनांत येतो. अर्थवाद व व्यवहारवाद यांची महती या काळांत वाढली असली तरी उज्ज्वल, भव्य व अभिमानास्पद स्मृतींनीं नटलेल्या आपल्या हिंदु संस्कृतीचा व परंपरेचा वारसा नाकारणें समंजसपणाचें होईल काय? जगांत दुसऱ्या कोठल्याहि राष्ट्राला न लाभलेला हा लोकोत्तर वारसा आपणांला मिळाला आहे. इजिप्शियन, बाबिलोनियन, असीरियन, ग्रीक, रोमन, पर्शियन इत्यादि संस्कृति कालवश झाल्या. त्यांचा वारसा सांगणारें राष्ट्र आज पृथ्वीतलावर शिल्लक नाहीं. आपण हिंदूच तेवढे, **श्री शिवाजीमहाराजांच्या कृपेनें**, या भाग्याचे मालक राहिलों आहोंत. हा एवढा बहुमूल्य व अभिमानास्पद वारसा आपण कां टाकून द्यावा? आतांचे राज्यकर्ते आपल्या राष्ट्राला निधर्मी राष्ट्र असें म्हणतात. पण यायोगें नव्या पिढीची —– म्हणजे राष्ट्राच्या भवितव्याची —– आपण किती हानि करीत आहोंत याची त्यांना कांहीं कल्पना आहे काय? स्वातंत्र्याच्या पूर्वीं जी राष्ट्रभक्तीची विशुद्ध, धर्मसदृश भावना होती ती जवळजवळ लुप्त झाली; तो ध्येयवाद निकालांत निघाला; आणि त्याची जागा घेणारें दुसरें

कांहींच आपण निर्माण करूं शकलों नाहीं. ' निधर्मी ' बनलेलें आमचें सरकार विद्यार्थ्यांना भगवद्गीतेंतील बोधवचनांचे पाठसुद्धां देऊं शकत नाहीं. तरुण पिढीच्या जीवितांत निर्माण झालेली ही पोकळी अनेक अनुचित—किंबहुना घृणास्पद—उद्रेकांच्या रूपानें विद्यार्थिवर्गांत प्रतीत होऊं लागली आहे. ' निधर्मी ' पणाचें खूळ बाजूस सारणारे व राजकारणाला आपल्या सहिष्णु व सर्वसंग्राहक अशा हिंदुधर्माची जोड देणारे दुसरे राज्यकर्ते पुढें आले नाहींत तर हा भयंकर रोग वाढत जाईल व राष्ट्राचा ग्रास करील. कॉंग्रेसला प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून वावरणाऱ्या कम्युनिस्टांनीं व तत्समांनीं याचा गंभीरपणें विचार करावा व आतांपासून हिंदुत्वाची दीक्षा हळूहळू घेऊं लागावें. त्यावांचून त्यांना समग्र जनतेचा विश्वास संपादन करतां येणार नाहीं, आणि खऱ्याखुऱ्या अर्थानें राष्ट्राची मजबुतीहि वाढवितां येणार नाहीं.

जे कोणी अगदीं मुरलेले नास्तिक व धर्माला अफूची गोळी समजणारे असतील अशांनींसुद्धां हिंदुधर्मांतील ' धर्म ' या शब्दाला बुजण्याचें कारण नाहीं. कम्युनिस्टादिकांचें धर्मकल्पनेशीं भांडण आहे तें यासाठीं कीं, मामूल धर्मभावना मनुष्याला दैववादी बनविते; होईल तो अन्याय नशिबांतला एक भाग म्हणून निमूटपणें सोसण्यास प्रवृत्त करते; श्रीमंतांना श्रीमंती लाभली ती त्यांच्या नशिबानें लाभली व आपलें दारिद्र्य आपणांस नशिबानेंच दिलें म्हणून तें मुकाट्यानें सोसलें पाहिजे, अशी वृत्ति ही धर्मभावना श्रमजीवी जनतेंत निर्माण करते. म्हणून समाजवादी लोक धर्मकल्पनेचा द्वेष करतात. परंतु हिंदुधर्माला अभिप्रेत असलेला धर्म असा आकुंचित नाहीं; प्रयत्नवादाला हलकें स्थान देणारा नाहीं; पुरुषार्थाला गौण ठरविणारा नाहीं. हिंदुधर्मांतील धर्म या शब्दांत फार मोठा अर्थ भरलेला आहे. " यत : अभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः " अशी हिंदुधर्माची व्याख्या आहे. ज्यायोगें समाजाची उन्नति होईल, समाजाचा अभ्युदय होईल, समाजाला स्थैर्य लाभेल, समाजाच्या सर्व घटकांचें बरें होईल तो धर्म. समाजाच्या सर्व घटकांना आपापल्या कर्तव्याची जाणीव करून देणारा व कर्तव्यपालनास प्रवृत्त करणारा असा हिंदु धर्म आहे. ' हा माझा धर्म नाहीं ' या उक्तींत धर्म या शब्दाचा ' कर्तव्य ' हा जो अर्थ आहे तो यासंबंधांत ध्यानांत घेण्याजोगा आहे. श्री शिवाजीमहाराजांची शासनपद्धति जर रयतेची, गोर-

गरिबांची व मध्यमवर्गीयांची कदर करणारी होती आणि ती जर हिंदु-धर्मावर आधारलेली होती, तर कोणीं तरी हिंदुधर्मातल्या धर्म या शब्दाला कां बुजावें ?

मार्क्सवाद्यांनींसुद्धां हा विचार ध्यानांत घ्यावा व आपल्या समाजवादाला हिंदुधर्माच्या व हिंदु संस्कृतीच्या अभिमानाची जोड द्यावी. त्याशिवाय त्यांचा लोकसंग्रह पुरा होणार नाहीं व फलदायीहि ठरणार नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांनीं शासनसंस्थेची व धर्माची फारकत केलेली नाहीं. ब्रिटन-मध्यें प्रॉटेस्टंट जातीचा खिस्ती धर्म हा शासनसंस्थेनें मान्यता दिलेला धर्म आहे. हजारों धर्मोपदेशकांचा व धर्मगुरूंचा खर्च ब्रिटिश सरकार सोसतें व जनतेची धर्माची गरज पुरी करतें. तिकडे खिस्ती धर्माची परंपरा प्रथम-पासून कायम राहिली व काळ जसा बदलत चालला तशी धर्मगुरूंचीं प्रवचनेंहि प्रागतिक बनत चाललीं. आपल्याकडे मुसलमानांच्या आक्रमणामुळें हिंदुराज्यें नष्ट झालीं व मुसलमानी शासनसंस्था हिंदुत्वाला मारक असल्यामुळें हजारों वर्षेंपर्यंत धर्म व राजकारण यांची फारकत कायम राहिली. इंग्रजांच्या आमदानींत तेंच चालू राहिलें. त्यामुळें आपलीं धर्मपीठें तशींच जुन्या-पुराण्या अवस्थेंत राहिलीं व सुशिक्षित वर्गाच्या कल्पना फार वेगळें स्वरूप धारण करून बसल्या. पण म्हणून धर्माची गरज कमी झालेली नाहीं. आज असा समय आला आहे कीं, राज्यकर्ते मनांत आणतील तर सर्व समाजाला सामान्यतः मान्य होईल असा हिंदुधर्माचा एखादा ग्रंथ ते बनवूं शकतील व त्याचें शिक्षण शाळा-कॉलेजांतून मिळण्याची व्यवस्थाहि करूं शकतील. सुदैवानें हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान पुष्कळ मूलग्राही स्वरूपाचें व आधुनिक शास्त्र-संशोधनाशीं पूर्णपणें जुळतें आहे. आपलें अद्वैताचें तत्त्वज्ञान असें सांगतें कीं, विश्व एकरूप असून त्यांतूनच सारी विविधता निर्माण झाली. सायन्सचा सिद्धान्त असाच आहे. आज पृथ्वीवर जी विविधता आपण पाहतों ती मुळांत नव्हती. वस्तु एकरूप होती. तिच्यांतून, अब्ज-अब्जावधि वर्षांच्या उत्क्रान्तींतून, हीं नाना रूपें निर्माण झालीं. आजहि मूळच्या एकजिनसी स्वरूपांत असलेले ( nebulous अवस्थेंतले ) पदार्थ अंतराळांत कित्येक आहेत. म्हणजे शास्त्रसंशोधनानें जें सिद्ध झालें आहे तें सृष्टीच्या उत्पत्तीचें

प्रतिपादन आपल्या अद्वैतवादाशीं पूर्णपणें जुळणारें आहे. अशा तत्त्वज्ञानावर आधारलेला व भगवद्‌गीतेंतल्या शिकवणीनें समृद्ध बनलेला धर्मग्रंथ तयार करणें शक्य आहे. सरकारनेंच हें काम हातीं घेतलें पाहिजे व तडीस नेलें पाहिजे.

निधर्मी राज्याची आपल्या सरकारची कल्पना किती वांझोटी आहे हें थोड्याशा विचाराअंतीं दिसून येईल. ज्याचा सांस्कृतिक इतिहास दहा-बारा शतकांच्या पाठीमागें जाऊं शकत नाहीं तें ब्रिटिश राष्ट्र आपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेच्या प्राचीनतेचा तोरा मिरवितें व त्या सर्वांची सांगड आपल्या शासनसंस्थेशीं घालते. आणि कित्येक सहस्र वर्षांची अप्रतिहत व अखंडित अशी उज्ज्वल परंपरा असलेलें आमचें राष्ट्र काय म्हणतें ? आमच्या राष्ट्राचें सरकार काय म्हणतें ? तें म्हणतें कीं आम्ही निधर्मी आहोंत. असा; निधर्मी असा. पण तुमची परंपरा कोणती ? कोणत्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा वारसा तुम्हीं स्वतःकडे घेतला आहे ? बाराव्या-तेराव्या शतकापासून दिल्लीस कायम झालेल्या व हळूहळू पसरलेल्या मुसलमान आमदानीचा, कीं तिच्या आधींच्या हिंदु संस्कृतीचा व हिंदु धर्माचा ? तुम्ही महंमद घोरीची, अल्लाउद्दीन खिलजीची अथवा औरंगजेबाची निशाणी न घेतां सम्राट् अशोकाची निशाणी ज्या अर्थी स्वीकारली, त्या अर्थीं तुम्ही हिंदूंच्या प्राचीन परंपरेशींच संबंध जोडूं पाहतां हें स्पष्ट होतें. मग हा अर्धवटपणा कां ? आधीं आर्य म्हणून पुढें आलेल्या आणि त्यानंतर बुद्ध, शंकराचार्य इत्यादिकांच्या संस्करणानें हिंदुत्वास पोंचलेल्या भारतीय संस्कृतीचा समग्र वारसा तुम्ही कां उचलीत नाहीं ? निधर्मी राज्य — कसलीहि धार्मिक अथवा सांस्कृतिक परंपरा नसलेलें भुंडें राष्ट्र — असा अभिमान धारण करण्यांत भूषण मानण्याऐवजीं आपल्या हक्काच्या अशा प्राचीन धर्माची व प्राचीन संस्कृतीची जोड आपल्या शासन-संस्थेला कां देत नाहीं ? आणि भारताला हिंदु राज्य अथवा हिंदु राष्ट्र म्हणून कां संबोधीत नाहीं ?

हिंदु धर्माचें तत्त्वज्ञान व हिंदूंची एकंदर परंपरा इतकी सहिष्णु व सर्व-संग्राहक आहे कीं, तिला कम्युनिस्टादि मार्क्सवाद्यांनींसुद्धां बुजण्याचें कारण नाहीं याचें विवेचन वरती आलेंच आहे. देशांत मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि

अन्य धर्मांचे लोक आहेत म्हणूनही संकोच बाळगण्याचें कारण नाहीं. ब्रिटनमध्यें ख्रिश्चनांशिवाय इतर धर्मांचे लोक नाहींत काय? ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यावाचून ब्रिटनचें नागरिकत्व मिळूं शकत नाहीं काय? या मूठभर अन्यधर्मीयांना भिऊन ब्रिटिश राजवटीनें आपलें धार्मिक अधिष्ठान टाकून दिलें आहे काय? या गोष्टीचा विचार कॉंग्रेस पक्षाच्या धुरीणांनीं व राज्यकर्त्यांनीं करावयास पाहिजे; आणि त्यांनीं तो केला नाहीं तर जे मार्क्सवादी पक्ष व गट शासनसंस्था हस्तगत करण्याची उमेद बाळगतात त्यांनीं करावयास पाहिजे.

मनुष्याची पहिली गरज पोटभर अन्न, अंगभर वस्त्र व पुरेसा निवारा ही आहे यांत वाद नाहीं. जनतेच्या या मूलभूत गरजा कशा भागवावयाच्या याचा विचार न करतां व त्यास आवश्यक असलेलें पुरोगामी तत्त्वज्ञान आत्मसात् न करतां, जे लोक केवळ धर्माच्या व संस्कृतीच्या बैठकीवर राजकारणाची उभारणी करूं पाहतात ते अपयशालाच पाचारण करतात हें मान्य आहे. पण त्याबरोबरच जे मार्क्सवादी पक्ष व गट, भौतिक गरजांचा पूर्ण विचार करतात पण त्यापलीकडे जाण्याचें नाकारतात तेहि पूर्ण यशाचा पल्ला गाठूं शकणार नाहींत. अन्नवस्त्रादिकांच्या गरजा भागल्यानें मनुष्यें जिवंत राहतील, पण त्यांचें एकजिनसी राष्ट्र बनणार नाहीं. त्याला धर्माचीं व सांस्कृतिक परंपरेचीं बंधनें पाहिजेत. सुदैवानें आपलीं धर्मतत्त्वें व आपल्या धर्मकल्पना इतक्या उदार व सर्वसंग्राहक आहेत कीं त्यांत मार्क्सवाद सुखेनैव बसतो. समाजवादी पक्षोपपक्षांनींहि हें सत्य ध्यानांत घ्यावें व त्या दृष्टीनें आपल्या तत्त्वज्ञानांतील वैगुण्यें नाहींशीं करावीं.

आपल्या मनांत असा एक समज मूळ धरून बसला आहे कीं, “ हिंदु धर्म वाजवीपेक्षां अधिक उदार आहे; आपली हिंदु संस्कृति जरा जास्तीच उच्च आहे; धर्मयुद्धाच्या वगैरे आत्यंतिक चांगुलपणाच्या कल्पना आपल्या हिंदुधर्मानें हिंदूंच्या मनांत रुजविल्या म्हणून आपले हिंदु पूर्वज मुसलमानी आक्रमणाला बळी पडले; आक्रमक व लढाऊ वृत्तीच्या इस्लामी धर्मापुढें आपला धर्म व आपली संस्कृति कच्ची पडली.”

हा समज साफ चुकीचा आहे हें श्री शिवाजीमहाराजांच्या चरित्रानें व कर्तृत्वानेंच सिद्ध केलें आहे. मोंगलांची इस्लामी संस्कृति व विजापूरची

इस्लामी संस्कृति या दोन्ही इस्लामी संस्कृतींविरुद्ध व तिजवर उभारलेल्या बलाढ्य शासनसंस्थांविरुद्ध शिवाजीमहाराजांनीं हिंदुधर्माश्रित सामर्थ्यें उभीं केलीं व दोहोंचाहि पराभव करून हिंदुपदपातशाही स्थापिली. हिंदुधर्म व हिंदु संस्कृति ही कोणत्याहि अर्थानें व कोणत्याहि बाबतींत कमी नाहींत, उलट इस्लामी संस्कृतीहून श्रेष्ठ आहेत हें शिवाजीनें जगाला दाखवून दिलें. आपल्या हिंदु पूर्वजांचा मुसलमान आक्रमकांनीं पराभव केला हा दोष आपल्या धर्माचा अथवा संस्कृतीचा नसून आपल्या त्या काळच्या राजेरजवाड्यांचा आहे. ऐषआरामी जीवन, आपापसांत दुही, फितुरी, या गोष्टी हिंदुधर्मानें सांगितल्या आहेत काय? उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत वगैरे हिंदु राजांचें सामर्थ्य एवढें मोठें होतें कीं, त्यांनीं जर एकजुटीनें व एका नेतृत्वाखालीं मुसलमानी आक्रमणाला तोंड दिलें असतें तर घोरीचें अथवा दुसरें कोणतेंच मुसलमान घराणें दिल्लीच्या सिंहासनावर बसूं शकलें नसतें. हिंदुधर्माच्या शिकवणींतच कांहीं वैगुण्य असतें तर त्याच धर्माचा अभिमान स्वकीयांमध्यें जागृत करून शिवाजीमहाराज एवढ्या बलाढ्य इस्लामी सत्तेचा पराभव कसा करूं शकले असते व त्यांच्यानंतर थोरले बाजीराव पेशवे व शिंदे-होळकरादि सरदार यांनीं उत्तर हिंदुस्थानांतली मोंगल सत्ता निर्माल्यवत् कशी करून टाकली असती?

बरें; हिंदु धर्माचेंच वैगुण्य या आपत्तीस कारणीभूत झालें असें म्हणावें तरी खिस्ती धर्माचीं राष्ट्रें इस्लामी आक्रमणापुढें कां पराभूत झालीं? युरोपमधील केवढा मोठा भाग किती तरी वर्षें मुसलमानांच्या ताब्यांत होता!

सारांश, आपल्या अवनतीच्रीं कारणें आपल्या धर्मतत्त्वांमध्यें अथवा सांस्कृतिक परंपरेमध्यें न शोधतां त्या तत्त्वांपासून व परंपरेपासून च्युत झाल्यामुळें आपणांमध्यें जे अनेक दोष [शिरले त्यांत शोधलीं पाहिजेत. आपल्या धर्मांत सांगितलेलीं उज्ज्वल तत्त्वें ज्या प्रमाणांत आपण आचरणांत आणूं त्या प्रमाणांत आपला उत्कर्ष ठेवलेला आहे.

# प्रकरण चौथें

## श्री शिवाजीमहाराजांच्या अंगच्या विविध गुणांचें दर्शन

मोठाल्या कर्तृत्ववान् पुरुषांच्या व थोर व्यक्तींच्या अंगीं जे गुण एकटे-दुकटे सापडतात ते सर्वच्या सर्व श्री शिवाजीमहाराजांच्या ठिकाणीं इतक्या प्रकर्षानें एकत्रित झालेले होते कीं, त्या महापुरुषाच्या बहुविध थोरवीचें व अफाट विभूतिमत्त्वाचें आकलनच सहजासहजीं होऊं शकत नाहीं. शिवाजीची ध्येयनिष्ठा केवढी श्रेष्ठ दर्जाची होती हें आपण पाहिलेंच. हिंदुधर्माच्या उदार व सर्वसंग्राहक तत्त्वांवर आधारलेलें व हिंदूंबरोबर बिगरहिंदूंनाहि योग्य संरक्षण देणारें व न्याय देणारें राज्य स्थापणें हें शिवाजीचें उद्दिष्ट होतें व त्यासाठीं तो अव्याहत झगडला. पण त्याचें हें ध्येयवादित्व अतिरेकी स्वरूपाचें व कार्याची हानि करणारें नव्हतें. तो शूर, निर्भय व धारिष्टवान् होता; पण भलत्या संकटांत उडी घेऊन आत्मनाश करून घेण्याचा माथेफिरूपणा त्यानें कधीं केला नाहीं. जरूर तेथें तो संकटाला तोंड देई. अफझुलखान, शाहिस्तेखान इत्यादिकांच्या बाबतींत त्यानें धोका पतकरून यश मिळविलें; पण जेव्हां संकट दुर्धर दिसलें तेव्हां नरमाई व कमीपणाहि पतकरला. उदाहरणार्थ, जोंपर्यंत त्याचें सामर्थ्य अपुरें होतें तोंवर त्यानें विजापूर दरबारशीं नरमाईचेंच धोरण ठेवलें. मिर्झा राजा जयसिंह

आणि दिल्लीरखान यांचें प्रचंड लष्करी सामर्थ्य व विशेषतः जयसिंहाचें दांडगें युद्धकौशल्य जेव्हां त्याच्यासमोर उभें ठाकलें ( १६६५ ) तेव्हां त्यानें कमीपणा पतकरला; अर्धेअधिक किल्ले बादशहाच्या हवालीं केले व औरंगजेबाच्या सैन्यांत तो स्वतः दाखल झाला ! पुढें आग्र्याच्या कैदेंतून सुटून आल्यावर व कांहीं काळ पूर्वतयारींत घालविल्यावर त्याला जेव्हां दिसून आलें कीं, जयसिंहाच्या जागेवर आलेले मोंगल बादशहाचे प्रतिनिधि नालायक आहेत व त्यांच्या त्यांच्यांत वितुष्ट माजलें आहे तेव्हां त्यानें पुनः चढाईचें धोरण स्वीकारलें, गेलेले सर्व किल्ले परत घेतले व आपलें वर्चस्व पूर्वींपेक्षाहि अधिक तेजानें प्रस्थापित केलें ( १६७३ ). अव्यवहारी ध्येय-निष्ठेनें व एकांतिक दुराग्रहानें कांहीं साधलें नसतें.

शिवाजीची मुत्सद्देगिरी, त्याचा संयम, त्याची सावधगिरी, त्याचें योजनाचातुर्य इत्यादि गुण, तो केवळ बत्तीस वर्षें वयाचा असतांना, अफ-झुलखानाच्या स्वारीच्या वेळीं प्रकर्षानें दिसून आले. युद्धास—व विशेषतः चढाईच्या युद्धास—अत्यंत गैरसोयीचा असा प्रदेश निवडून तेथेंहि दुर्गम डोंगरी किल्ल्यावर—प्रतापगडावर—जाऊन शिवाजी राहिला होता. त्यास जिवंत अथवा मेलेला पकडून आणण्याचा जाहीर निश्चय करून निघालेल्या अफझुलखानाला कांहीं तरी पराक्रम करून दाखविणें प्राप्त होतें. शिवाजीला खालीं मैदानांत आणण्यासाठीं खानानें नाना युक्त्या योजिल्या. हिंदूंचीं देवळें भ्रष्ट केलीं; पंढरपूरच्या व तुळजापूरच्या अति पवित्र गणल्या जाणाऱ्या दैवतांची विटंबना केली; गायींची कत्तल करून त्यांचें रक्त मूर्तीं-वर शिंपडलें. जेणेंकरून शिवाजीचा संताप अनावर होईल व चाल करून येण्यास तो उद्युक्त होईल अशा सर्व प्रक्षोभक गोष्टी खानानें करून पाहिल्या. पण शिवाजीनें, अंतिम ध्येयावर नजर ठेवून, आपलें मन आवरलें. प्रताप-गड सोडून तो खालीं आलाच नाहीं. नंतर अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून व नानाप्रकारचीं बोलणीं करून अफझुलखानाला व त्याच्या फौजेला अशा अडचणीच्या जागेंत त्यानें आणलें कीं, त्यांतून त्याची व त्याच्या फौजेची सहीसलामत सुटका होणें शक्यच नव्हतें.

नेपोलियन बोनापार्टच्या अंगीं, अत्यंत वेगानें आपलीं सैन्यें नेण्याचा जो गुण होता तो शिवाजीच्या अंगीं भरपूर प्रमाणांत होता. यायोगें तो

शत्रूला अचानक गाठून त्याला स्तिमित करून सोडी. अफझुलखानाचा निःपात केल्यावर शिवाजी स्वस्थ बसला नाहीं. त्या विजयाचा पूर्ण फायदा उठविण्यासाठीं तो फौज घेऊन निघाला. मोठ्या युक्तीनें विजापूरकरांचा पन्हाळा किल्ला त्यानें हस्तगत केला. पावनगड व वसंतगड हेहि किल्ले त्यानें घेतले; आणि कृष्णाकाठच्या प्रदेशांतून खंडणी वसूल करून रांगणा व खेळणा ( विशाळगड ) हे किल्ले मोठ्या शर्थीनें लढून त्यानें घेतले; त्याच्यावर चालून आलेले विजापूरचे सरदार रुस्तुमिजमान व फाजलखान यांना पिटाळून लावले; आणि पुढें खंडण्या वसूल करीत थेट विजापुरापर्यंत चालून गेला. पण तेथून इतक्या वेगानें तो परत फिरला कीं कोणाच्यानेंहि त्याचा पाठलाग करवला नाहीं.

कल्पकता, प्रसंगावधान इत्यादि बाबतींत इतिहासांत वर्णिला गेलेला कोणीहि थोर पुरुष शिवाजीची बरोबरी करूं शकणार नाहीं. अफझुलखानाचा निःपात, शाहिस्तेखानाच्या वाड्यांत रात्रीं घुसून त्याची उडविलेली दाणादाण, आग्र्याच्या कैदखान्यांतून स्वतःची व नऊ वर्षांच्या संभाजीची त्यानें करून घेतलेली सुटका—हे प्रसंग अद्‌भुत आहेत; शिवाजीच्या अचाट युक्तिबाजपणाची साक्ष देणारे आहेत.

सुरतेवर १६६४ च्या जानेवारींत त्यानें केलेली स्वारी कोणाहि थोर योद्ध्याच्या व चतुर सेनापतीच्या लौकिकांत भर घालणारी होती. शिवाजीच्या या उपक्रमाची थोडीशी जरी आगाऊ कल्पना मोंगलांना आली असती तरी त्यांनीं त्याचा हा धाडसी प्रयत्न यशस्वी होऊं दिला नसता. परंतु पोर्तुगीज व शिद्दी यांच्या पाडावाचें मिष करून दंडाराजपुरीजवळ एक व कल्याणजवळ दुसरी अशा फौजा त्यानें जमविल्या; आणि नंतर कसल्या तरी निकडीच्या कामाचें निमित्त जाहीर करून तो नाशकास आला व तेथेंच आपला मुक्काम राहणार आहे असें त्यानें सर्वांना भासविलें. आणि तेथून चार हजार निवडक घोडेस्वारांसह अगदीं आकस्मिकपणें तो सुरत शहराजवळ येऊन थडकला. प्राचीन काळापासून संपत्तीचें माहेरघर म्हणून समजलें जाणारें हें मोंगलांचें शहर, मोंगली फौजेस त्याची गंधवार्ता लागण्याच्या आंत, पांच दिवसपर्यंत सावकाशपणें लुटून शिवाजी परत रायगडास येऊन

चरित्र
अनुक्रम २५१९९ वि: चरित्र ७७
क्रमांक ८८ नों: दि: १५/८/९९

पोंचला. १० जानेवारीस त्यानें सुरत सोडली, आणि मोंगली फौज १७ जानेवारीला शहराच्या संरक्षणार्थ येऊन पोंचली !

खऱ्या थोर पुरुषाच्या थोरवीचें मुख्य लक्षण हें असतें कीं, त्याच्यासारखीं अनेक माणसें त्याच्या हाताखालीं तयार होतात. ब्राह्मण, मराठे, प्रभु इत्यादि मिळून निदान शंभर तरी श्रेष्ठ प्रतीचे लोक शिवाजीच्या कारकीर्दींत तयार झाले. त्यांत कुशल सेनापति होते, परराज्यांत जाऊन माहिती आणणारे हेर होते, राजदरबारीं राहून राजकारण करणारे चतुर वकील होते, जबरदस्त किल्लेदार होते, समुद्रावर युद्ध करण्यांत पटाईत असे आरमारी सेनानायक होते, मोठाल्या मसलती तडीस नेणारे योद्धे होते, फडणीस होते, न्यायाधीश होते, धर्माधिकारी होते.

शिवाजीमहाराजांचें बहुविध कर्तृत्व व त्यांनीं तडीस नेलेल्या अनेक गोष्टी पाहिल्या म्हणजे एवढ्या अल्पकाळांत एवढाले उद्योग या पुरुषानें हातीं कसे घेतले असतील आणि तडीस कसे नेले असतील या विचारानें मन थक्क होऊन जातें. आणि तरी शिवाजीच्या आयुष्याचा बहुतेक काळ शत्रूंशीं लढण्यांत, शत्रूंचे हल्ले चुकविण्यांत व शत्रूनें केलेली आपल्या प्रदेशाची नासधूस भरून काढण्यांत गेला. पण हें सर्व करीत असतां व आपल्या राज्याच्या सीमा वाढवीत असतां त्याने अनेक किल्ले बांधले; मोठें आरमार तयार केलें; बंदरें बांधलीं; मोंगलांच्या राज्यांतून व विजापूरच्या राज्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळविण्यासाठीं वर्षानुवर्षें झगडा केला; स्वतःस राज्याभिषेक करवून घेऊन इतर राजांशीं बरोबरीनें बोलणीं करण्याचा दर्जा स्वतःला प्राप्त करून घेतला; त्यानंतर दाक्षिणादिग्विजय केला व त्या निमित्तानें आपला सावत्र भाऊ व्यंकोजी याला विजापूरच्या ताबेदारींतून मुक्त करून त्याच्या तंजावरच्या राज्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळवून दिला; आपल्या राज्यांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली; जमिनदारीचें उच्चाटन करून रयतवारी जारी केली; न्यायदानाची उत्कृष्ट पद्धति घालून दिली; अष्टप्रधानांची संस्थापना करून राज्याला स्थैर्य व राज्यकारभाराला व्यवस्थितपणा आणला; किल्ल्यांचा कारभार योग्य प्रकारें चालावा म्हणून नियम करून दिले; हिंदूंना आपल्या

राज्यांत व कांहीं अंशीं बाहेरहि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली; राज्यशासनाचे सर्व व्यवहार मराठींत चालावेत म्हणून राज्यव्यवहारकोश तयार करविला; तोफा तयार करण्याचा कारखाना काढला; तुकाराम, रामदास, बाबा याकुत, मौनीबाबा इत्यादि अनेक साधुपुरुषांशीं परिचय केला व त्यांचा आशिर्वाद मिळविला.

शिवाजीला कोणतेंहि व्यसन तर नव्हतेंच, पण परस्त्रियांच्या बाबतींत त्याचें वागणें अत्यंत निरपवाद व श्रेष्ठ दर्जाचें होतें. मुसलमान इतिहासकार खाफीखान — जो शिवाजीबद्दल लिहितांना अपशब्दावांचून एक ओळ जाऊं देत नाहीं तोसुद्धां — प्रांजळपणें अशी कबुली देतो कीं, "त्याच्या हातून कोणतेंहि नीच कृत्य घडलें नाहीं; त्याच्या हातांत पडलेल्या मुसलमान जातीच्या स्त्रियांच्या अब्रूस त्यानें कधींहि धक्का लागूं दिला नाहीं. या बाबतींत त्याचे हुकूम अतिशय सक्त होते."

# प्रकरण पांचवें

## श्री शिवाजीमहाराजांची जगांतील इतर थोर पुरुषांशीं तुलना

जगाच्या इतिहासांत होऊन गेलेल्या कोणत्याहि थोर पुरुषाशीं श्री शिवाजीमहाराजांची तुलना करूं गेलें तर एकंदरीनें श्री शिवाजीमहाराजच श्रेष्ठ ठरतात. कांहीं बाबतींत कांहीं पुरुष शिवाजीहून वरचढ ठरतील; पण सर्व बाबींचा विचार केला असतां शिवाजीच्या पातळीपर्यंत कोणीच पोंचूं शकत नाहीं. रोमच्या प्राचीन इतिहासांत प्रसिद्धि पावलेला कार्थेजियन योद्धा हॅनिबाल हा सेनापति म्हणून अत्यंत कुशल, शूर व हिकमतबाज होता. इटलीवर त्यानें स्वारी केली व त्या परमुलुखांत, एवढ्या बलाढ्य रोमन सत्तेशीं झगडा देत तो सतरा वर्षें राहिला. पण इतर बाबतींत त्याच्याजवळ शिवाजीशीं तुलना करण्याजोगें कांहीं नाहीं. आधुनिक काळांतला नेपोलियन बोनापार्ट महापराक्रमी व सेनापति म्हणूनहि लोकोत्तर होऊन गेला. पण शिवाजीला जसें शून्यांतून स्वराज्य निर्माण करावें लागलें तसें नेपोलियनचें नव्हतें. त्याच्या पाठीशीं फ्रेंच क्रान्तीचें प्रचंड सामर्थ्य होतें; फ्रेंच राष्ट्र त्याच्या मागें उभें होतें. नेपोलियननें फाजील महत्त्वाकांक्षेच्या आहारीं जाऊन रशियावर स्वारी करण्याची फार मोठी चूक केली व त्यामुळें त्याचा नाश ओढवला. शिवाजीला अवास्तव व अमर्याद महत्त्वाकांक्षा

नव्हती. त्याच्या हातून असा कोणताहि प्रमाद घडला नाहीं. प्रत्येक पाऊल त्यानें विचारपूर्वक व जपून टाकलें. त्यामुळें एकदां केलेलें काम बिघडण्याचा व तें पुन्हा करावें लागण्याचा प्रसंग त्याच्यावर कधीं आला नाहीं.

प्राचीन रोमच्या इतिहासांतील ज्यूलियस सीझर व अमेरिकन स्वातंत्र्याचा जनक जॉर्ज वॉशिंग्टन हे कांहीं बाबतींत शिवाजीशीं साम्य धारण करतात. दोघेहि पराक्रमी होते; दोघेहि कुशल सेनापति होते; त्यांच्या ठिकाणीं अनिवार महत्त्वाकांक्षा नव्हती; दोघांनींहि आपापल्या देशांची विधायक बांधणी चांगल्या प्रकारें केली; पण ज्यूलियस सीझर उदयाला आला तेव्हां रोमचें साम्राज्य अस्तित्वांत होतें; हिकमतबाजपणा, मुत्सद्दीपणा व पराक्रम यांच्या बळावर त्या साम्राज्याचें नेतृत्व त्यानें मिळविलें इतकेंच. तसेंच, जॉर्ज वॉशिंग्टनच्या पाठीशीं अमेरिकन वसाहतींचें एकवटलेलें बळ होतें; आणि ऐन वेळीं फ्रान्सची कुमक त्याला मिळाली म्हणून तो इंग्लंडचा पराभव करूं शकला व अमेरिकन वसाहतींना दास्यमुक्त करूं शकला. पण शिवाजीजवळ प्रारंभीं कांहींच नव्हतें. मराठी जनताहि त्याच्या पाठीशीं नव्हती. लोकांचीं मनें तयार करण्यापासून, त्यांची लाचारी घालविण्यापासून व त्यांच्यांत स्वधर्माचा व स्वराज्याचा अभिमान उत्पन्न करण्यापासून प्रत्येक गोष्ट त्याला करावी लागली. मोरे, निंबाळकर, घोरपडे, मोहिते इत्यादि स्वराज्य-विरोधकांची वासलात त्याला लावावी लागली. सैन्याची सिद्धता प्रारंभापासून करावी लागली. शस्त्रें नाहींत, घोडे नाहींत, पैसा नाहीं, —ही सर्व अवस्था त्याला बदलावी लागली. त्याचा बाप शहाजी एवढा शूर, पराक्रमी व समर्थ; पण त्याचें कसलेंहि साह्य, आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां, शिवाजीला झालें नाहीं. हें सर्व ध्यानांत घेतलें म्हणजे सीझर व वॉशिंग्टन यांच्यापेक्षां शिवाजी किती तरी वरचढ ठरतो.

रशियाचा बादशहा पीटर दि ग्रेट एकंदरीनें लोकोत्तर पुरुष होऊन गेला. आपलें राज्य प्रबळ व आपले लोक सुविद्य व्हावे म्हणून त्यानें फार परिश्रम घेतले. जहाजें बांधण्याची कला आपल्या लोकांना अवगत व्हावी यासाठीं तो अज्ञात अवस्थेंत स्वतः हॉलंडमध्यें राहिला व साध्या सुतार-कामापासून वरती जात जात जहाजें बांधण्याचें कसब त्यानें हस्तगत केलें.

त्याच्या राज्यांतील उमराव, कसलेंहि लष्करी शिक्षण न घेतां, केवळ बडे बापके बेटे म्हणून एकदम सेनापति होत व युद्धांत पराभव पावत. ही प्रथा मोडण्यासाठीं पीटर स्वतः सैनिक म्हणून सैन्यांत दाखल झाला व लायकी संपादन करीत करीत वरती चढत गेला. याप्रमाणें स्वतः उदाहरण घालून देऊन त्यानें उमरावांना ताळ्यावर आणलें. एवढाल्या गोष्टी पीटरनें केल्या खऱ्या, पण त्याच्याजवळ साधनें विपुल होतीं. एका मोठ्या राज्याचा तो अधिपति होता. शिवाजीला सर्वच सामग्री प्रथमपासून बनवावयाची होती.

लोकसंग्रह, न्यायप्रियता, दयाळूपणा, दुसऱ्याचें कांहीं अन्यायानें बळकावण्याच्या इच्छेपासून अलिप्तता, आपल्या मुस्लिम प्रजेलाहि न्यायानें वागविण्याची बुद्धि इत्यादि गुणांच्या साह्यानें शिवाजीनें हिंदूंचें राज्य स्थापलें व तें टिकविलें. आणि औरंगजेबाजवळ एवढें मोठें साम्राज्य असतांना, असहिष्णुता, हिंदुधर्माचा व हिंदूंचा द्वेष, संशयी वृत्ति, क्रूरपणा, कपट, दगलबाजी इत्यादि दुर्गुणांमुळें त्याचें राज्य आंतून पोखरलें गेलें व त्याच्या पश्चात् मोडकळीस आलेल्या अवस्थेंतच राहिलें. औरंगजेबहि साध्या राहणीचा, कष्टाळू, पराक्रमी, उद्यमशील व प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करणारा होता, पण हिंदुद्वेषामुळें त्याला अंतीं अपयश आलें.

शिवाजी हा औरंगजेबासारखा साध्या राहणीचा चाहता, कष्टाळू व दीर्घोद्योगी होता; नेपोलियनप्रमाणें कल्पक व हिकमतबाज असून चतुर सेनापति होता; ज्यूलियस सीझरप्रमाणे उदार विचाराचा व सहिष्णु होता; जॉर्ज वॉशिंग्टनप्रमाणें समंजस वृत्तीचा व आपल्या लोकांच्या बऱ्यासाठीं तळमळीनें झटणारा होता; पीटर दि ग्रेटप्रमाणें आपल्या राष्ट्राची सर्वांगीण बांधणी करण्यासाठीं त्यानें कमालीचे कष्ट घेतले. शिवाय तो आपल्या धर्माचा व संस्कृतीचा अभिमानी होता. कसलेंहि साहित्य व साधनें हाताशीं नसतांना त्यानें प्रथम साहित्य तयार केलें व क्रमाक्रमानें जय संपादन करीत शेवटचा पल्ला गांठला. जगांत अत्यंत थोर, उदात्त, समृद्ध व प्राचीन अशी जी हिंदु संस्कृति ती त्यानें वाचविली व अशा रीतीनें जगाच्या इतिहासांत मानाचें स्थान मिळविलें. शिवाजीमहाराज जर झाले नसते तर भारताचे बहुतेक लोक मुसलमान, ख्रिस्ती किंवा आणखी कांहीं तरी झाले असते व

एकंदर हिंदुधर्म व हिंदु संस्कृति, दोन्ही अति निकृष्ट व लाचारीच्या अवस्थेंत, अल्प प्रमाणांत, राहिली असती. हिंदु लोकांत शिवाजीनें स्वाभिमान पेरला; मराठ्यांना आपल्या अंगच्या गुणांचें दर्शन घडविलें; त्याच्या या कर्तृत्वामुळें मराठ्यांनीं पुढें मोठाले पराक्रम करून उत्तर हिंदुस्थानांतून इस्लामी सत्तेचें उच्चाटन केलें. जगाच्या इतिहासांत मराठ्यांना जें स्थान व जी प्रतिष्ठा लाभली ती केवळ शिवाजीमुळें !

विद्यार्थ्यांचें व तरुण पिढीचें शील बनविण्यासाठीं काय करावें असें जर कोणीं विचारलें तर त्याला आमचें असें उत्तर आहे कीं, दुसरे कोणतेहि उपाय योजा, पण शिवाजीच्या चरित्राचा योग्य अभ्यास त्यांच्याकडून करविण्यास चुकूं नका. प्राथमिक शिक्षणक्रमांत, दुय्यम शिक्षणाच्या वेळीं व पुढें कॉलेजांत—अशा तीन प्रसंगीं शिवाजीमहाराजांचें चरित्र प्रत्येकानें अभ्यासावें आणि पुढें, प्रपंचांत कांहीं वर्षें घालविल्यावर पुनः तें अभ्यासावें. कारण बालपणीं शिवाजीच्या कर्तृत्वाची योग्य कल्पना येणें शक्य नाहीं. कॉलेजच्या अवस्थेंतसुद्धां शिवाजीच्या कर्तृत्वाची सर्वांगीण महती विद्यार्थ्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबणार नाहीं. शिवाजीमहाराजांचें चरित्र हें शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकाप्रमाणें आहे. प्रख्यात इंग्लिश मुत्सद्दी ग्लॅडस्टन हा आयुष्यांतल्या वेगवेगळ्या प्रसंगीं हॅम्लेटचें पारायण करीत राहिला. सव्वीसाव्यांदां हॅम्लेट नाटक वाचलें; सत्ताविसाव्यांदां वाचलें—असें तो उतारवयांत आपल्या दैनंदिनींत लिहितो. आणि प्रत्येक वेळीं त्याला नवा प्रकाश दिसला. तसें शिवाजीमहाराजांच्या चरित्राचें आहे. तें जितक्या वेळां व जितक्या सूक्ष्मपणें अभ्यासावें तितकें तें नवा नवा प्रकाश उपलब्ध करून देतें. केवळ मराठा बाणा टिकविण्यासाठीं व हिंदु संस्कृतीचा अभिमान कायम राखण्यासाठीं नव्हे तर,—खासगी व सार्वजनिक शीलाची बांधणी, राजकारणपटुता व मुत्सद्देगिरी, उद्यमशीलता व कर्तृत्व, स्त्रीदाक्षिण्य व शत्रूशींसुद्धां दिलदारपणा, संयम व सावधानता, आपत्कालीं धैर्य व वैभवकालीं शालीनता, निर्भयता व नेमस्तपणा, मानवी मूल्यांची कदर, गोरगरीबांविषयीं आस्था—इत्यादि गुणांची जोपासना करण्यासहि शिवचरित्राचें अध्ययन उपयोगी पडणारें आहे.

# प्रकरण सहावें

## श्री शिवाजीमहाराजांची सांस्कृतिक व नैतिक श्रेष्ठता

श्री शिवाजीमहाराजांचा सांस्कृतिक दर्जा फार श्रेष्ठ प्रतीचा होता. वडील, मातुःश्री, बंधु सर्वांशीं त्यांचें वर्तन वाखाणण्याजोगें व आदर्श म्हणून पुढें ठेवण्याच्या लायकीचें होतें. मातुःश्री जिजाबाई यांच्याबद्दल शिवाजीच्या मनांत गाढ प्रेम व पराकाष्ठेची भक्ति होती. त्यांचा शब्द शिवाजीनें कधीं मोडला नाहीं. त्यांच्या सेवेंत व तैनातींत कधीं कसूर केली नाहीं. शहाजी-विषयीं खास आदरबुद्धि अथवा कृतज्ञता शिवाजीनें बाळगावी असें शहाजीचें त्याच्याशीं वागणें नव्हतें. शिवाजी जन्मल्यावर लौकरच शहाजीनें दुसरें लग्न केलें व त्यानंतर जिजाबाईला त्यानें जवळ जवळ टाकलीच होती. शिवाजीच्या जन्मापासून (१६२७) शहाजीच्या मृत्यूपर्यंत (१६६४) सदतीस वर्षांमध्यें फक्त १६४०–४२ च्या सुमारास कांहीं काळ जिजाबाई शिवाजीसमवेत शहाजीच्या सहवासांत होती. त्यानंतर शिवाजीवर अफझुलखान, शाहिस्तेखान इत्यादि मोठालीं संकटें आलीं; तरी शहाजी त्याच्या मदतीस धावून आला नाहीं, किंवा त्याच्या वतीनें त्यानें आपलें वजन खर्चीं घातलें नाहीं. उलट, विजापूरच्या दरबारांत अफझुलखानाच्या स्वारीची तयारी होण्यापूर्वीं त्यानें दरबारास असें स्पष्ट कळविलें कीं,

"शिवाजी माझ्या ऐकण्यांत नाहीं; दरबारानें त्याचें योग्य वाटेल ते पारिपत्य करावें !" असें असूनहि पुढें १६६२ च्या सुमारास शहाजी जेव्हां आपली पुण्याची जहागीर पाहण्यास इकडे आला तेव्हां शिवाजी त्याच्याशीं अत्यंत नम्रपणानें वागला; शहाजीस तो सामोरा गेला; शहाजीला हत्तीवर पाहतांच स्वतः घोड्यावरून खालीं उतरून त्यानें शहाजीस पालखींत बसविलें व तो कित्येक मैल पालखीपुढें पायीं चालला. शहाजीचा जो काय मानसन्मान ठेवावयाचा तो त्यानें ठेवला.

शिवाजीचा सावत्र बंधु व्यंकोजी याच्याशींहि त्याचें वर्तन असेंच स्पृहणीय होतें. खरें पाहतां व्यंकोजी हाच शहाजीच्या मर्जींतला, आणि शिवाजी उपेक्षिला गेलेला. परंतु राज्याभिषेकानंतर शिवाजीनें दक्षिणेवर स्वारी करून व्यंकोजीजवळ जरी वडिलार्जित जहागिरीचा निम्मा हिस्सा मागितला, तरी शेवटीं त्यानें व्यंकोजीची समजूत काढून त्याला संतुष्ट केलें, व त्याचें राज्य विजापूरच्या ताबेदारींतून मुक्त करून त्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त करून दिला.

शिवाजीचा मोठा मुलगा संभाजी दुराचारी निघाला, शत्रूला जाऊन मिळाला. परंतु शिवाजीनें त्याला ममतेनें वागविलें व पश्चात्ताप पावून मोंगलांच्या छावणींतून तो परतल्यावर त्याची कठोर शब्दांनीं निर्भर्त्सना न करतां सामोपचाराचेंच वर्तन त्याच्याशीं ठेवलें.

शत्रूचा पराभव होऊन तो शरण आला असतां अथवा तो पकडला गेला असतां शिवाजी त्याला सन्मानानें वागवी. अफझुलखानाच्या वधानंतर शिवाजीच्या सैन्यानें खानाच्या सैन्याची वाताहात करून सोडली. त्यांपैकीं कित्येक पकडले गेले. पण शिवाजी त्यांच्याशीं क्रूरपणानें वागला नाहीं अथवा त्यांना त्यानें कैदेंत ठेवलें नाहीं. त्यांपैकीं ज्यांची खुषी होती ते शिवाजीच्या नोकरींत राहिले. बाकीच्यांना त्यानें परत जाऊं दिलें. झुंझारराव हा विजापूरचा प्रतिष्ठित मराठा सरदार ह्या मोहिमेंत अफझुलखानाच्या समवेत शिवाजीशीं लढण्यासाठीं म्हणून आला होता, तोहि पकडला गेला. तो शिवाजीजवळ राहण्यास कबूल झाला नाहीं. परंतु त्याचा विषाद न मानतां शिवाजीनें त्याचा मोठा सन्मान केला व त्याला परत जाऊं दिलें.

अफझुलखानाचा वध शिवाजीनें कपटानें केला असा एक प्रवाद आहे, पण तो चुकीचा आहे. कपटानें अफझुलखानाचा वधच करावयाचा होता तर शिवाजीला स्वतःचा प्राण धोक्यांत घालण्याची मुळींच जरूरी नव्हती. आपलें सैन्य दूर अंतरावर ठेवून केवळ चारदोनच इसम बरोबर घेऊन अफझुलखान शिवाजीच्या भेटीस आला होता. त्याचा खून आपल्या माणसांकडून शिवाजी सहज करवूं शकला असता. पण तो त्याचा उद्देशच नव्हता.

शिवाय, या प्रकरणांत विश्वासघाताचाहि प्रश्न उद्भवत नाहीं. अफझुलखान जर शिवाजीमहाराजांना जिवंत अथवा मृत अवस्थेंत विजापुरास आणण्याचा विडा उचलून निघाला होता आणि परस्परांचे परस्परांशीं दीर्घकाळपर्यंत जर डावपेंच चालले होते, तर कोणीं कोणाचा विश्वासघात केला असें म्हणण्याचें अथवा मानण्याचें कारण काय? शिवाय, भेटीच्या वेळीं शिवाजीमहाराजांना चुरडून टाकण्याचा उपक्रम प्रथम अफझुलखानानें केला याबद्दल बहुतेकांचें, किंबहुना सर्वांचें एकमत आहे. आणि ही गोष्ट जरी क्षणभर विवाद्य धरली, तरी गडावरून निघतांना महाराजांनीं जी निरवानिरव केली होती तिजवरून, खुद्द महाराजांना दग्याफटक्याचें भय वाटत होतें हें स्पष्ट होतें. या प्रसंगांत आपलें जर कांहीं बरेंवाईट झालें तर उत्तरक्रिया कोठें व कशी करावयाची, आपल्या पश्चात् राज्याचें काय करावयाचें, अफझुलखानाच्या सैन्याशीं, तशा आपत्कालांतहि, सामना कसा द्यावयाचा इत्यादि स्वरूपाची जी निर्वाणीची व्यवस्था महाराजांनीं केली होती ती काय दर्शविते? स्नान व केदारेश्वराची पूजा, ब्राह्मणांना दान, इतर दानधर्म व गोप्रदानें, मातुःश्रींना व संभाजीला शूर व विश्वासार्ह लोकांच्या स्वाधीन करण्याची दक्षता, मातुःश्रींनीं मांडलेला आक्रोश, इत्यादि गोष्टी कशाच्या सूचक आहेत? प्रसंग मोठा दुर्धर, आणीबाणीचा, महाराष्ट्राच्या इतिहासाला एकदम वेगळें वळण देणारा व आपल्या जीवितकार्याची, आपल्यापुरती तरी, इतिश्री करणारा आहे असें शिवाजीमहाराजांना मनःपूर्वक वाटत होतें हें या हकीकतीवरून उघड दिसतें. हें जर निर्विवाद व संशयातीत आहे आणि खुद्द महाराजांना आपल्या प्राणाची शाश्वती वाटत नव्हती ही गोष्ट जर सर्वमान्य आहे, तर अफझुलखानाच्या पक्षाकडून अत्याचाराची पूर्ण तयारी असली पाहिजे हें उघड होतें. भेटीच्या व स्नेहप्रदर्श-

नाच्या मागें खरा हेतु शिवाजीमहाराजांना पकडून नेण्याचा किंवा ठार मारण्याचा खास होता.

यासंबंधांत आणखी एक फार महत्त्वाचा मुद्दा विचारांत घेण्याच्या लायकीचा आहे. शिवाजीमहाराजांनीं विश्वास दाखवून खानाला गडाच्या पायथ्यापर्यंत आणलें असें इतिहासकार म्हणतात व आपणहि धरून चालतों. पण याबरोबर हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, अफझुलखानानें जें केलें तें सर्व अंतिम हेतूनेंच केलें. शिवाजीमहाराजांना विश्वासांत घेण्याची व त्यासाठीं स्वतःचा प्रांजळपणा दाखविण्याची त्याला जरूरी भासत होती ती कां? महाराज जर गडावरच बसून राहिले तर त्यांचा पूर्ण पराभव करून त्यांना पकडून नेणें फार कठीण, जवळजवळ अशक्यप्रायच आहे हें खान ओळखून होता. म्हणून, विश्वास दाखवून शिवाजीमहाराजांना गडावरून खालीं येण्यास प्रवृत्त करणें व आपल्या टापूंत आणणें त्याला प्राप्त होतें. म्हणूनच सैन्य दूर मागें ठेवणें, बरोबर थोडेच लोक ठेवणें इत्यादि शिवाजी-महाराजांच्या अटी त्यानें मान्य केल्या. सारांश, खानाला विश्वासांत घेण्यासाठीं शिवाजीमहाराजांनीं डावपेंच लढविले हें जसें खरें आहे तसेंच, महाराजांना मैदानांत आणण्यासाठीं खानानें विश्वास दाखविला व सौजन्याचें ढोंग केलें हेंहि खरें आहे. प्रत्यक्ष झटापटींत खानाचा डाव फसला व शिवाजीमहाराजांची सरशी झाली; आणि म्हणून, महाराजांनीं दगलबाजी केली असें म्हणणारांना निमित्त सापडलें. पण त्याऐवजीं, महाराष्ट्राच्या व भारताच्या दुर्दैवानें जर गोष्टी वेगळ्या प्रकारें घडल्या असत्या व शिवाजी-महाराजांचा अंत झाला असता अथवा त्यांना कैद झाली असती तर हेच इतिहासकार अफझुलखानावर विश्वासघाताचा आरोप करण्यास प्रवृत्त झाले असते व बिचाऱ्या शिवाजीला भरंवसा देऊन त्यानें फसविलें अशी नोंद त्यांनीं केली असती.

यावरून हें दिसून येतें कीं, शिवाजीमहाराजांच्या थोर व निष्कलंक राजनीतीला आणि उदात्त जीवनचरित्राला अफझुलखान प्रकरणामुळें जो डाग, इतिहासकारांच्या भोळेपणामुळें अथवा कांहींच्या धूर्तपणामुळें, लागला आहे तो सर्वस्वीं अयोग्य आहे. अफझुलखानाला शिवाजीनें भेटीस बोलावलें

व त्याचा वध केला एवढेंच आपण पाठ्यपुस्तकांत वाचतों व शिवाजी-महाराजांची दगलबाजी गृहीत धरतों. पण वस्तुस्थिति फार वेगळी होती हें, या प्रकरणाची समग्र पार्श्वभूमि अवलोकिल्यावर ध्यानांत भरतें.

शिवाजीमहाराजांनीं अफझुलखानाला विश्वास दाखवून भेटीस बोलावलें आणि त्याचा दग्यानें प्राण घेतला असा जो सर्वसामान्य समज आहे तो पसरण्याचें मुख्य कारण हें कीं, त्या घटनेची एकंदर पार्श्वभूमि लोकांना माहीत नसते. आणि दुसरें कारण हें कीं, शिवाजीमहाराजांचें व्यक्तिमाहात्म्य कमी करणें हेंच ज्यांचें उद्दिष्ट अशा देशी व विदेशी इतिहासकारांनीं या पार्श्वभूमीकडे मुद्दाम दुर्लक्ष करून, शिवाजीनें अफजुलखानाचा वध केला एवढीच बाब लोकांपुढें ठेवली व तिच्या जोडीला आपलीं खोटीं अनुमानें ठेवून दिलीं. एकंदर प्रकरणांत दग्याफटक्याचा अथवा विश्वासघाताचा कसलाहि मागमूस नव्हता; दोन्ही पक्ष परस्परांना पूर्णपणें ओळखून होते; परस्परांविरुद्ध कारस्थानें करण्याचें व डाव रचण्याचें काम उभयतांकडून दीर्घ काळ—दोन अडीच महिने— चालू होतें; स्वतः अफझुलखान शिवाजीमहाराजांपुढें वेगवेगळीं आमिषें धरून व त्यांच्याविरुद्ध फंदफितुरीला उत्तेजन देऊन त्यांना जाळ्यांत अडकविण्यास व त्याचा निःपात करण्यास टपलेला होता. उभयपक्षीं चाललेल्या या डावपेंचांत कोणाची सरशी होते व कोण हरतो एवढेंच ठरावयाचें होतें; कोणीं कोणावर विश्वास ठेवण्याचा व फसलें जाण्याचा कसलाच प्रश्न नव्हता. अर्थात् ‘ शठं प्रत्यपि सत्यम् ’ हें जें महात्मा गांधींचें थोर व उदात्त तत्त्व त्या कसोटीला शिवाजीमहाराजांचें राजकारण उतरणार नाहीं; परंतु ‘ शठं प्रति शाठ्यम् ’ हें जें लोकमान्य टिळकांचें गीतेच्या शिकवणीवर आधारलेलें तत्त्व, त्या सनातन तत्त्वाच्या पलीकडे शिवाजीमहाराज गेले नव्हते हें मात्र निर्विवाद आहे. अफझुलखान हा शिवाजीमहाराजांवर विश्वास ठेवून भोळेपणानें व सरळ बुद्धीनें त्यांच्या भेटीस आला हाच समज मुळांत चुकीचा व निराधार आहे.

शिवाजीमहाराजांनीं आपल्या जीवितकार्यास प्रारंभ केला तेव्हां त्यांचें वय विशीच्या आंत होतें; आणि अफझुलखानासारख्या जबरदस्त सेनापतीला व निष्णात मुत्सद्याला राजकारणी डावपेंचांत व कारस्थानीं मुत्सद्देगिरींत,

त्यांनीं पराभूत केलें तेव्हां त्यांनीं तिशी नुकतीच ओलांडली होती; आणि त्याच्या आधींच, स्वकीयांना जागृत करून व परकीयांच्या हस्तकांचें निर्दालन करून त्यांनीं हिंदूंच्या अंगांत स्वाभिमान व संस्कृतिनिष्ठा रुजविली होती व आपल्या न्यायाधिष्ठित राजवटीचा पाया उत्तम प्रकारें घातला होता;—हें सर्व लक्षांत घेतलें म्हणजे शिवाजीमहाराजांच्या अलौकिक विभूतिमत्त्वाची कल्पना येते व लोक त्यांना ईश्वराचा अवतार का मानीत असत हें स्पष्ट होतें.

महाराष्ट्रीयांना आपल्या पूर्वजांच्या थोरवीची योग्य कल्पना यावी व आपल्या पूर्वपरंपरेविषयींचा योग्य अभिमान त्यांच्या ठिकाणीं जागृत व्हावा यासाठीं जर कोणती एक गोष्ट करणें अवश्य असेल तर, शिवाजीमहाराजांच्या चरित्राचा यथासांग अभ्यास ही ती होय. त्या थोर पुरुषाच्या चारित्र्यांत किती मोठाल्या, विविध व अनेक गुंतागुंतींनीं युक्त अशा घटना घडलेल्या आहेत, व प्रत्येक घटनेच्या सूक्ष्म अभ्यासानें किती उच्च दर्जाचें शहाणपण प्राप्त होणार आहे याची अल्पशी कल्पना एका अफझुलखान प्रकरणाच्या परिशीलनानें येते.

श्री शिवाजीमहाराजांच्या अलौकिक कर्तृत्वाची व तितक्याच पवित्र जीवनाची स्मृति हें महाराष्ट्राचें किंबहुना अखिल हिंदु समाजाचें परमोच्च स्फूर्तिस्थान आहे; तो आपणां सर्वांचा मानबिंदु आहे; वेगवेगळ्या मतांच्या व पक्षांच्या लोकांना एकत्र आणणारी ती एक महान् शक्ति आहे. अशा पुरुषाच्या चारित्र्याला अकारण कलंक लागूं नये, म्हणून या अफझुलखान प्रकरणाचा एवढा विस्तार करणें प्राप्त झालें.

शिवाय, या अफझुलखान प्रकरणाची एवढी चर्चा होते यावरूनही शिवाजीचें एकंदर निष्कलंक चारित्र्यच सिद्ध होतें. शिवाजीचा सर्व आयुष्यक्रम — खाजगी व सार्वजनिक — निष्कलंक होता; या अफझुलखानाच्या एका गोष्टीमुळेंच, कांहींच्या मतानें त्याला डाग लागूं पाहात होता. म्हणून त्यावर एवढा पूर्वपक्ष उत्तरपक्ष व एवढी भवति न भवति. औरंगजेबाच्या कोणत्या एखाद्या उपक्रमाबद्दल कोणी अशी चर्चा करीत नाहीं. कारण त्याचा सारा आयुष्यक्रमच कपटीपणानें, दगलबाजीनें व क्रूरपणानें भरलेला आहे.

चरित्र अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

आपल्या तिघां भावांपैकीं सर्वांत वडील भाऊ जो दारा त्याचा पराभव करून औरंगजेबानें त्याचा वध करविला व त्याचें डोकें आपला पिता शहाजहान याला नजर म्हणून पाठविलें; कारण दारा हा शहाजहानचा सर्वांत आवडता होता. दुसऱ्या क्रमांकाचा सुजा हा पळून ब्रह्मदेशांत गेला व तेथें मारला गेला. औरंगजेबाहून लहान जो मुराद त्याला दारू पाजून त्याचाहि औरंगजेबानें खून करविला. दाराचा मुलगा सुलेमान म्हणून होता त्यालाहि दररोज थोडें थोडें विष पाजून औरंगजेबानें जगांतून नाहींसें केलें ! शिवाजीविरुद्ध ज्या प्रख्यात व शूर जयसिंहाला औरंगजेबानें दक्षिणेंत पाठविलें होतें व ज्यानें बादशहाची कामगिरी बजावून शिवाजीला तह करण्यास भाग पाडलें त्या जयसिंहावरसुद्धां बऱ्हाणपूर येथें औरंगजेबानें विषप्रयोग करविला; आपला पिता शहाजहान यालासुद्धां, त्याचें सिंहासन बळकावल्यावर तो मरेपर्यंत आठ वर्षें औरंगजेबानें नजरकैदेंतच ठेवलें होतें ! वडील बंधु दारा याचा वध केल्यावर त्याची पत्नी रानादिल इच्यावर औरंगजेबाची पापी नजर गेली व तिला आपल्या अंत:पुरांत प्रविष्ट होण्याचा हुकूम त्यानें सोडला तेव्हां तिनें आत्महत्या केली ! शिवाजीला पूर्ण विश्वास देऊन औरंगजेबानें भेटीस बोलावलें आणि मग त्याला अटकेंत ठेवून त्याला ठार मारण्याचा बेत रचला ! अलौकिक हिकमतबाजपणानें शिवाजीनें आपली मुक्तता करून घेतली ही गोष्ट वेगळी. पण त्याचा निकाल लावण्यास औरंगजेब टपलेलाच होता.

अशा प्रकारें विविध नीच कृत्यांनीं, पराकाष्ठेच्या दगलबाजीनें व क्रूरतेनें भरलेलें ज्याचें सारें जीवित त्या औरंगजेबाच्या एकट्या दुकट्या अपकृत्याची शहानिशा कोणीतरी कशाला करील ? श्री शिवाजीमहाराजांचें सर्व खासगी व सार्वजनिक जीवन शरदृतूंतील चांदण्याप्रमाणें परमधवल व निष्कलंक असल्यामुळें, अफझुलखान प्रकरणानें त्याला कलंक लागतो कीं काय म्हणून या एका बाबीची एवढी चर्चा होते.

श्री शिवाजीमहाराजांच्या दयाळूपणाचे अनेक दाखले सापडतात. विख्यात स्वामिभक्त बाजी प्रभु यानें, श्रीशिवछत्रपतींची आज्ञा पालन करतांना, विशाळगडच्या पायथ्याशीं देह ठेवला. त्याला सात मुलगे होते. शिवाजीनें

वडील मुलाला बापाची सरदारकी दिली आणि इतरांस पालख्या व तैनात देऊन मावळे लोकांची सबनिशी सांगितली.

तानाजी मालुसरे, प्रतापराव गुजर इत्यादि ज्या ज्या लोकांचे प्राण स्वराज्यस्थापनेच्या कारणीं खर्ची पडले त्या सर्वांच्या कुटुंबियांचा असाच परामर्ष शिवाजीनें घेतला.

व्यंकोजीशीं समेट झाल्यावर शिवाजीनें त्याला जें पत्र लिहून वागणुकीचे नियम घालून दिले त्या पत्रांत पुढील कलमें आहेत :—

" ( ७ ) लहानथोरांशीं तह वगैरे करितां तंटा न पाडतां गोरगरीब, अनाथ यांचा अभिमान धरून चालावें. ( ८ ) देवस्थानें वगैरेंचा बंदोबस्त चांगला ठेवावा; उच्छेद करूं नये. ( ९ ) फिर्यादीचा इन्साफ तोडतांना पैशाचा लोभ न धरितां गोरगरिबांचा अभिमान धरून चालावें. "

गरीब लोक, कष्ट करणारी रयत, शेतकरी, बायका, मुलें, गायी इत्यादिकां-विषयींची शिवाजीची दयार्द्र बुद्धि त्याच्या आज्ञापत्रकांत व वागणुकींत अनेक वेळां व्यक्त झालेली पाहावयास सापडते.

आपल्या ध्येयनिष्ठेनें, सद्वर्तनानें, स्वार्थत्यागानें व निश्चयी वृत्तीनें, अचाट कल्पकतेनें व लोकोत्तर पराक्रमशालित्वानें शिवाजीनें स्वकीयांचा पूर्ण विश्वास संपादन केला होता. कोणताहि प्रसंग ओढवला, कसलीहि आपत्ति गुदरली, तरी आपला अग्रणी, हिंदवी स्वराज्य स्थापण्याचें जें ध्येय त्यापासून कधींहि विचलित होणार नाहीं अशी शिवाजीच्या सर्व अनुयायांची पूर्ण खात्री होती. म्हणूनच, १६६५ मध्यें, औरंगजेबाचा अव्वल दर्ज्याचा सरदार राजा जयसिंह याच्या वरचढ लष्करी सामर्थ्यापुढें शिवाजीला जरी नामुष्कीचा तह पतकरावा लागला आणि बादशहाच्या सैन्यांत दाखल होऊन बादशहाच्या वतीनें विजापूर दरबाराविरुद्ध लढावें लागलें तरी त्याच्या कर्तृत्वावरचा व ध्येयनिष्ठेवरचा मराठ्यांचा विश्वास यत्किंचित्‌हि ढळला नाहीं. पुढें शिवाजी दिल्लीस जाऊन अटकेंत पडला; पण तेथून तो निसटल्याचें वर्तमान दक्षिणेंत येऊन पोंचतांच शिवाजीच्या लोकांनीं ठिकठिकाणीं मोंगलांविरुद्ध उठाव केला व त्यांना हैराण करण्यास सुरुवात केली.

अशा प्रकारचें, जनतेचा व अनुयायांचा परिपूर्ण विश्वास संपादन करणारें पुढारीपणहि असावें लागतें —म्हणजे लोकाग्रणी त्या लायकीचा असावा

लागतो; आणि लोकांनींहि आपला विश्वास कायम ठेवणें अवश्य असतें. नाहीं तर कांहीं थोर अंतिम हेतु मनांत धरून पुढाऱ्यानें जरा नरमाईचें धोरण स्वीकारलें कीं, अनुयायी त्याच्यावर लगेच अविश्वास व्यक्त करूं लागतात. अशानें कार्यसिद्धि होत नाहीं; कारण कार्यसिद्धीचीं साधनें व त्यासाठीं करावयाचे उपक्रम यांचें चिंतन करण्याऐवजीं अनुयायांना काय वाटेल यावरच पुढाऱ्याला सतत नजर ठेवावी लागते व अवास्तव जहाल-पणा स्वीकारून कार्यहानि पतकरावी लागते !

शिवाजीमहाराजांच्या वर नमूद केलेल्या उदाहरणावरून प्रचलित लोकशाही जमान्यांतल्या पुढाऱ्यांनीं व अनुयायांनीं —— उभयतांनींहि हा बोध घ्यावयास पाहिजे. पुढाऱ्यानें आपल्या ध्येयनिष्ठेनें व उज्ज्वल चारि-त्र्यानें अनुयायांचा विश्वास संपादन केला पाहिजे; आणि अनुयायांनींहि पुढाऱ्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८१९९ वि: चरित्र
क्रमांक ८९८ नों. दि. १६/८/७०

मराठी ग्रं. संग्रहालय ठाणे
90308

REFBK-0010304